म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

REFBK-0004303

# माझा काश्मीरचा प्रवास.

लेखक-

श्रीयुत मोरेश्वर गोपाळ काळे.

मुद्रक व प्रकाशक-

रा. रा. शंकर नरहर जोशी, १०२६ सदाशिव पेठ,

चित्रशाळा प्रेस, पुणें.

सर्व [illegible] न.

REFBK-0004303

सन १९३०.

किंमत आठ आणे.

ग्रंथ संग्रहालय
क्र. 4303

# प्रस्तावना.

## प्रो. गोविंद चिमणाजी भाटे एम्. ए. यांची.

पोथ्या, पुस्तकें, संवाद, संभाषणें हीं ज्ञानसंपादनाचीं सर्वसंमत साधनें आहेत खरीं. पण त्या दोहोंत **डावें उजवें** असा तरतम भाव आहे. यांत शंकाच नाहीं. कारण पहिलें साधन झाडावरून खुडलेल्या निस्तेज कोमेजलेल्या फुलासारखें, तर दुसरें साधन झाडावर असलेल्या टवटवीत फुलासारखें; प्रथम साधन तळ्यांतल्या संथ सांचलेल्या पाण्याप्रमाणें तर द्वितीय साधन नदीच्या वाहत्या पाण्याप्रमाणें; एक परप्रकाशित ग्रहतुल्य तर दुसरें स्वयं प्रकाशित तारकातुल्य. शेवटीं पूर्वीचें साधन कपाटांतलि बासनांत बांधलेल्या सणंगासारखें तर पुढचें साधन प्रदर्शनांतील कांचेच्या पेटींत ठेवलेल्या विविध वस्तु संग्रहासारखें ज्ञान संपादनाच्या या साधनद्वयामध्यें ज्याप्रमाणें तरतम भाव आहे त्या प्रमाणेंच ज्ञानसंपादनाच्या दुसऱ्या एका जोडीमध्यें-वाचन व प्रवास-**डावें उजवें** आहेच. वाचन अप्रत्यक्ष रितीनें ज्ञान देतें तर प्रवास प्रत्यक्षतया ज्ञान देतो; वाचनानें मिळणारी, माहिती पोपटपंचीरूप असते, तर प्रवासांत मिळणारी माहिती जागृत ज्योतिरूप असते; वाचन हें **एकाच** इंद्रियानें-डोळ्यांनीं-भाषारूप पडद्यांतून वस्तुज्ञान देतें तर प्रवास सर्व इंद्रियांनीं आडपडद्यावांचून वस्तुज्ञान देतो. वाचनानें होणारें ज्ञान मोजक्या भांड्यांतून ओतलेलें, दुसऱ्याच्या ओंजळीनें, पाणी पिण्यासारखें आहे तर प्रवासानें होणारें ज्ञान जित्या झऱ्याचें स्वतःच्या ओंजळीनें पाणी पिण्यासारखें आहे. वाचनांत दुसऱ्याच्या चष्म्यानें वाचक वस्तूकडे पहात असतो तर प्रवासांत प्रवासी स्वतःच्याच चष्म्यानें वस्तुनिरीक्षण करतो. ह्याप्रमाणें ज्ञानसंपादनाच्या वर निर्दिष्ट केलेल्या साधनांत डावें उजवेंपणा असला तरी त्या साधनांचा एकमेकांशीं विरोध आहे अशांतला भाग नाहीं; एकाअर्थीं हीं ज्ञानसंपादनाचीं निरनिराळीं साधनें परस्परसाहाय्यक आहेत. म्हणून ज्यांना खरा सुशिक्षितपणा व बहुश्रुतपणा मिळवावयाचा असतो त्यांना त्यांना या सर्व साधनांचा सोईसवडीप्रमाणें उपयोग करावा लागतो, इतकेंच नव्हे तर सुधारलेल्या देशांमध्यें तरुण माणसाच्या शिक्षणपूर्ती करितां परप्रांतात प्रवास करून देशीं परत येणें हें होतकरूं सुशिक्षिताचें एक अवश्य कर्तव्य समजलें जातें. कारण अशा प्रवासांत तरुण माणसांच्या निरनिराळ्या माणसांशीं गांठी पडून संवादसंभाषणाचे प्रसंग येतात. म्हणजे शिक्षणामधल्या वाचनाला संवाद संभाषण व प्रवास या दोन्ही ज्ञानसंपादक साधनांची जोड मिळते व अशा तरूण माणसांत बहुश्रुतपणा अवश्यमेव उत्पन्न होतो. असो.

आज हे विचार सुचण्याचें कारण ज्ञानसंपादनाचें जें एक साधन प्रवास त्याचा स्वतः उपयोग करून त्याचा फायदा आपल्या बांधवांस द्यावा अशा उद्देशानें लिहिलेल्या प्रवासपर वर्णनाला प्रस्तावना लिहिण्यास मी लेखणी हातीं धरली आहे. सध्यां माझा व्यवसाय ग्रंथ लिहिण्याचा आहे. हें माझें **नित्यकर्मच** झालें आहे व

त्याच्या जोडीला दुसऱ्याच्या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याचें काम **नैमित्तिक** म्हणून कधींकधीं करावें लागतें व आजचा त्या नैमित्तिक कर्माच्या पूर्ततेचा प्रसंग आहे.

" माझा काश्मीरचा प्रवास " ह्या पुस्तकाचे कर्ते यांची यापूर्वी प्रत्यक्ष ओळख नव्हती पण माझे ग्रामस्थप्राय म्हणून ( कारण रा. काळे हे रोह्याचे राहणारे व माझे बंधु रोह्याचे ग्रामस्थ झाले आहेत ) समानव्यवसायी म्हणून समानप्रवासशील म्हणून व विशेषतः " हिंदुस्थानचें नंदनवन या माझ्या प्रवासवृत्ताचे वाचक व आपल्या प्रवासांत त्या पुस्तकाचा सारखा उपयोग करणारे म्हणून ते माझ्याकडे आले व मला भेटलें व त्यांनीं आपल्या पायीं केलेल्या काश्मीरच्या प्रवासाची व सर्व हिंदुस्तानभर व नेपाळांत प्रवास केल्याची माहिती सांगितली. साधारणतः सामान्य सांपत्तिक स्थिति असलेल्या–खाजगी शाळेंतील मराठी शिक्षकांची सांपत्तिक स्थिति कशी असेल हें सांगावयास नकोच–शिक्षकांना इतकी प्रवासाची हौस पाहून व त्यांनीं अत्यंत कमी खर्चांत बहुतेक पायीं केलेल्या प्रवासाची हकिकत ऐकून मला रा. काळे यांच्या कटकपणाचें, त्यांच्या चिकाटीचें व त्यांच्या प्रवासप्रियतेचें कौतुक वाटलें. अशा स्थितीमध्यें त्यांनीं मला प्रस्तावनापर चार प्रोत्साहक शब्द लिहून देण्याची विनंति केली व मीं ती मान्य केली. व त्यांचें सर्व पुस्तक वाचून झाल्यावर हे चार शब्द लिहिण्यास बसलों.

रा. काळे जम्मूच्या नव्या झालेल्या सडकेनें चालत काश्मीरांत व श्रीनगरीं गेले, व परत येतांना ते जुन्या व पूर्वीच्या रावळपिंडीकडील सडकेनें परत आले. काश्मीरचा प्रवास मी केला होता तो दोन्ही वेळ रावळपिंडीच्या वाटेनेंच केला होता पण माझ्या एका कल्पनासृष्टींत मी कल्पनेनें जम्मूकडून प्रवास केल्याचें वर्णन केलें होतें यामुळें रा. काळे यांच्या जम्मू ते व्हेरनागपर्यंतच्या प्रत्यक्ष पायीं प्रवासाचें वर्णन व माझ्या त्याच काल्पनिक मनोमय प्रवासाचें वर्णन यांतील साम्यासाम्य यांची मला मोठी मौज वाटली. रा. काळे यांचें वर्णन वाचनीय झालें आहे यांत शंकाच नाहीं. टांगा किंवा मोटार या साधनांनीं प्रवास करणारापेक्षां पायीं प्रवास करणाऱ्याला निरनिराळ्या प्रकारचे अनुभव येतात व अशा अनुभवाच्या पुष्कळ गोष्टी रा. काळे यांनीं लिहिल्या आहेत. मला सुद्धां पायीं प्रवास करण्याची हौस आहे पण पायीं प्रवासास वेळ फार लागतो व म्हणून माझ्यासारख्या कामाची सदा कुतरओढ असणाऱ्या माणसाला पायीं प्रवास करणें परवडत नाहीं. पायीं प्रवासानें काळाचा व्यय जास्त होतो खरा; पण पैशाची पुष्कळच काटकसर होते यांत शंका नाहीं. व रा. काळे यांनीं खरोखरी अत्यंत गरीब माणसाला–मुलें माणसें असलेल्या माणसाला सुद्धां–किती कमी खर्चांत दूरदूरचे प्रवास करितां येतात हें उत्तम तऱ्हेनें दाखविलें आहे. तरी रा. काळे यांचें उदाहरण पाहून व त्यांचें प्रवासवर्णन वाचून गरीब गृहस्थांमध्यें प्रवास करण्याची प्रवृत्ति वाढो व रा. काळे यांच्या मनोरंजक व सुंदर प्रवासवर्णनपर पुस्तकाला मराठी वाचकांकडून भरपूर आश्रय मिळून त्यांच्या श्रमाचें चीज होवो अशी इच्छा प्रदर्शित करून मी ही प्रस्तावना पुरी करतों.

महाड जि. कुलाबा
५ सप्टेंबर १९३०

**गोविंद चिमणाजी भावे.**

# लेखकाचे चार शब्द.

स्वामी सत्यदेव त्यांच्या हिंदी पुस्तकाचें श्री. नागेश वासुदेव गुणाजी वकील बेळगांव ह्यांनीं मराठींत केलेलें भाषांतर अमेरिकेंतील गरीब विद्यार्थी हें पुस्तक १९१४ सालीं वाचण्यांत आल्याबरोबर हिंदुस्तानांत पायानीं प्रवास करण्याचा निश्चय केला व १९१६ सालापासून आतांपर्यंत मद्रास इलाख्याशिवाय नेपाळ, बद्रीनाथ, केदार-नाथ, सिमला, मसुरी, नैनीताल, अलमोडा, कलकत्ता, गोवा वगैरे प्रांत, महाराष्ट्रांतील बहुतेक जिल्हे गुजराथ राजपुताना पंजाब संयुक्तप्रांत निजामचें राज्य वऱ्हाड मध्यप्रांत वगैरे सर्व पाहून झाले. चालू सालींच ( मे व जून १९३० ) बद्रीनाथाच्या प्रवासास गेल्यामुळें प्रुफें वगैरे तपासणें सुद्धां राहून गेलें.

वरील सर्व प्रवासाचा हेतू हिंदुस्तानाची एकंदर परिस्थिती कशी आहे हें कळून आपल्या ज्ञानांत भर पडावी इतकाच होता कारण आपण मिळविलेली माहिती लोकां-पुढें मांडली असतां तिजला वाचक मिळतील अशी कल्पना नव्हती. परंतु माझे स्नेही रा. धोंडो सखाराम कुलकर्णी ह्यांनीं काश्मीरला जातांना तिकडील प्रवासवर्णन लिहून आणण्यास सांगितलें व लिहून आणल्यानंतर तें त्यांच्याच देखरेखीखालीं चाललेल्या शालापत्रक नांवाच्या मुलांच्या उत्कृष्ट मासिकांत प्रसिद्ध करण्याचें कबूल ही केलें आणि म्हणूनच मी हें वर्णन लिहून आणिलें. त्यामुळें ह्या पुस्तकापासून जर कोणास कांहीं लाभ होण्यासारखा असेल तर त्याचें श्रेय श्री. कुलकर्णी यानांच आहे आणि त्याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहे.

लिहून आणिलेलीं टिपणें जुळवून लिहिण्याच्या कामीं माझे समव्यवसायी मित्र श्री. गोपाळ श्रीनिवास निंबवीकर ह्यांनी फारच मेहेनत घेतली आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

पुस्तक लिहून तयार झाल्यानंतर तें वाचून योग्य त्या दुरुस्त्या सुचविण्याच्या कामीं गु. डॉ. ज्ञानेश्वर कृष्ण लड्डु पी. एचडी. दे. भ. वासुकाका जोशी मालक चित्रशाळा व दे. भ. त्र्यंबकराव देवगिरीकर संपादक चित्रमजगत् ह्यांनीं घेतलेल्या श्रमांबद्दल मी त्यांचा अतिशय आभारी आहे. प्रो. भाटे ह्यांची व माझी मुळींच ओळख नसतांही प्रवासाची आवड असलेले विद्वान् गृहस्थ म्हणून मी त्यांस प्रस्तावना लिहिण्याबद्दल विनंति केली व त्यांनींही अनंत कामें बाजूस सारून प्रस्तावना लिहून दिली; ह्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. तसेंच चित्रमयजगत्चे सहसंपादक श्री. र. गो. सरदेसाई, व माझे

स्नेही रा. यशवंतराव रानडे व ज्योतिषी नीळकंठराव ल्वाटे ह्यानींही ह्या कामीं फार मदत केली आहे; त्याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहे. हें पुस्तक लिहितांना पंडित आनंदजी कौल ह्यांच्या Jammu & Kashmir State ह्या इंग्रजी पुस्तकाचा फार उपयोग झाला आहे, ह्याबद्दल त्यांचा व काश्मीर मधील माझे स्नेही पंडित अफताब जी कॉ हेडमास्तर ए.-व्ही. स्कूल विचारनाग ह्यांचीही अतिशय मदत झाली आहे, त्याबद्दल त्यांचाही मी फार फार आभारी आहे.

पुस्तकप्रकाशनाचें सर्वस्वी श्रेय चित्रशाळेचे म्यानेजर श्रीयुत शंकरराव जोशी यांचेकडेच आहे, हें विसरून चालणार नाहीं. व ह्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

सरतेशेवटीं ज्या जगदनियंत्या परमेश्वराच्या कृपेनें हें सर्व काम निर्विघ्नपणें पार पडलें त्याचे आभार मानून हे चार शब्द पुरे करतों.

नूतन मराठी विद्यालय
हायस्कूल पुणें.
११ सप्टेंबर १९३०

**मोरेश्वर गोपाळ काळे.**



ती० ह० भ० प० गोपाळ लक्ष्मण काळे

पेनशनर रेव्हेन्यू डिपार्टमेंट जि. ठाणें.

[ हल्लीं वस्ती नाशिक पंचवटी. ] [ जन्म सन १८६५.

# अर्पणपत्रिका.

हें पुस्तक

तीर्थरूप ह. भ. प. गोपाळ लक्ष्मण काळे

व स्वर्गस्थ मातुश्री तीर्थरूप

सौभाग्यवती सत्यभामा-

बाई काळे यांस अत्या-

दरपूर्वक अर्पण

केलें आहे.

मोरेश्वर गोपाळ काळे.



लेखक श्री. मोरेश्वर गोपाळ काळे, पुणें.

# माझा काश्मीरचा प्रवास.

आजपर्यंत पुष्कळ लेखकांनीं ह्या विषयावर लेख लिहिले आहेत; परंतु त्यांच्या लिखाणाचा उपयोग साधारणतः श्रीमंत लोकांस होण्यासारखा असल्यामुळें मी आपलें प्रवासवर्णन प्रसिद्ध करण्याच्या भानगडींत पडलों आहे. कारण मी एक गरीब प्राथमिक शिक्षक आहे व दुनयेंत गरिबांची संख्याच जास्त आहे. मी सर्व प्रवास सुमारें ५० रुपयांत आटोपला आहे. तो मी कसा थोडक्यांत आटोपला, हेंच मुख्यतः वाचकांनीं पाहावें, अशी विनंति आहे.




पुण्याहून ता. २६।४।२९ रोजीं निघून काश्मीरच्या प्रवासाकरितां मुंबईस गेलों. **मुंबईहून** जम्मूचें तिकीट–१२रु. १३आ. दिल्ली, व दिल्ली ते जम्मू ५–१ मिळून–१७ रु. १४ आ. पडतें व **रावळपिंडीचें** ८ आणे जास्त म्हणजे १८ रु. ६ आणे पडतें. **पुण्याहून** तिकीट काढल्यास १९ रु. ४ आ. जम्मू व १९ रु. १२ आणे रावळपिंडीपर्यंत पडतात. मी **जम्मूस** ता. ३-५-२९ रोजीं सकाळीं जाऊन पोहोंचलों.

जम्मू हें गांव स्टेशनपासून सुमारें १ मैलावर **टवी** नदीच्या कांठीं डोंगराच्या उतरणीवर वसलें आहे. दुरूनच तांबड्या रंगाचीं सुंदर व पक्कीं बांधलेलीं घरें दिसूं लागलीं; व तीं पाहून मनास फार आनंद वाटला. स्टेशनच्या बाहेरच एक जकातीचें नाकें लागलें; परंतु मला कोणी अडथळा केला नाहीं. तसाच पुढें चाललों. सुमारें एक फर्लांगावर टवी नदीवर बांधलेला तारांचा झुलता पूल लागला. त्याचा उपयोग मोटारी गाड्या वगैरे जाण्याकडे सुद्धां करितात. पुलाच्या पलीकडे गेल्याबरोबरच वस्तीस सुरवात होते. ही वस्ती स्टेशनमुळें झाली आहे. गांव पुढेंच डोंगरावर वसलें आहे. वस्तींत शिरल्याबरोबर एक **विनायकमिश्र** यांची धर्मशाळा आहे. तींत उतरण्यास जागा, नळ, संडास वगैरे सर्व सोई आहेत. मला एक खोली मिळाली. धर्मशाळेंत गरीब यात्रेकरूंस शिधा ( सदावर्त ) फुकट मिळतो. एक धर्मार्थ दवाखानाही धर्मशाळेंत आहे. जवळच दुकानें आहेत, त्यांतून शिधा आणून मी स्वयंपाक केला. व भोजनोत्तर थोडी विश्रांति घेऊन गांव पाहाण्यास गेलों. धर्मशाळेपासून गांव सुमारें २।३ फर्लांगावर एक टेकडी लागते तीवर वसला आहे. गावाभोंवतीं सुंदर तटही आहे. गांवांत सर्व प्रकारचीं दुकानें आहेत गांवाची लोकसंख्या सुमारें ३२ हजार आहे. गांव स्वच्छ आहे. गावांत एक **रघुनाथ मंदिर**

ह्या नांवाचें देऊळ पूर्वीच्या राजानें बांधलें आहे. देऊळ बरेंच मोठें बांधलेलें आहे. सभोंवतीं खोल्या आहेत, त्यांत यात्रेकरूंस राहाण्यास जागा मिळते व गरिबांस शिधा व जेवणही मिळूं शकतें. गांवांत बऱ्याच मोटार कंपन्या आहेत. येथून **श्रीनगरचें** माणशीं भाडें ८ रु. पडतें. श्रीनगर येथून २०३ मैल आहे. **काश्मीरच्या महाराजांचा** हिवाळ्याच्या दिवसांत **जम्मूस** मुक्काम असतो. त्यांचा वाडा येथें आहे. महाराज येथें नव्हते म्हणून दारावरच्या शिपायाची परवानगी घेऊन वाड्याच्या कोटाच्या आंत शिरलों. वाडा फारच सुंदर बांधला आहे. वाड्यापुढें एक सुंदर पुष्करणी बांधली असून सभोंवतीं बागही आहे. वाडा आंत जाऊन पाहाण्यास परवानगी मिळाली नाहीं; परंतु खिडकीजवळ उभें राहून पाहाण्यास परवानगी मिळाली. दरबारच्या दिवाणखान्यांत सर्वत्र गालिचे पसरले असून मोटमोठ्या तसबिरी व नक्षी काम वगैरे सर्व पाहाण्यासारखें आहे. जम्मूस एक विजेचा कारखाना असून **प्रिन्स ऑफ वेल्स** ह्या नांवाचें **आर्टस् कॉलेजही** आहे. राजवाडा पाहून परतलों. कोठें काश्मीरचें गाईड अगर नकाशा मिळतो कीं काय ह्याची चवकशी केली. गाईड मिळालेंच नाहीं. नकाशा उर्दू मिळत होता तो घेतला नाहीं. इकडे सर्व व्यवहार उर्दूंत चालतो. **काश्मीर**मध्येंही उर्दूच चालतें. इकडे येणारांनीं उर्दू भाषेची निदान अक्षर ओळख करून घेऊन यावें म्हणजे बराच फायदा होईल. नंतर पुढें जाण्याच्या चवकशीस लागलों. जम्मू हें ठिकाण समुद्रसपाटी-पासून अवघें १२०० फूट उंचीवर असल्यामुळें येथें उन्हाळ्याचा त्रास होतच होता. तेव्हां येथून चालतच प्रवासास आरंभ केल्यास त्रास होईल असें मंडळींनीं सांगितलें. व येथून सुमारें ४१ मैलांवर असलेल्या **उदामपूर** गांवापर्यंत मोटारनें जाऊन पुढें चालत जाण्याचा बेत केला व दरबार मोटार कंपनीचें उदामपूरपर्यंतचें तिकीट १॥ रु. स खरेदी केलें व धर्मशाळेंत परतलों. मोटारवाल्यानें मोटार सकाळीं ९ वाजतां सुटेल असें सांगितलें होतें; परंतु आपण वेळाच्या कामांत विशेष लक्ष देत नाहीं, हें मजला माहित असल्यामुळें मी सकाळीं भोजन उरकून मगच ९ च्या सुमारास मोटारवर गेलों. मोटार सुमारें ११। वाजतां सुटली व सारखा चढाव सुरू झाला.

जम्मूपासून काश्मिरला पोहोंचेपर्यंत सपाट असा प्रदेश नाहींच. सर्व प्रवास डोंगराच्या कडेकडेनें चालला होता व एका बाजूस सपाट्यानें नदी वाहात होती. सर्व रस्ता नागमोडीप्रमाणें होता. त्यामुळें मोटारला फारसा वेग देतां येत नसे. नाहीं तर टक्कर व्हावयाची. जम्मूपासून श्रीनगर हाच पूर्वीचा जुना रस्ता होय. ह्याच रस्त्यानें **मोंगल राजे** काश्मीरमध्यें जात असत. ह्या रस्त्यावर वारंवार कडे कोसळतात म्हणून मोटारनें जाणें थोडेंसें धोक्याचें आहे. ठिकठिकाणीं रस्ता दुरुस्तीकरितां माणसें ठेविलीं आहेत. मोटारची रहदारी मात्र सारखी सुरू आहे. मोटारींतून जातांना मोटार कड्याखालीं कोसळते कीं काय अशी भीति मात्र नेहमीं वाटते. प्रथम प्रथम कांहीं डोंगर गुळगुळीत गोटे व माती ह्यांनीं भरलेले


लागले. पुढें निव्वळ पथ्थर असलेले डोंगर लागले. बहुतेक डोंगर सुंदर झाडींनें भरलेले दिसत होते. मोटारमध्यें बसलेल्या मंडळींजवळ गुडगुड्या होत्या व त्यांनीं लगेच सुरवातही केली. तरुणपिढी मात्र सिगारेट्सला मोठ्या प्रमाणात आश्रय देते. ह्या प्रांतात थंडीमुळें तंबाखू ओढण्याचें प्रमाण आपल्या प्रांतापेक्षां जास्तच आहे; परंतु **नेपाळ** प्रांतांत लहान मुलांमुलींपासून सर्वांनीं एकत्र बसून गुडगुडी पिण्याची जी पद्धत आढळली तशी पद्धत मात्र इकडे आढळली नाहीं. इकडील लोकांचा सिगारेटच्या पायीं फारच खर्च होतो. विड्या इकडे मिळतात; परंतु आपल्या प्रांतापेक्षां तिप्पट महाग मिळतात. वाटेंत फराळाचीं दुकानें लागतात; परंतु त्यांत चहा ( तयार ) मात्र मिळत नाहीं. हिमालयांत सर्वत्र सारखी वस्ती आहे. मैलांत घर नाहीं, अशी जागा नाहीं. मात्र एके ठिकाणीं ५।७ घरापेक्षां जास्त घरें असलेलीं गांवें फारच थोडीं. बहुतेक लोक दूरदूर डोंगरावर घरें बांधून राहातात. घरें इतक्या उंचीवर दिसतात कीं हे लोक येथें जातात तरी कसे हाच प्रश्न नवीन मनुष्यास पडतो. हे लोक घरासंभोवतालचे डोंगर पायऱ्याप्रमाणें फोडून त्यांचीं शेतें तयार करितात व त्यावर पिकें काढतात, तीं शेतें नांगरण्याचें काम ते पहाडी बैलच करूं जाणेत. आपल्या प्रांताचे बैल घसरूनच पडतील. **जम्मूपासून उदामपूरच्या** रस्त्यावर फारशी झाडी नाहीं. सुमारें २५ मैल गेल्यानंतर मग मात्र बाजूच्या डोंगरांतून वाहाणारे सुंदर झरे दिसूं लागले. वाटेंत मधून मधून पाणी लागे तेथें तेथें मोटार पाणी घेण्याकरितां थांबत असे. अशा रीतीनें सुमारें ५॥ वाजतां **उदामपूर** येथें पोहोंचलों. हें ठिकाण **जम्मू**पासून सुमारें ४१ मैल असून ह्याची उंची २४०० फूट आहे. त्यामुळें उष्णतेचें मान फारसें कमी झालेलें नव्हतें. गावांत एक **सत्यनारायणाचें** मंदिर आहे व मंदिराच्या आवारांतच प्रवाशांना उतरण्यासारख्या खोल्या व पडव्या आहेत. देवळाचे मालक धर्मशाळेंतील एका भागांत राहातात. फार सज्जन गृहस्थ दिसले. त्याचवेळीं धर्मशाळेंत **पंडित मुनशीराम** ह्या नांवाचे एक पटवारी ( तलाठी ) व **बेनी प्रसाद शर्मा** ह्या नांवाचे एका कापडाच्या कारखानदाराचे फिरते एजंट उतरले होते; प्रथम हिंदींत प्रश्नोत्तरें झालीं. तेव्हां मंडळींनीं फारसें अगत्य दाखविलें नाहीं. परंतु त्या एजंटास इंग्रजी येतें, हें समजल्यावर त्याजपाशीं इंग्रजींत जेव्हां बोलण्यास सुरवात केली, तेव्हां मात्र मी नुसता भटक्या साधू नसून एक इंग्रजी शाळेंत काम करणारा शिक्षक आहे ही गोष्ट त्यांस समजली व त्यांनीं नंतर शक्य तें सहाय्य मजला दिलें. माझा पोषाख कसा होता हें येथें सांगणें अप्रस्तुत होणार नाहीं असें वाटतें. मजबरोबर २ शर्ट १ खादीचा १ खाकी व २ कोपऱ्या फाटक्या ठिगळें लावलेल्या होत्या. धडके कपडे आंत घालून वरती फाटक्या कोपऱ्या घालावयाच्या असा नियम असे. तसेंच गुढग्या इतक्या रुंदीचा पंचा नेसण्याकरितां होता. बरोबर एक ब्लॅंकेट व सतरंजी १ धोतरही होतें. तसेंच एक खादीची पडशी होती. पडशींत १ अल्युमिनियमचा डबा सुमारें २॥ शेर पाणी मावेल इतका, १ अल्यूमि-

चे लहान पिठलें करण्याकरितां पातेलें, एक अल्यूमिनियमची वाटी व लहानसा अल्यूमिनियमचा तांब्या इतकीं भांडीं असत. एक मोठा पठाणी चाकू, एक स्काउट-व्हिसल, होकायंत्र, मोठी दोरी, मेणबत्ती, २ आगपेट्या, लंगोट, चड्डी, गांधी टोप्या २ पैकीं एक कानटोपीसारखा उपयोग करितां येणारी, एक माकड टोपी, तिखट मीठ ४ वेळां पुरतें, एक वेळेपुरते तांदूळ, सार्थ भगवद्गीता, मनाचे श्लोक, कागद, पेन्सील, नोटबुक, हरणाचें कातडें व **प्रो. भाटे ह्यांचें नंदनवनाचें वर्णन** व **श्री. सरदार हेवळीकरांचा यशवंत**मधील लेख इतके जिन्नस असत. हातांत धरण्याकरितां कानाइतक्या उंचीची वळकाची काठी असे. पडशीला दोरी बांधून त्या दोरीच्या एका टोकास काठी अडकवावयाची दुसऱ्या टोकास तांब्या अडकवावयाचा व दोन्ही हात सुटे ठेवून चालावयाचें असा क्रम असे. बरोबर एक खाकी पिशवी, गळ्यांत अडकवावयाचीही ठेवली होती. सर्व सामान धर्मशाळेंत ठेवून जेव्हां बाहेर जाण्याची वेळ येई तेव्हां पिशवी गळ्यांत अडकवून तींत चाकू, लोटा वगैरे घालून जात असे. प्रथम कांहीं दिवस कोपऱ्या घालून प्रवास केला. पुढें मात्र ब्ल्यांकेटाची कफनी शिवली. प्रवासांत आपण एक पैसेवाले गृहस्थ आहोंत अशी समजूत कोणाचीहि न होऊं देण्याची खबरदारी घ्यावी लागते. म्हणजे जंगलांतून एकटे जातांना हल्ला होण्याची भीति राहात नाहीं. आपल्याकडे पाहून आपण एक गरीब वाटसरू आहोंत अशी सर्वांची समजूत झाली पाहिजे. पैसे ठेवण्याकरितां एक कसा घेतला होता. जरूरीपुरते १।२ रुपये वरतीं खिशांत ठेवून बाकीचे कशांत असत. कसा कमरेस असला म्हणजे पैसे चोरीस जाण्याची भीति राहात नाहीं. पडशीच्या वरतीच सतरंजीहि असे. थकल्यास रस्त्याच्या कडेस लगेच सतरंजी पसरून व पडशी उशास घेऊन कांहीं वेळ विश्रांति घेतां येत असे. तांब्या बाहेरच असल्यामुळें पडशी न सोडतांच पाणी आल्याबरोबर तें पितां येत असे. अस्तु. **उदामपूर** हें गांव डोंगरावर वसलें आहे. पाणी डोंगराखालीं वहाणाऱ्या ओढ्यांतून वर आणावें लागतें. परंतु धर्मशाळेच्या मालकांनीं पाणी व पटवारी महाशयांनीं सर्पण पुरविण्याचें कबूल केल्यामुळें तेथेंच धर्मशाळेंत स्वयंपाक करण्याचें ठरविलें. पाण्याचें दुर्भिक्ष पाहून भोजनाकरितां सामान घेऊन ओढ्यावरच गेलों. सकाळीं ७ वाजतां जेवल्यापासून कांहीं खाल्लें नव्हतें. भूक फार लागली होती. जेवण उरकलें. पटवारी महाराजापाशीं बरीच चवकशी केली. जम्मूमध्यें पटवाऱ्याच्या पगाराचें स्केल १२ ते २० इतकेंच आहे. पंडितजींची बरीच नौकरी झाली असूनहि त्यांस १६ रु. पगार होता. कागदपत्र सर्व उर्दू लिपींत लिहिलेले होते. ह्या प्रांतांत सर्व लोक खाटेवर झोंपतात. खाटा भाड्यानें ( १ रात्रीस १ आणा.) मिळतात. मजला मात्र फुकट मिळाली होती. सर्व कपडे अंथरावयाचे इतर सामान पडशीच्या एका टोकास करून दुसरें टोक आंगाखालीं घ्यावयाचें व सामान उशास घेऊन निजावयाचें असा क्रम असे म्हणून सामान चोरीस गेलें नाहीं. प्रवासांत सामानास फार जपावें लागतें, नाहीं तर मोठी बिकट परिस्थिति येते.

सकाळीं प्रातर्विधी: उरकून पुढें जाण्याचें ठरविलें. चहा वगैरे जम्मूपासूनच सुटला होता. सकाळीं गांवाखालून वहाणाऱ्या नदीवजा ओढ्यावर गेलों. ओढ्याच्या मध्येंच दोन बाजूंस दोन पत्रे उभारले होते; परंतु कांठाच्या दोन बाजू मोकळ्याच होत्या, त्यावरून लोकांची रहदारी सुरूच होती. पत्र्यांच्या आंतील भागांत स्त्रियांचीं स्नानें व कपडे धुणें वगैरे कामें आंगावरील सर्व कपडे उतरून चाललीं होतीं. कांठावरून जाणाऱ्या लोकांबद्दल त्यांस कांहींच फिकीर वाटत नव्हती. ओढ्यावरून डोंगरावर गांवांत पाणी वहाण्याचें कठीण काम लहान मुलीं सुद्धां शेंकडा ९९ बायकाच करीत होत्या. वहात्या ओढ्याचें पाणी पिण्यास वापरीत नाहींत. ओढ्यावरच २।३ मैल लांबीवर एके ठिकाणीं पाणी बांधानें आडवून तें नळानें बांधून आणलें आहे. त्याच पाण्याचा लोक पिण्याकडे उपयोग करितात. **जम्मूच्या** स्त्रिया पंजाबी स्त्रियांप्रमाणेंच पोषाख करितात. पायांत विजार, अंगांत एक शर्ट व वरती ओढणी. त्या जरी सर्व कपडे उतरून उघड्यावर स्नानें करितात, तरी वाटेंत मला पाहून लगेच तोंडावर ओढणी ओढून बुरखा घेत. त्यांची लाजेबद्दलची कल्पना पाहून मनास बरीच करमणूक झाली. ह्या प्रांतास समुद्रांतील मीठ मिळत नाहीं. डोंगराच्या मिठाचे मोठमोठे खडे मिळतात म्हणून जरुरीपुरतें मीठ बरोबर घ्यावें हें चांगलें. हें जिल्ह्याचें ठिकाण असून येथें बाजारपेठ फार मोठी आहे व पोष्ट व तार ऑफीसहि आहे. येथून **श्रीनगर** १६२ मैल आहे. सकाळीं सुमारें ७॥ वाजतां धर्मशाळा सोडली. रविवार ता. ५।५।२९ रोजीं **उदामपूर**पासून २० मैलांवर असलेल्या चिनांनी नांवाच्या गांवीं करण्याचा विचार होता. उदामपूर पासून २॥ मैलांवरच एक पाण्याचा सुंदर झरा लागला. जवळच एक कुंड बांधलेलें होतें, स्वयंपाक करण्यास जागा चांगली होती. नुकतेंच खाणें झालें असल्यामुळें स्वयंपाक करण्याचा बेत रहित केला. सुमारें ३ तास चांगलें चालणें झालें. पुढें मात्र उन्हाचा त्रास होऊं लागला. एकतर चालण्याची संवय मोडली होती व दुसरें **नेपाळचा प्रवास** ऐन उमेदीच्या वेळीं वयाच्या २२ व्या वर्षी झाला होता. ती तरतरी कौटुंबिक दगदगी १० वर्षें काढल्यानंतर राहिली नव्हती म्हणून त्या वेळच्या व ह्या वेळच्या चालण्यांत फरक पडला. त्या वेळीं रोजीं २५।३० मैल सहज चालतां येई. आतां २० मैल चालण्यानें थकवा येई. असो. रस्ता ठिकठिकाणीं कडे कोसळल्यामुळें पडलेला होता व दुरुस्ती चालली होती त्यामुळें मधून मधून माणसें भेटत असत. मोंगल बादशहाच्या वेळीं **काश्मीरला** जाण्याचा हाच रस्ता होता व ह्या रस्त्यानें वारंवार कडे कोसळत असल्यामुळें व वादळें होत असल्यामुळें एकदां **औरंगजेबाच्या** बरोबरची ४।५ शें माणसें मृत्युमुखीं पडलीं. औरंगजेब मोठ्या शर्थीनें वांचला. हा रस्ता १९२० पासून मोटार जाण्याच्या स्थितींत आला म्हणतात. चालतांना सुद्धां कडे कोसळण्याची भीति वाटते. रस्त्यावर कोसळलेले दगड बाजूला सारण्याची एक नवीनच तऱ्हा पाहिली. एका मनुष्यानें पावडें हातांत घ्यावयाचें व दुसऱ्यानें त्या पावड्याच्या

दुसऱ्या टोकास दोरी बांधून ती हातांत धरावयाची व पहिल्यानें पावडें मारावयाचे व दुसऱ्यानें दोरी ओढून माती बाजूस करावयाची. ह्यायोगानें काम फार जलद होऊन सुकर होई. मजुरांस रोजीं ६ ते ८ आणे मजुरी मिळत असे. सर्व रस्ता डोंगर्याच्या कडेनेंच आहे. डोंगर तापल्यामुळें त्रास फार होऊं लागला. सुमारें १०–११ मैल गेल्यानंतर डोंगराच्या कडेस सावलींत सतरंजी पसरून सुमारें अर्धा तास झोंप घेतली व पुन्हां मार्ग आक्रमण करणार तोंच एक मोटार येऊन तेथेंच उभी राहिली. मोटारमध्येंहि जागा होती व माझाहि जीव हैराण झाला होता. मोठ्या घासाघिशीनें **जम्मू**पासून ९७ मैलांवर असलेल्या **रामबन** गांवापर्यंत १ रु. स नेण्याचें मोटारवाल्यानें कबूल केल्यामुळें मोटारमध्यें बसलों. पुन्हां चढावयास सुरवात झाली. वाटेंत रस्त्याच्या बाजूस हिरव्या, पिंवळ्या रंगाच्या टोळांचीं टोळकीं बसलेलीं असत. तीं सर्व मोटार आल्यावरोबर उडून मोटारींत शिरत अगर दूर पळून जात. मोटारींत शिरलेले टोळ उतारूंची धांदल उडवून देत. बराच वेळ त्यांचीच करमणूक मोटारींत झाली. उदामपूरपासून ३७ मैलांवर डोंगराच्या अगदीं माथ्यावर असलेल्या बटोटे Batote नांवाच्या गांवीं मोटार पोंहोंचली. ह्या ठिकाणीं दुपारीं २ वाजतां इतकी थंडी वाजत होती कीं, मोटार खालीं उतरून मोठ्या आनंदानें उन्ह खात बसलों व पडशींतील आणखी एक सदरा अंगांत घालण्यास काढला. ह्या ठिकाणचे कुत्रे अंगावर लव असल्यामुळें भयंकर दिसत होते. परंतु त्यांच्या जवळ गेल्यावर ते अत्यंत गरीब असल्याचें आढळून आलें. **बटोटे** हें गांव डोंगरमाथ्यावर वसले आहे. उंची ५२००फूट आहे. सभोंवतीं सर्वत्र झाडीच झाडी आहे. बाजूस उंच सुरूच्या झाडासारखीं झाडें असलेले डोंगर दिसत होते व पलीकडे संपूर्ण बर्फाच्छादित पांढरे शुभ्र डोंगर दिसत होते. येथें एक फारेस्ट बंगला, एक डाक बंगला असून पोस्ट व तार ऑफिसहि आहे. गांवांत हिंदूंचीं व मुसलमानांचीं फराळाचीं दुकानें ७।८ असून शिवाय इतर जिनसांचीहि दुकानें आहेत. हिंदूंच्या दुकानांत मांसाचे जिन्नस तयार होत असल्यामुळें मी येथें भोजन केलें नाहीं. बाकीच्या मंडळींनीं दुकानांत आपलें भोजन उरकलें. मांसाहारी मनुष्यास भातरोटी–भाजी वगैरे सर्व जिन्नस मिळूं शकतात. उरलेल्या वेळांत एका गृहस्थाजवळ गप्पा मारीत बसलों, त्यांत बरीच माहिती मिळाली. ह्या ठिकाणाहूनच जम्मू प्रांतांतील **किस्तवाड व पाडर** ह्या भागांस रस्ता जातो. रस्ता घोडे बकरीं माणसें वगैरे जाण्यासारखाच आहे. मोटारी जात नाहींत. **किस्तवाड** येथून ६३ मैल आहे; व तेथून **पाडर** ४८ मैल आहे. **किस्तवाड** व **पाडर** येथील स्त्रिया जगांत अत्यंत सुंदर म्हणून नांवाजलेल्या आहेत, व येथें ५० रु. ते ५०० रुपयांपर्यंत बायका विकतहि मिळतात असें म्हणतात. रस्ता अत्यंत कठीण आहे. **पाडर भागांत नीलमच्या खाणी आहेत.** त्या बघण्यास सरकारी परवाना लागतो. पुष्कळसे युरोपियन लोक **नीलमचा** पहाड पहाण्यास जातात. ह्या प्रांतांत **बौद्ध लोकांची** वस्ती जास्त आहे. देवदार वृक्षांनीं हा प्रांत भरलेला आहे. असो; येथपासून उन्हाच्या

त्रासांतून मुक्त झालों. परंतु आतां पुढें पाऊस व थंडी यांपासून कसा बचाव करावा, ही नवी काळजी उत्पन्न झाली. **बटोटीच्या** पुढें पाण्याचे सुंदर झरे व ओढे लागण्यास सुरवात झाली. पाण्याची गैरसोय ह्या प्रवासांत अगदीं नाहीं. सुंदर देखावे पहात पहात संध्याकाळीं ५ च्या सुमारास **रामबन** नांवाच्या गांवीं येऊन पोहोंचलों. हें गांव **चिनाब** नदीच्या कांठावर वसलें आहे. गांवाजवळ नदी ओलांडण्याकरितां लोखंडी पट्ट्यांचा लोंबता पूल आहे. चिनाब नदीस ह्या भागांतील लोक **चंद्रभागा** म्हणतात. येथें लांकूड कापण्याचे पुष्कळ कारखाने आहेत. नदींतून सारखे लांकडाचे तक्ते वहात चाललेले दिसत होते. हे तक्ते **वझिराबाद्** येथें काढून घेतात. तेथपर्यंत ते बिनखर्चीं पोहोंचते होतात. तक्त्यांवर छाप मारलेला असल्यामुळें कोणत्या कंपनीचे ह्याची ओळख पटते. येथें एक पोष्ट व तार ऑफिस आहे. नदीचें पाणी फार जोरानें वहात होतें. बर्फ वितळून त्याचें पाणी नदींत येत असल्यामुळें पाणी अत्यंत गार होतें. नदीची रुंदीहि येथें बरीच आहे. मोटारमध्यें लांकडाच्या गिरण्यांत काम करणारे बरेच मुसलमान मजूर होते. त्यांस **रामबन** येथें धर्मशाळा वगैरे आहे किंवा कसें असा प्रश्न केला, तेव्हां ते म्हणाले आमच्याकडेच चला. तुमची स्वयंपाक पाण्याची वगैरे सर्व सोय आम्ही करितों. मोटार ड्रायव्हर मुसलमान असून त्यास पंजाबचें पाणी लागलेलें असल्यामुळें हिंदुबद्दलचा द्वेष त्याच्या पोटांत होता. तो त्यांस जरा खोंचून म्हणाला, " अरे ए हिंदू है इसकू धर्मशाळा चाहिये, तुमारा घर नहि चलेगा. " जास्त बोलाचाली करण्याची ती वेळ नसल्यामुळें मी सरळ धर्मशाळेंत गेलों. धर्मशाळा अत्यंत गलिच्छ होती. जवळच एक लहानसें देऊळ होतें. पुजारी ब्राह्मण होता, त्यानें लांकडें वगैरे पुरविलीं. नंतर स्नान करून स्वयंपाक करण्याचा विचार होता. थंडी अतिशय वाजत होती. स्नानाकरितां वरतीच एकादा झरा वगैरे आहे किंवा कसें, ह्याबद्दल चवकशी केली. पुजारीबुवा म्हणाले " अस्नान के वास्ते दर्या मे जाव "—मोठ्या नदीसच इकडे दर्या म्हणतात—पुजारीबुवाजवळून एक भांडें पाण्याकरितां घेऊन व स्नानाकरितां पंचा घेऊन नदीवर गेलों. गांव डोंगरावर, व नदी खालीं म्हणून पाणी आणणें हें त्रासाचेंच काम होतें. पाण्यांत हात घालून पहातां पाणी करवतीसारखें हातास कापीत होतें. अर्थात् त्या थंडींत व त्या पाण्यांत स्नान केल्यास पुढचा प्रवास नको अशी स्थिति व्हावयाची, म्हणून स्नानाचा बेत एकदम रहित केला व पाणी भरण्यास एका लांकडाच्या ओंड्यावर उभा राहिलों, तोंच पाय पाण्यांत गेला. परंतु थोडक्यांत बचावलों नाहीं तर स्नान झालेंच असतें. पोहतां चांगलें येत असल्यामुळें बुडण्याची फारशी धास्ती नव्हती. मोठ्या कष्टानें पाणी आणून ठेवलें व शिधा आणण्यास गांवांत गेलों. गांव डोंगरउतरणीवर बसलें आहे. गांवांत दही मिळालेंच नाहीं. शेवटीं इमली ( चिंच ) चाच उपयोग आंबटाकरितां करण्याचें ठरविलें. तांदूळ १ रु. स ४ शेर, हरभरापीठ ३ शेर, तूप १२ छटाक ह्याप्रमाणें भाव होते. स्वयंपाक तयार होतां होतां दिवे लागून गेले व चांगला काळोख पडला.



**श्रीनगरचा देखावा.**

श्रीनगर चिनारबागेंतील देऊळ.

[ फो. स्टेट रेल्वेजच्या पुस्तकावरून.

मेणबत्तीच्या उजेडांत काम सुरू होतें. पोटांत कावळे ओरडत असल्यामुळें स्वयंपाक तयार करण्यावांचून गत्यंतर नसतें. यथाक्रम मोठ्या आनंदानें भोजन उरकलें व पुन्हां रात्रीच्या वेळीं स्वयंपाक न करण्याचा निश्चय केला. रोज नवा नियम करावयाचा व नवीन धडा शिकावयाचा हें प्रवासांत सारखेंच चालू असतें. धर्मशाळेंत इतकी घाण होती कीं, तेथें निजणें अशक्य होतें. म्हणून १ आणा देऊन रात्रीपुरती एक चौपाई ( चार पायांची खाट ) भाड्यानें घेऊन एका दुकानाच्या पडवींत पथारी पसरली. थंडी अतिशय वाजत होती. चौपाईंत पिसवा होत्या. त्याही त्रास देत होत्या. परंतु दिवसा बराच त्रास झाला असल्यामुळें झोंप आलीच व कांहीं वेळानें दुसरा दिवसही उजाडला. सकाळीं प्रातर्विधी उरकून जवळच असलेल्या झऱ्याचें थोडेंसें पाणी पिऊन चालण्यास सुरवात केली. **रामवन** हें समुद्रसपाटीपासून ३५३५ फूट उंचीवर आहे. येथें ६५०० फूट उंचीचा डोंगर उतरून आलों होतों. आतां पुन्हां चढण्यास आरंभ झाला. इकडचा प्रवास म्हणजे एक डोंगर उतरून झाला कीं दुसरा चढावयाचा व तो उतरून झाला कीं तिसरा चढावयाचा हा क्रम सारखा चालावयाचा. वाटेंत पाण्याचे लहान लहान प्रवाह आडवून त्याच्या जोरावर चाललेल्या पाणचक्क्या दिसत होत्या. परंतु **नेपाळ** प्रांताइतक्या जास्त प्रमाणांत मात्र नव्हत्या. ह्या प्रांतांत आलेले नवीन प्रवासी बहुधा वाटेंत अमांशानें अजारी पडतात. कारण तें मातींतून वाहात आलेलें गढूळ पाणी तसेंच पितात. पाणी गाळून प्यालें असतां, अजारी पडण्याची भीति नसते. पाणी गाळून पीत जा ही सूचना देतांना–जल पीना छान कर और गुरू कर ना जान कर–ही हिंदी म्हणजे " वस्त्रपूतं पिबेत् जलं " संस्कृत म्हण सांगण्याची त्यांची चाल आहे. परंतु ह्या गोष्टींची माहिती मी **नेपाळ, हरिद्वार, डेहराडून** वगैरे भागांतून प्रवास करितांना मजला झाली असल्यामुळें परमेश्वर कृपेनें अजारी पडण्याची वेळ माझ्यावर आली नाहीं. इकडील लोकांची चौर्य कर्माकडे फारशी प्रवृत्ति दिसत नाहीं. कारण दुकानदार दुकानापुढें फळ्यांच्या ऐवजी नुसतें पोतें लावूनच झोंपीं गेला होता. हें ठिकाण साधारणतः पुण्या इतक्याच उंचीवर असल्यामुळें दुपारीं पुन्हां उन्हाचा त्रास होऊं लागला. **रामवन श्रीनगर**पासून १०६ मैल लांब आहे. ९९ व्या मैलावर एक डाक बंगला आहे. **रामवन**पासून सुमारें १०–११ मैलावर एक सुंदर बांधलेलें कुंड व धबधबा लागतो. उन्हाच्या त्रासानंतर हें कुंड लागल्यामुळें अत्यानंद झाला व कपडे काढून येथें मनसोक्त स्नान उरकलें. पाणी गारच होतें, परंतु कडक ऊन पडलें असल्यामुळें फारसा त्रास झाला नाहीं. कांहीं वेळ विश्रांति घेण्याचें ठरविलें. जवळचा रस्ता वाहून गेल्यामुळें तो बांधण्याचें काम चाललेंच होते. तेव्हां मजुरांशीं थोडा वेळ गप्पा मारल्या. वाटेंत ठिकठिकाणीं मजूर भेटत असत. मजुरी रोजीं ६ ते ८ आणे सामान्यतः त्यास मिळते. आंगावर फाटके कपडे, मळकट शरीर पाहून त्यांची कींव येई. एवढ्या थोड्या मजुरींत कपड्यांना खर्च करून त्यांनीं प्रपंच कसा करावयाचा, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

मजूर जातीनें मुसलमान असूनही त्यांची वागणूक अत्यंत सभ्यपणाची आढळून आली. आपल्या इकडल्या मुसलमानांत दिसणारा उर्मटपणा त्यांच्यांत आढळला नाहीं. व ह्यावरून Religions are many but reason is one ह्या म्हणीची सत्यता पटली व धर्म हा मनुष्याची नीतिमत्ता बिघडविण्यास जितका कारणीभूत होतो, त्यापेक्षां जास्त धर्मोपदेशक हेच लोकांची नीतिमत्ता बिघडवितात हा गोष्ट ध्यानांत आली. कारण इकडे राजाश्रयाच्या अभावीं **मुल्ला मौलवींचें** बंड नाहीं. **अमेरिकेंतील** खिस्ती भटांस गुलामगिरी देवास आवडते असा आधार **बायबलांत** सांपडत असे. आंघोळीनंतर पुन्हां हुषारी वाटली. पुढचा मुक्काम **रामसू**–हें ठिकाण कुंडापासून सुमारें ५ मैलांवर आहे–येथें करण्याचें ठरविलें. आतां पुन्हां हवेंत फरक होऊन पाऊस पडण्यास सुरवात झाली. रस्त्यावरचे मजूर तसेंच काम करीत होते. थंडी, वारा व पाऊस ह्यांतच त्यांस काम करावें लागते; त्यामुळें त्यांचीं शरीरें अत्यंत कणखर बनलेलीं दिसलीं. वाटेंत मधून मधून घरें लागतच होतीं. प्रथम निघतांना **चिनाब** डाव्या हातास व डोंगर उजव्या हातास असा रस्ता होता पुढें चिनाब सुटून तिला मिळणाऱ्या **पिशलडी** नदीच्या कांठानें रस्ता चालला होता. क्षणांत पाऊस, क्षणांत अभ्रे,क्षणांत ऊन असा प्रवास करीत करीत संध्याकाळीं ५ च्या सुमारास **रामसू** ह्या नांवाच्या गांवीं येऊन पोहोंचलें. ह्याची उंची ४०७० फूट आहे. हें गांव एका धबधब्याच्या कांठीं वसलें असून एक मोठी नदीही जवळून वाहात आहे. येथून मुसलमान वस्तीचें प्रमाण वाढत वाढत चाललें आहे.पोषाखावरून हिंदू अगर मुसलमान ओळखणें कठीण होत चाललें. **रामबनच्या** मुसलमानास धर्मशाळा विचारल्याबद्दल राग आल्याचें पाहिल्यावरून येथें आल्याबरोबरच एका मुसलमान कान्ट्रॅक्टरचें मोठें घर दिसलें. त्यासच जेवण करण्याच्या व निजण्याच्या जागेबद्दल विचारिलें. त्यांनींही जेवण करण्यास व निजण्यास जागा दिली. जागेजवळच एका सुंदर झऱ्यांतून सारखें पाणी वाहात असून पाण्याच्या जोरावर पलीकडे एक पीठ दळण्याची चक्कीही चालू होती. त्यास जागेबद्दल विचारिलें तेव्हां तेथें एक **पण्डित आनंदराम** म्हणून गृहस्थ बसले होते. मी मुसलमानास जागेबद्दल विचारितों आहे तस्मात् मी सुद्धां मुसलमानच असलों पाहिजे असा त्यांचा ग्रह झाला. कारण माझा पोषाख थोडा त्यांच्या मुलखाच्या मानानें चमत्कारिकच होता, म्हणून त्यांनीं माझी चवकशी केली नाहीं. बाजारांतून शिधा घेऊन आलों व कपडे वगैरे काढून स्वयंपाकाच्या तयारीस लागलों. कपडे काढल्यावर माझ्या गळ्यांत जानवें पाहून पंडित आनंद रामजींस आपली चूक कळून आली व त्यांनीं माझ्याजवळ येऊन माझी विचारपूस करण्यास सुरवात केली व मी **हिंदू** असून **महाराष्ट्रीयन ब्राह्मण** आहे हें त्यांस समजतांच त्यांनीं येथें आतां स्वयंपाक हातानें करूं नका, आमच्याकडेच भोजन करा असें सांगितलें. मी मांसाहारी नाहीं हें मला त्यांस सांगावें लागलें. मग त्यांनीं निर्मांस भोजन तयार करण्यास आपल्या मनुष्यास सांगितलें. पण्डितजी हे एक मॅट्रिक पास

झालेले काश्मिरी ब्राह्मण आहेत. ते येथें स्पेडिंग आणि कंपनींत ( लाकडें कापण्याच्या ) नोकर आहेत. त्यांची मंडळी **श्रीनगरास** असतात. ते येथें एका पंजाबी गृहस्थाकडे जेवतात. त्यांस कंपनींत ६० रु. पगार मिळतो. मी गेलों त्याच दिवशीं त्यांजकडे **पं. दीनानाथ मोझा** नांवाचे फारेस्टर पाहुणे आले होते. ह्या प्रांतांतील लोकांकडे जेवण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता. जेवणास भात, रोटी व डाळ ( गोडें वरण ) असे तीन पदार्थ होते. भूक लागल्यामुळें सर्वच पदार्थ चांगले लागले. गांवांत पत्ते खेळण्याचा अड्डा आहे. तेथें पत्ते खेळण्यासही गेलों. आपल्याकडील पद्धतीनेंच खेळतात. गावांत ब्राह्मण लोकांची वस्ती बरीच आहे. पण्डितजींनीं बऱ्याच मंडळींची व माझी ओळख करून दिली. प्रत्येक जण गुडगुडी ओढण्यास देई; मी मात्र तें नाकारिलें. एकाच नळीस सर्वांनीं तोण्ड लावून ती ओढणें मजला पसंत नव्हतें. मग मंडळी मजला सिगारेट देत असत. **रामसू** हें डोंगराच्या उतरणीवर व नदीच्या कांठावर वसलेलें गांव असल्यामुळें येथील सृष्टिसौंदर्यही अवर्णनीय आहे. घरांची एक पाठ डोंगरास लागलेली व तीन बाजूंस भिंतीभिंती बांधलेली एका खोलीची कोंदट घरें बरींच आढळलीं. परंतु थंडीपासून संरक्षण करण्यास अशींच घरें पाहिजेत. उन्हाळ्यांत घरांच्या छपरांवर खाटा टाकून झोंपण्याची इकडील मंडळींची पद्धत आहे. घरावर कौलें नसून तीं वरतीं सपाट असून त्यांवर माती पसरलेली असते व तीं एकावर एक अशीं बांधलेलीं असतात. कांहीं थोडीं दुमजली कौलारू घरेंही आहेत; परंतु अशीं घरें थोडीं, कोंदट काळोखाचीं, बिन खिडकांचीं घरेंच फार. गरिबांची संख्या सर्वत्रच मोठी आहे आणि गरिबांची स्थिति सर्वत्रच अशी आहे. जेवणापूर्वी पण्डितजींनीं काश्मिरी चहा करून दिला. काश्मिरी चहा दूध न घालतांच घेतात. हा चहा तयार करण्याकरितां आपल्याकडे पाणी तापविण्यास असतात तसें लहान लहान बंब घरांतील माणसें असतील त्या मानानें असतात; त्यांत तयार करितात. प्रत्येक घरीं २।३ बंब असावयाचेच. त्यांत निखारे टाकून वाटेल तेव्हां १०।१५ मिनिटांत चहा तयार होतो. कांगरींत विस्तवही सारखा जिवंत असतो. पाण्यांत साखर, हिरवीं चहाचीं पानें हे मुख्य पदार्थ व ऐपतीप्रमाणें बदाम, बेदाणा, दालचिनी, सुंठ वगैरे पदार्थ टाकून पाण्यास १०।१५ मिनिटें उकळी येऊन झाली कीं तें पाणी तसेंच प्यावयाचें. गाळण्याचा प्रघात नाहीं. चहा पिण्याकरितां आपल्याकडच्या प्रमाणें चिनी मातीच्या भांड्यांचा उपयोग न करितां चहा पितळेच्या पेल्यांतच पिण्यास देतात. पेला फडक्यावर ठेवून चहा पेल्यास ओंठ न लावतां प्याला पाहिजे. ओंठ लावल्यास भाजतो इतका चहा कढत असतो. प्रथम प्रथम माझे ओंठ भाजले. परंतु पुढें मी वरच्यावर फुंकर मारून चहा पिण्याच्या कामांत तरबेज झालों. चहापानानंतर शेकण्याकरितां शेगडी आली. हिचें नांव कांगरी. ही आपल्याकडे फुलांची परडी असते तशा आकाराची असते. वरती परडी सारखें वेल विणून आंत एक मोठी पंतीसारखी खापराची वाटी ठेविलेली असते व तींत

विस्तव घालून ती शेकण्यास देतात. कांगरी घरांतील प्रत्येक माणसागणिक एक असून शिवाय पाहिपाहुण्यांकरितां कांहीं जादाही असतात. पाहुण्याचें पहिलें आदरातिथ्य त्यास शेगडी देणें, दुसरें गुडगुडी देणें, तिसरें चहा, व चौथें जेवण असा प्रकार इकडे आहे. सुमारें ५० वर्षांपूर्वी चहा व गुडगुडी ह्यांचा प्रसार फारसा नव्हता. आतां तो दिवसेंदिवस वाढत चालला आहे. १९१७ सालीं **नेपाळांत** फिरत असतांना तिकडे आईबाप बहीण भाऊ ह्या सर्वांनीं एकत्र बसून गुडगुडी ओढण्याची जी चाल आढळली, ती ह्या प्रांतांत पाहाण्यांत आली नाहीं. नेपाळांत चहा फारसा आढळला नाहीं, तो इकडे फार आढळला. चहाचें प्रमाण दिवसांतून २ ते १० वेळांपर्यंत वाढलें आहे, म्हणून लोकांचें दारिद्र्य दिवसेंदिवस वाढत चाललें आहे.


साखर किरकोळ ८० तोळ्यांचा ८ आणे शेर भावानें विकली जाते. पूर्वी नुसत्या शेगडीच्या उष्णतेवर काम भागत असे; आतां चहाशिवाय उष्णता उत्पन्न होत नाहीं. परंतु **चहा घेत घेत चहाविरुद्ध ओरड करणारे लोक आढळून येतातच.** भोजनाकरितां ब्लँकेटांची योजना करितात, बसण्याकरितां एक ब्लँकेट पसरलें असून ताटें ठेवण्याकरितां दुसरें ब्लँकेट पसरलें होतें, त्यांवर ताटें ठेविलीं. ब्लँकेटावर चित्रावती घातल्या तर ब्लँकेट खराब होणार, न घालाव्या तर आपण ब्राह्मण नाहीं अशी शंका मंडळीस येणार, म्हणून थोडा विवंचनेंतच पडलों. म्हणून मला जेवणास आरंभ करण्यास सांगितलें असूनहि **आनंदरामजींच्या** आरंभ करण्याची वाट पहात बसलों. त्यांनीं भाताचें एक मुटकलें करून ताटाबाहेर ठेवून दिलें. मग मीहि ( चित्रगुप्त, यमधर्म वगैरे ) सर्व मंडळींना एकत्र भोजन करण्याबद्दल प्रार्थना करून त्यांच्या संमतीची वाट न पहातां एक मुटकलें ताटाबाहेर ठेविलें व भोजनास आरंभ केला. **जम्मू** प्रांतांत गोषाची चाल असल्यामुळें वाढण्याचें काम पुरुषांकडेच होतें. जेवण व्यवस्थितपणें पार पडलें. दुसऱ्याचें होईपर्यंत थांबण्याची चाल इकडे सुद्धां आहे; हात धुणें ताटांतच उरकलें. मात्र मागून हातांवर घालण्याकरितां थोडें स्वच्छ पाणी मिळालें. रात्रीं पंडितजींनीं एक मोठी खाट व अनेक पांघरुणें दिल्यामुळें झोंप फार चांगली लागली. शेगडीची व्यवस्था होतीच. निजण्यास जागा उघड्यावर पडवींत मिळाली होती. अनोळखी मनुष्यास घराच्या आंतील भागांत जागा क्वचितच मिळते व अनोळखी माणसानें तशी अपेक्षाहि करूं नये. पाहिजे तर एकादें पांघरूण जास्त मागून घ्यावें व कोणी आंत जागा देण्यास तयार झाला तरी शक्य तोंवर नाकारावी म्हणजे तो एक प्रकारच्या जबाबदारींतून मुक्त रहातो. सकाळीं उठून प्रातर्विधि उरकल्याबरोबर पंडितजींची जाण्याबद्दल आज्ञा मागितली. परंतु चहा व जेवण झाल्याशिवाय मी तुम्हांस सोडणार नाहीं, असें पंडितजींनीं मनापासून आग्रहपूर्वक सांगितल्यामुळें जाण्याचा बेत पुढें ढकलला. कारण घर सोडल्यापासून वाटेंत बराच त्रास झाला होता. विश्रांतीची जरूरी होतीच; ती अनायासें चालून आल्यावर तिला माघारी कोण दवडणार? पंडितजी व त्यांचे स्नेही ह्यांजपाशीं अनेक

विषयांवर गप्पा झाल्या. इंग्रजी हीच सर्वांची एक भाषा होती. ह्या प्रवासांत प्रथम तीन दिवस बराच त्रास भोगल्यानंतर पंडितजींच्या रूपानें परमेश्वरानेंच मला भेट दिल्याचा भास झाला. कारण त्यांनीं सकाळीं गरम चहानंतर उत्तम जेवण व जातांना पुढल्या ३ मुक्कामांच्या जागीं त्यांच्या ३ स्नेह्यांस ओळखीच्या व मदत करण्याबाबतच्या चिठ्ठया दिल्या. इकडील प्रांतांत फिरतांना अन्नापेक्षां वस्त्र व निवाऱ्याची जागा ह्या दोन गोष्टी दुसऱ्यापासून मिळवाव्या लागतात. हिंदुस्थानांत इतर ठिकाणीं फिरतांना मला ह्या दोन गोष्टींची जरूर भासली नाहीं. कारण सामान्य थंडीस तोंड देण्याइतकें वस्त्र पाठीवर वागवून प्रवास करितां येतो व धर्मशाळा नसल्यास उघड्या जागेवर झोंपल्यानें कांहीं बिघडत नाहीं. थंड प्रदेशांत तसें चालत नाहीं. अन्नाकरितां ह्या प्रवासांत मजपाशीं थोडेसे पैसे होते. नसते तरीहि प्रवासांत हातानें जेवण केल्यास २।३ आण्यांपेक्षां जास्त खर्च येतहि नाहीं. हिंदुस्थानच्या कोणत्याहि भागांत बायकांकडून भिक्षा जरूर मिळते. पंडितजींच्या उदार अंतःकरणाची साक्ष त्यांच्या पुढील वाक्यावरून मजला चांगलीच पटली. ते म्हणाले " तुम्हांस कोणतीहि अडचण प्रवासांत आल्यास मजला कळवा ती मी दूर करीन. पैसे लागल्यासहि कळवा. पाठवीन. " मी ह्याबद्दल त्यांचे अत्यंत आभार मानले व लगेच सांगितलें कीं, पैसे पाठविण्याच्या संकटांत मी तुम्हांस कधींहि घालणार नाहीं. परंतु वाटेंत हातपाय अडल्यास मात्र मजला माणसांची जरूर लागेल. माझ्या देशांत तार केली तरीहि माझे स्नेहि येथें येऊन पोहोंचण्यास ८ दिवस लागतील. पैसे ताबडतोब येतील. अशा संकटांच्या वेळीं मी परमेश्वरास हांक मारणारच होतो. आतां त्याच्या बरोबर तुम्हांसहि हांक मारीन. कारण पुढें बर्फाचा पर्वत ओलांडावयाचा होता. बर्फाचे पर्वत ओलांडतांना मधून मधून अपघात होतात, ही माहिती झालीच होती. सकाळचा चहा घेऊन थोडा फेरफटका करण्यास गेलों. पंडितजींच्या एका स्नेह्यानें चहाचें आमंत्रण दिलें होतें त्यांजकडे चहा, वड्या वगैरे पाहुणचार झाला. गांवांत पंडितजी बरेच लोकप्रिय आहेत. भोजन उरकून मोठ्या दुःखानें पंडितजींचा निरोप घेऊन **रामसू** सुमारें ११ वाजतां सोडलें. पंडितजींचें वय अवघें २८ वर्षांचें असून स्वभाव उदार व मनमोकळा व प्रकृतिमान उत्तम आहे. पंडितजींसारखीं माणसें विरळाच भेटतात. आज ता. ७।५।२९. ११ वाजले तरी सूर्यदर्शन नाहीं. हवा थंड असून आकाशांत सर्वत्र ढग दिसत होते. रस्त्याच्या कडेनें सारखें पाणी वहात होतें; मात्र पोटभर जेवण पदरांत पडलें असल्यामुळें चालण्याचा त्रास वाटला नाहीं. १ वाजण्याच्या सुमारास पाऊस पडण्यास सुरवात झाली व बराच भिजलों. जवळ छत्री नव्हतीच. सतरंजीचाच छत्रीप्रमाणें उपयोग केला. सतरंजीच्या ऐवजी घोंगडी घ्यावयास पाहिजे होती. परंतु ती चूक होऊन गेली होती, आतां सुधारणें शक्यहि नव्हतें. पुढच्या प्रवासांत सुधारण्याचें ठरविलें. थंडीनें काकडून गेलों, परंतु विडीशिवाय उष्णता उत्पन्न करण्याचें दुसरें साधन नाहीं. रामसूपासून १० मैलांवर बानिहाल नांवाचें मोठें गांव आहे. येथें पोष्ट व तार ऑफिस आहे. मोठें

म्हणजे २५।४० घरांचे. पहाडी प्रदेशांत वाटोवाट अंतराअंतरावर डोंगराच्या कपारीला माथ्यावर अशी वस्ती सारखी असते. आपल्याकडचीं खेडीं हीं पहाडी प्रदेशांतील मोठी गांवें होत.

गांवाच्या अलीकडे १ मैलापासूनच भातशेतीस सुरवात झाली. डोंगराळ प्रदेशांत हिरवीगार थोडीशी सपाट जागा पाहून फार आनंद झाला. गांव दिसल्यामुळें चहा वगैरे मिळून श्रमपरिहार होण्याची व थोडीशी उष्णता अंगांत उत्पन्न होण्याची आशा वाटूं लागली. ३ च्या सुमारास गांवांत पोहोंचलों. पंडित **आनंदरामजींनीं बनिहाल** येथील तारमास्तर **पंडित दिनानाथ** ह्यांस चिठ्ठी दिली होती व त्यांजकडे रहाण्याबद्दलहि मजला सांगितलें होतें; परंतु ३ तास दिवस अंगावर असल्यामुळें येथून ४॥ मैलांवर असलेल्या **टकिया** नांवाच्या गांवींच मुक्काम करण्याचें मी ठरविलें होतें. **आनंदरामजींनीं** चिठ्ठी इंग्रजींत लिहिली होती व तींत " एक सभ्य गृहस्थ दुसऱ्या सभ्य गृहस्थाची जशी व्यवस्था ठेवतो तशी व्यवस्था ह्यांची ठेवा " असें मुद्दाम लिहिलें होतें. मी राहणार नव्हतोच; परंतु चिठ्ठी आणलीच आहे तर ती त्यांस द्यावी व आणखी एका काश्मिरी गृहस्थाजवळ विचारविनिमय करावा, थंडीनें व पावसानें त्रास दिलाच आहे अर्थात् चहा विचारला तर तो घ्यावा व मार्गस्थ व्हावें, असा विचार करून पोष्टांत गेलों. पोष्टमास्तरनीं पंडितजी घरीं गेले आहेत आमचा मनुष्य तुम्हांस त्यांचें घर दाखवील असें म्हणून एक मनुष्य देऊन माझी त्यांजकडे रवानगी केली. मजला रस्त्यावर उभे राहण्यास सांगून बरोबरचा मनुष्य चिठ्ठी घेऊन माडीवर पंडितजी रहात होते तिकडे गेला. मी रस्त्यावर कांहीं तरी निरोप येईल म्हणून वाट पहात १५।२० मिनिटें पावसांत भिजत तसाच उभा राहिलों. बरीच मंडळी गॅलरींत येऊन मजकडे पाहून गेली; परंतु कोणीं मजला वर बोलाविलें नाहीं. किंवा कांहीं निरोपहि दिला नाहीं. कारण माझा पोषाख त्यांनीं मला वर बोलवावें असा नव्हता. त्यांना मी कदाचित् सभ्य गृहस्थच वाटलों नसेन. कारण आमच्याकडे साधारणतः पोषाखावरून सभ्यपणा ठरविला जातो. अर्थात् त्याचा उघड अर्थ असा होतो कीं, चांगला पोषाख करणारा श्रीमंत हा वाईट पोषाख करणाऱ्या गरिबाहून जास्त सभ्य असणार. परंतु मी १९१६ सालीं सर्व हिंदुस्थानभर भिक्षा वृत्तीनें केलेल्या प्रवासाच्या वेळीं भिकाऱ्यांच्या मेळ्यांत, अन्नछत्रांत, धर्मशाळेंत, काळ काढला आहे. दारापुढें उभें राहून मिळालेली भाकरीहि चाखली आहे व स्काउट मास्तरचें काम करीत असतांना गव्हर्नरसाहेबाच्या बंगल्यावरची ॲटहोम पार्टीहि झोडलेली आहे. अनेक छोट्यामोठ्या सरदार संस्थानिकांशींहि माझा संबंध अनेक कारणास्तव आला आहे. माझा पूर्ण अनुभव असा आहे कीं, उत्तम पोषाखाच्या श्रीमंतापेक्षां साध्या पोषाखाचे गरीबच जास्त सभ्य असतात. बोल्शेव्हिकांचें तत्त्वज्ञान असेंच आहे कीं, **दुसऱ्याचे श्रम फुकट घेतल्याशिवाय कोणास श्रीमंत होतांच येत नाहीं.** व दुसऱ्यास फुकट राबून घ्यावयाचें म्हणजे सभ्यपणा, सदसद्-

विवेकबुद्धि यांस फांटा द्यावाच लागतो. २० मिनिटांनीं वाट पाहून पुढें चालण्यास सुरवात केली. परमेश्वरानें सर्व प्रकारचे लोक ह्या जगांत निर्माण केले आहेत. ह्यांचा अनुभव पूर्वींच्या प्रवासांत अनेकवार आलाच होता. त्याची नवी आवृत्ति निघाली इतकेंच. हें सांगण्याचा हेतु इतकाच आहे कीं, जगांत सर्व प्रकारचीं माणसें भेटतात. नंतर चहाच्या दुकानाची चवकशी केली. एक हिंदूचें फराळाचें दुकान होतें, परंतु त्यांजकडे चहा नव्हता म्हणून एका मुसलमानाच्या दुकानांतून चहा पाव वगैरे जिन्नस घेऊन खाल्लें व चालण्यास आरंभ केला.




**काश्मिरी पंडीत.**

**बनिहाल**पासून सुमारें ३ मैल गेल्यानंतर **श्रीनगरा**पासून ८० व्या मैलांवर एक पूल लागतो, त्या पुलापासूनच उजव्या हातास टेलिग्राफची तार गेली आहे. तेथून रस्ता उजव्या हातास फुटतो. रस्ता, माणसें, बकरीं, घोडे वगैरे जाण्यासारखा आहे. घोड्यावर बसून जाणें धोक्याचेंच आहे. येथून **बनिहाल** ह्या नांवाच्या घाटास सुरवात होते. हा घाट सडकेनें गेल्यास सुमारें ३० मैल आहे. हा घाट **पिरपंजाल** नामक नेहमीं बर्फानें आच्छादिलेला मोठा पर्वत ओलांडण्याकरितां बांधला आहे.

मी मधल्या रस्त्यानें जावयाचें ठरविलें. कारण मधल्या रस्त्यानें **व्हेरीनाग**

नांवाचें **काश्मीरमधील** रम्य ठिकाण सुमारें १४।१५ मैल पडतें तेंच सडकेनें गेल्यास सुमारें ३२ मैल पडतें. ह्या मधल्या वाटेस **डंडी** म्हणतात. मी **व्हेरीनागला** जावयाचें आहे असें सांगितल्याबरोबर लोक लगेच सांगत " हाँ टकियासे डंडी चलती है उंसीसे जाव. " सडकेपासून मैलें दीड मैलावर साधारणपणें थोड्याशा उंचीवर **टकिया** या नांवाचें खेडें आहे. ह्यापुढें मात्र **व्हेरीनाग**पर्यंत वस्ती नाहीं. ह्या गांवांत मुसलमानांचीं ५।६ व हिंदूंचीं ३।४ मिळून ८।१० घरें आहेत, येथें पी. डब्ल्यू. डी. चा स्टोअर आहे. त्याचे ओव्हरसियर **पंडित सर्वानंद** येथें राहातात. त्यांसच **पंडित रामजींनीं** चिठी दिली होती. चिठी उर्दूत होती. येथें संध्याकाळीं ५॥ च्या सुमारास पोहोंचलों. सडकेनें **व्हेरीनागला** जावयाचें असेल, तर ३० मैल घाट ओलांडल्यावर लोअरमुंडा ह्या नांवाचें ठिकाण लागतें. येथून **व्हेरीनागला** स्वतंत्र सडक आहे व तेथून व्हेरीनागचें अंतर १॥ मैल आहे. **श्रीनगर** पाहाण्यास



**शंकराचार्यांचें देऊळ, काश्मीर.**

आलेले प्रवासी **व्हेरीनाग** पाहिल्याशिवाय जातच नाहींत. व्हेरीनाग ते श्रीनगर अंतर ५० मैल आहे. म्हणजे मी वाटेंतच हें गांव घेतल्यामुळें माझा १०० मैलांचा हेलपाटा वाचला. असो. पंडितजी खिडकीजवळ निर्णयसागरचा बृहत्स्तोत्ररत्नाकर, लक्ष्मीवेंकटेश्वरची सार्थ गीता, वगैरे पुस्तकें वाचीत बसले होते. त्यांस चिठी दिली. त्यांनीं बसण्यास सांगितलें. परंतु विचारपूस वगैरे कांहीं केली नाहीं. थोडासा चमत्कारच वाटला. परंतु **टकिया** हें ठिकाण **पिरपंजाल** ह्या बर्फाच्छादित पर्वतावरच वसलें असल्यामुळें येथें थंडीचें प्रमाण फारच वाढलें होतें. कोणाच्या तरी घराचा आश्रय करणें जरूरच होतें म्हणून तसाच बसलों.

कांहीं वेळानें पंडितजी कांहींएक चवकशी न करितां बाहेर निघून गेले. ते टकि-

यास एकटेच राहातात. मीही आपली पडशांतील सार्थ गीता काढून वाचीत तेथेंच लवंडलों. कांहीं वेळानें पंडितजी परत आले. माझें पुस्तक पाहून काय वाचतां म्हणून विचारिलें. मी ' गीता ' म्हटल्याबरोबर तुम्हांस गीता समजते काय ? असा त्यांनीं प्रश्न केला. माझी गीता सार्थ होतीच. शिवाय **डॉ. भांडारकरांचीं** दोन पुस्तकें, थोडासा **रघु** व थोडेंसें **उत्तररामचरित** ह्यांचें अध्ययन परीक्षेकरितां करावें लागलें असल्यामुळें साधारण समजतें असें मी सांगितलें.

ह्या प्रांतांत सर्व पत्रव्यवहार उर्दूंत चालतो. काश्मिरी लोकांची **शारदी** नांवाची भाषा आहे. परंतु तिला स्वतंत्र लिपी नाहीं. व तींत ग्रंथसंपत्तीही नाहीं नुकतेच कांहीं ग्रंथ **शारदी**मध्यें झाल्याचें समजलें. देशभाषा **उर्दू** व दुसरी भाषा



**गंधारबल.** [ लॅंबर्ट काश्मीर

**पर्शियन** ह्यांच्या अध्ययनामुळें संस्कृत इकडल्या मंडळीस कळण्यास त्रास पडतो आपल्याकडील भाषा संस्कृतपासून निघाल्या असल्यामुळें आपल्याकडील मंडळींस संस्कृत लवकर कळतें. आपणांस संस्कृत यावें, अशी इच्छा असलेली बरीच मंडळी इकडे आहेत. प्रत्येक पंडिताजवळ **बृहत्स्तोत्ररत्नाकर व गीता** हीं पुस्तकें आहे-तच. गीतेचा अर्थ सांगण्याबद्दल बऱ्याच मंडळींनीं आग्रह केला. मीं गीतेचें अध्ययन केलें नसल्यामुळें, मला अर्थ सांगतांही आला नसता; परंतु बरोबरची गीता सार्थ असल्यामुळें व मंडळी संस्कृत जाणणारी नसल्यामुळें माझा बचाव झाला. त्यांस तर मी **गीतावाचस्पतीच** वाटलों. मी आपली खरी किंमत जाणूनच होतों. श्लोकांचा खुलासा हिंदींत अगर इंग्रजींत करीत असे. दोन्ही भाषा मी घरींच तयार केल्या आहेत. त्यांवर शाळेचा संस्कार नाहीं म्हणून त्यांवर प्रभुत्व नाहींच. परंतु आलेल्या प्रसंगास तोंड देणें, भागच पडत असे. **पायीं प्रवास करणाऱ्या हिंदूजवळ गीता अवश्य पाहिजे. गीताभ्यासी तिकडे गेल्यास त्याची चांगली चहा होईल.**

पंडितजींनीं गीतेंतील कांहीं श्लोकांचा अर्थ विचारला. तो त्यांस यथाशक्ति सांगितला. परंतु त्यास पटला. नंतर लहानपणीं पाठ केलेली बृहत्स्तोत्ररत्नाकरांतील कांहीं स्तोत्रें पंडितजींस पाठ म्हणून दाखविलीं. मग त्यांचा माझ्याबद्दल चांगला ग्रह झाला व ते खुलेपणानें मजपाशीं बोलूं लागले. प्रथम त्यांनीं चहा विचारला. मी लगेच संमती दिली. चहा पिण्याकरितां तेथें एक वैष्णव पंडितांचें किराणा मालाचें दुकान होतें. तेथें मजला पंडितजी घेऊन गेले. वैष्णव पंडित मांसाहारी नसतात. म्हणून त्यांजकडेच माझी जेवणाची पण सोय करण्यांत आली. **सर्वानंदजी** कोठें जेवले, तें समजलें नाहीं. ते शाकाहारी नसावेत. थंडीचा जोर सारखा वाढत चालला होता; परंतु गेल्यापासून कांगरी मिळाली होती तिच्या आश्रयानें थंडीस तोंड देत होतों.

येथें प्रथम काश्मिरी जेवण मिळालें. काश्मिरांत आपल्याकडच्याप्रमाणें वारंवार पदार्थ वाढण्याची पद्धत नाहीं. जेवणाराच्या पोटाचा अंदाज बांधून पावशेर भाताचा



**शालिमारबाग, श्रीनगर.** [ लँवर्ट काश्मीर

बळी व त्यावर उगीच लहानशा लिंबाएवढी कसली तरी पालेभाजी घालून ताट पाहुण्यापुढें आणून ठेवावयाचें. ताट चांगलें मोठें असतें. सतरा पंधरा पदार्थ करण्याची इकडे पद्धतच नाहीं. पुन्हां भात अगर भाजी इकडील मंडळी घेत नाहीं. पाहुण्यास रीतीचें एकदां विचारतात. मी मात्र भाजी न विसरतां मागून घेत असे. सकाळीं एकदां भाजी व भात शिजवून तो दिवसभर खावयाचा. भाजी चिरण्याची पद्धत नाहीं. सबंध पानेंच शिजविलीं जातात. स्वयंपाक बहुधा मातीच्या भांड्यांत तयार करितात, व वाढण्याकरितां हीं मातीचींच भांडीं असतात. ताटें मात्र धातूंचीं असतात. काश्मिरी लोकांकडे जेवण वाटेल तेव्हां मिळूं शकतें. पोळी खाण्याची पद्धत इकडे नाहींच. मी कोंकण प्रांताचा राहाणारा असल्यामुळें व नुसता भात खाण्याची मजला संवय असल्यामुळें मजला त्रास पडला नाहीं. भाकरी अगर पोळी खाणारास हातानेंच

स्वयंपाक केला पाहिजे. निजण्याकरितां खाट व ४।५ ब्लँकेटें पंडितजींनीं दिल्यामुळें झोंप फार चांगली लागली. अंथरूण पाहुणा घालीत असतां त्यास मदत करण्याची चाल इकडे सर्वत्र आहे. पाहुण्याचें आदरातिथ्य फार चांगलें करितात.

सकाळीं पंडितजींचा निरोप घेऊन व त्यांचे आभार मानून सुमारें ७ वाजतां बाहेर पडलों. चहाची सोय झाली नाहीं. डोंगर चढण्यास आरंभ केला. मेंढरें, घोडीं, माणसें ह्यांची रहदारी होतीच. ता. ८।५।२९. आज सारखा चढाव सुरू झाला होता. आतां चढाव संपेल अशी कल्पना करीत सारखा चढत होतों. प्रत्येक क्षणास थंडीचें प्रमाण वाढत चाललें होतें. आकाश आभ्राच्छादित असल्यामुळें सूर्यप्रकाशा-चाही कांहीं उपयोग होत नव्हता. सर्वत्र बर्फाच्छादित पर्वत दिसत होते. मधून मधून पाऊसही भेट देत होता. वारा तर मनस्वी सुटला होता. वाटेंत विसावा घेण्याकरितां २।४ फर्लांगांच्या अंतरानें दगडी धर्मशाळा १०×१० फुटाच्या बांधलेल्या आहेत. ह्या धर्मशाळांचा, निवाऱ्याची घाणेरडी जागा, ह्यापेक्षां जास्त उपयोग नाहीं. आंत मेंढरांच्या वास्तव्यामुळें फार घाण असते. सारखा ३।४ तास चढत होतों. घड्याळ व रस्त्यावर मैलाचे दगड नसल्यामुळें किती वेळ चाललों व किती मैल चाललों ह्याचा पत्ताच लागत नव्हता. खांद्यावर १२।१३ शेरांचा बोजा घेऊन उपासपोटीं चालतांना व चढतांना संध्याकाळीं मजेंत फिरावयास जातांना पडणारें चालचें प्रमाण पडत नाहीं. मधूनमधून धर्मशाळांचा आश्रय करीत असे. बहुधा तेथें एकादेंच मिनीट थांबत असे. एकदां बसल्यावर उठावेसेंच वाटत नाहीं, म्हणून हळूंहळूं कां होईना पण सारखें चालण्याचा क्रम ठेविला होता. चढाव म्हणण्यासारखा भयंकर नाहीं.

चढाव संपून वरती गेल्याबरोबर **काश्मीरचें दर्शन झालें. टकिया** हें गांव **जम्मू** संस्थानांत मोडतें. **काश्मीर** व **जम्मू** हीं दोन्हीं संस्थानें एकाच राजाच्या अमलाखालीं आहेत. आतां सर्वत्र पांढरी शुभ्र जमीन दिसत आहे. अगदीं हाताशीं असें बर्फ आजच पाहिलें. बर्फांत काठी मारून आंतलें बर्फ खाऊन पाहिलें. दातांतून कळा आल्या. कारण बाहेर थंडी व ही पोटांत थंडी. तेव्हां फार बर्फ खाण्याचा विचार सोडून दिला. डोंगरावर पडलेलें बर्फ—मॉरिशसच्या साखरेसारखें असतें. काठी मारल्यास सहज १।२ फूट आंत जातें. वरचें बर्फ भुसभुशीत असलें तरी खालचें बर्फ वरच्या बर्फाच्या वजनानें घट्ट झालेलें असतें व वितळण्याचें काम सुरू असतें. जिकडेतिकडे पाणी वाहात होतें, इतर बर्फाच्छादित पर्वतावर झाडी दिसत नाहीं. परंतु ह्या पर्वतावर मधूनमधून झाडेंही दिसतात. समुद्रसपाटीपासून सुमारें ८००० फूट उंचीवरच्या प्रदेशावर नेहमीं बर्फ असतें. **पिरपंजालची** उंची ११४०० फूट आहे. अर्थात् तो नेहमीं बर्फाच्छादित असतो. ह्या पर्वताच्या वरती वस्ती नाहीं.

**काश्मीरची** शोभा उंचावरून पाहाण्याकरितां श्रीमंत व हौशी प्रवाशी **गुलमर्ग** अगर **पेहेलगांव** येथें जातात. हीं ठिकाणें ८।९ हजार फूट उंचावर आहेत व येथें राहाण्याकरितां हॉटेल्स असून मोटारनें जातां येत असे. तेथून दिसणारा

देखावा मजला **पिरपंजालच्या** शिखरावरूनच दिसल्यामुळें मी तिकडे जाण्याचा बेत त्यावेळीं तरी रहित केला. पुन्हां योग आल्यास पाहूं. येथून संपूर्ण **काश्मीरचें दर्शन होतें.** चोहोंबाजूंनीं पांढरें शुभ्र बर्फाच्छादित पर्वत असलेला ८५ मैल लांब व ४१ मैल रुंदीचा काश्मीर हा सपाट प्रदेश आहे. सभोंवतीं असलेल्या डोंगरांवरील बर्फ वितळल्यामुळें काश्मिरांत जिकडेतिकडे पाणीच पाणी झालें आहे. चढण संपेपर्यंत सडक व मधला रस्ता ह्यांची गांठ पडत नाहीं. परंतु चढण संपून उतरण्यास सुरवात झाली कीं मधून मधून सडकेनें प्रवास करून पायवाटेस मिळावें लागतें. घोडें व बकरीं ह्यांच्या पावलांवरून पायवाटेचा तपास लागतो. सडकेचा उपयोग बहुधा मोटारीं करितांच होतो. उतरूं लागल्याबरोबर कांहीं वेळानें सडकेवर असलेला एक बोगदा लागला. बोगद्याचें काम १९२० सालीं पुरें झालें असून त्याची लांबी ६६० फूट आहे. बर्फानें सर्व बाजूं आच्छादिल्या असल्यामुळें बोगदा पाहून अत्यानंद होतो. जणूं कांहीं एक बर्फाचें घरच आपण पाहात आहों, असा भास होतो.

उतरतांना बराच वेळ प्रवास बर्फांतून करावा लागतो. रस्ता साफ ठेवण्याकरिता सरकारी माणसें आहेतच. तीं बर्फ काढून टाकून रस्ता साफ करण्याचें काम करीतच असतात. परंतु कांहीं ठिकाणीं बर्फाचें प्रमाण इतकें मोठें असतें कीं, तें काढून टाकून रस्ता साफ करणें शक्य नसतें. म्हणून वरचें भुसभुशीत बर्फ काढून साधारणतः पाय घसरणार नाहीं. इतपत रस्ता बर्फावरून तयार केला होता. घसरण्याची भीति वाटत असल्यामुळें अत्यंत जपून चालावें लागतें. नाहीं तर तेथेंच मोक्ष मिळावयाचा. चालतांना पायांस थंडी वाजून पायांतून कळा येत होत्या. गरीब लोक गवताचीं पायतणें



श्रीनगर [ लँवर्ट काश्मीर.

घालून चालत होते. ह्या पायतणास १।२ पैसे पडतात व तीं फारच थोडे दिवस टिकतात. परंतु पायांत न घालतां चालणें अशक्यच असल्यामुळें, गरीब लोक तीं

630



घेतात. माझ्या पायांत कातड्याचे बूट होते, तेही भिजून गार झाले होते, कांहीं वेळ थांबल्यास पायांत चालण्यामुळें उत्पन्न झालेल्या उष्णतेनें ते थोडेसे सुकत. पुन्हा चालण्यास सुरवात करावी, पुन्हा बूट भिजावे असा क्रम चालला होता. बर्फांतून ४।५ फर्लांगापेक्षां जास्त प्रवास करावा लागत नाहीं. व तोही एकसारखा न लागतां मधून मधून करावा लागतो. प्रथम त्याची मजाच वाटते. पुढें त्याचा त्रास होऊं लागतो. परंतु त्रासाची परमावधि होण्यापूर्वीच तो संपतो. म्हणून कोणीही घाबरून जाण्याचें कारण नाहीं. कांहीं वेळानें पाऊस पडण्यास सुरवात झाली. उतरण उतरत उतरत चाललों. जिकडे तिकडे पाण्यानें भरलेलीं शेतें दिसत असून त्यांत मुसलमान शेतकरी काम करीत होते. दुपारीं सुमारें २ वाजण्याच्या सुमारास **व्हेरीनाग** नांवाच्या अत्यंत सुंदर ठिकाणीं येऊन पोहोंचलों. सुप्रसिद्ध मोगल बादशहा **जहांगीर** ह्याची इच्छा **काश्मीरमध्यें व्हेरीनाग** येथें जाऊन प्राण सोडावा अशी होती, इतकें हें ठिकाण रम्य आहे. ह्या ठिकाणाहून सबंध **काश्मीर** प्रांतांत खेळलेली **झेलम** अगर **वितस्ता** नदी निघते.

## काश्मीर.

**काश्मीर** प्रांतास महत्त्व प्राप्त होण्याचीं कारणें अनेक आहेत. येथील हवा **इंग्लंड**सारखी आहे, म्हणून थोडी रजा मिळालेले इंग्रज येथें येऊनच थंड हवेचा आनंद उपभोगितात. कारण इंग्लंडला जाऊन जावें तर नमुन्यावारीच १ महिना जावयाचा. येथें २।३ दिवसांत पोहोंचतां येतें. दुसरें ही एक समुद्रसपाटीपासून ५००० फुटांवर असलेली सपाटभूमि आहे. हिमालयांत इतकी सपाटभूमि कोठेंही नाहीं. नुसत्या डोंगरास कांहीं किंमत नसून ज्यावर वस्ती करण्यासारखी सपाटी आहे, त्या डोंगरास किंमत असते, तशी काश्मीरची परिस्थिती आहे. काश्मीर हा प्रांत इतका सपाट आहे कीं काश्मिरांत होडीनें एका ठिकाणाहून दुसऱ्या कितीही लांबच्या ठिकाणीं जातां येतें. कारण अनेक सरोवरें, पाट व ओढे सर्वत्र आहेत व तीं एकमेकांस जोडिलीं आहेत. पाण्याची लेव्हल सारखी राहावी म्हणून **झेलम**नदीवर मोठा बंधारा **श्रीनगर** जवळ बांधला आहे. **व्हेरीनाग** हें एक लहानसें गांव आहे. येथील झेलमनदीच्या उगमामुळें व सृष्टीच्या नैसर्गिक सौंदर्यामुळें ह्या गांवास महत्त्व प्राप्त झालें आहे, काश्मिरांत मोठालीं गांवें फारशीं नाहींत. सर्व प्रांतभर थोड्या थोड्या अंतरावर घरें आहेत. आपल्या भागांतील **गोंवें** प्रांताचें काश्मिरशीं बरेंच साम्य, आहे. गोंवें प्रांतांतून प्रवास करतांनाही ५।१० मिनिटांच्या अंतरानें सारखी वस्ती लागते खाड्यांचा सुकाळ आहे वाफर व लहान होड्यांच्या सहाय्यानें थोडक्या पैशांत प्रवासही आटोपतां येतो. खाड्यांचें पाणी स्वच्छ आहे परंतु **काश्मीरचें** पाणी गोड असतें व हें खारट असतें, इतकाच फरक. सृष्टिसौंदर्यांतही गोंवें प्रांत कमी नाहीं. गोंवें प्रांतांत जसे जुलमानें बाटविलेले पुष्कळ ख्रिश्चन आहेत तसे काश्मिरांत जुलमानें बाटविलेले मुसलमान आहेत. असो.

दुपारीं २।२॥ च्या सुमारास व्हेरीनागमध्यें प्रवेश केला. गांवाच्या सीमेवरच कांहीं पंडित मंडळी भेटली. त्यांस **पंडीत शंभूनाथ**-गांवच्या पटवाऱ्यांचे चिरंजीव-ह्यांचा पत्ता विचारला. कारण त्यांस पंडित **आनंदरामजींनीं** चिठ्ठी दिली होती. शंभूनाथजींचे बंधू त्या मंडळींत होते. त्यांनीं पंडितजी: दुसऱ्या गांवास गेले आहेत, उद्यां



**काश्मिरी स्त्री.**

येतील असें सांगून चिठी मागितली. चिठी वाचून त्यांनीं एका गृहस्थाबरोबर माझी आपल्या घरीं रवानगी करून दिली. व ते आपल्या कामास निघून गेले. त्या गृहस्थानें मला पंडितजींच्या घरांत नेऊन सोडलें. व आपला मार्ग धरिला. आतां कठीण प्रसंग झाला. घरांत सर्वत्र स्त्री साम्राज्य होतें. काश्मिरी स्त्रिया गोषा पाळीत नाहींत. मी भीतभीतच घरांत शिरलों. एक वृद्ध बाई गुडगुडी पीत बसली होती. तिनें एक चटई पसरली होती तीवर बसण्याची खूण केली. मीही पुढें काय होतें, ह्याचा विचार करीत विश्रांति घेत स्वस्थ बसलों. काश्मीरमधील घरें २ ते ३ मजली असतात जमीन. पाणथळ असल्यामुळें तळमजल्याचा उपयोग सामान ठेवण्याकडेच फक्त होतो. दुसऱ्या व

तिसऱ्या मजल्यावर वस्ती असते. तिसऱ्या मजल्याचा स्वयंपाक करणें, जेवणें व गप्पा मारीत बसणें ह्याकडे उपयोग होतो व दुसऱ्या मजल्यावर रात्रींच्या वेळीं झोंपण्याची व्यवस्था असते.

तिसरा मजला बहुतेक उघडा असतो. दर २ फुटाच्या अंतरावर २।३ फूट लांबीची खिडकी असते व तींत काश्मिरी स्त्रिया कांहीं तरी उद्योग करीत निदान गुड-गुडी पीत रस्त्याची मजा पाहात बसलेल्या असतात. मी घराखालीं दिसल्याबरोबर पंडितजींच्या शेजारच्या घरांतील स्त्रियांनींच मजला वरती येण्याबद्दल सांगितलें. परंतु मी तिकडे दुर्लक्ष करून पंडितजींकडेच आपला मोर्चा फिरविला. पंडितजींच्या घरांत त्यांच्या मातुश्री—ज्या गुडगुडी पीत खिडकीजवळ बसल्या होत्या. त्यांची पत्नी, त्यांची भावजय व एक २५।२६ वर्षांची बाई, त्यांची बहुधा बहीण असावी. इतकी मंडळी व २।३ मुलेंही होतीं. बहीण एक्या घमेल्यांत पाणी घेऊन कपड्यांस साबू लावण्याचें काम करीत होती व दोन्ही सुना स्वयंपाकघरांतून बाहेर व बाहेरून स्वयंपाकघरांत अशा कामानिमित्त येरझारा घालीत होत्या. सासूबाईनीं बसल्याबसल्याच मला कांगरी देण्याबद्दल हुकूम सोडला; कांगरी आली. शेकण्यास आरंभ केला तोंच एका सुनेनें मातीनें चटई पुढील थोडीशी जागा सारविली दुसरीनें लगेच भाताचा बळी व त्यावर थोडीशी भाजी असें ताट पुढें आणून ठेविलें. चटणी—लोणचें—मिरची—वगैरे पदार्थांस कधींच सोडचिठ्ठी मिळाली होती. तूप—दूध—वगैरेंचीही डाळ इकडे शिजत नाहीं. तरीही थोडीशी चटणी व पेलाभर ताक ह्यांचा लाभ झाला होता. पंडितजींचे वडील एक श्रीमंत गृहस्थ असून गांवचे पटवारी असल्यामुळें त्यांजकडून हा जादा प्रमाणांत आतिथ्याचा लाभ झाला होता असें मागाहून तपास करितां समजलें. सकाळपासून पोटांत अन्न नव्हतें व थंडीही वाजत होती म्हणून तें जेवण अत्यंत रुचकर लागलें. जेवण झाल्यानंतर आंघोळ करण्याकरितां कांहीं कपडे काढून बाकीचें सामान तेथें ठेवून घराच्या बाहेर पाय काढला. काश्मिरी स्त्रिया बुरखा घेत नाहींत. त्या अत्यंत सुंदर म्हणून प्रसिद्ध आहेत. घरांत पुरुष मनुष्य कोणीही नव्हतें त्या सुंदर स्त्रियांच्या घोळ-क्यांत मी परक्या प्रांताचा. त्यांची भाषा न जाणणारा मनुष्य सांपडल्यामुळें जरासा गोंधळूनच गेलों होतों. जशा स्त्रिया सुंदर तसेंच पुरुषही मदनाचे पुतळेच असे सुंदर आहेत. इंद्रानें गंधर्व व अप्सरा ह्यांस कांहीं कारणास्तव मृत्युलोकांत राहाण्याची शिक्षा दिली, तेव्हां त्यांनीं हा प्रांत मागून घेऊन येथें वस्ती केली अशी आख्यायिका आहे. शेतांत काम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या बायका सुद्धां इतक्या सुंदर आहेत कीं त्यांचा जन्म जर ह्या आपल्या प्रांतांत झाला असता तर ब्रह्मचाऱ्यांनीं आपला बेत रहित करून लग्न करण्याचें ठरविलें असतें, संन्याशांनीं गृहस्थाश्रम पुन्हां स्वीकारण्याची खटपट केली असती व मोठमोठ्या श्रीमान् लोकांनीं आपल्या कुलाचा विचार न करितां त्यांजपाशीं सोयरिक जमवून टाकिली असती. ह्या प्रांतांतील बायकांच्या नादीं लागून कित्येक साधु-संन्याशी **पाडर** प्रांतांत कायमचे वस्ती करून राहिले आहेत. म्हणतात परक्या

प्रांतांतील मनुष्य तेव्हांच ओळखूं येतो. वाहेर पडून व्हेरीनाग वाग व झरा पाहाण्यास गेलों. तें ठिकाण पंडितजींच्या घरापासून सुमारें १ मैल लांव होतें. पाऊस पडतच होता. कपडे गार झाले होते. वाटेंत **पंडित शंभूनाथ** ह्या नांवाचे एक दुकानदार भेटले. त्यांनीं विचारपूस केली. त्यांजपाशीं वराच वेळ गप्पा मारिल्या. रात्रीं भोजनास येण्याचें त्यांनीं आमंत्रण दिलें, मी त्या स्त्रीसाम्राज्यांत राहाण्यास तयारच नव्हतों. आमंत्रणाचा साभार स्वीकार करून वागेकडे मोर्चा फिरविला. व्हेरीनाग येथूनच **झेलम** अगर **वितस्ता** नदीचा उगम एका डोंगरापासून झाला आहे. हा डोंगर **पिरपंजाल** पर्वताला लागूनच पायथ्याजवळ आहे. त्यावर सर्वत्र सुंदर झाडी आहे. काश्मिरी भाषेंत नाग ह्या शब्दाचा अर्थ झरा असा आहे. ह्या झऱ्यावरच एक अष्ट-कोनी पुष्करणी बांधली आहे. हिची प्रत्येक वाजू सुमारें ६० फूट लांबीची भरेल. पुष्क-रणींत सुमारें १॥ फूट व्यासाच्या झऱ्यांतून सारखें जोरानें पाणी येत असतें व पुष्करणी-पासून काढिलेल्या पाटांनीं तें सर्वत्र सारखें सपाट्यानें वाहात असतें. एक मोठा पाट पुष्करणीच्या समोर असलेल्या वागेंत नेला आहे व त्या पाटाचे आणखी लहान लहान पाठ काढून तें पाणी वागभर खेळविलें आहे. व पुढें तेंच पाणी गांवभर पाट काढून खेळविलें आहे. म्हणून स्वच्छ, गोड व गार पाणी प्रत्येकास विनकष्टी वाटेल तितकें मिळण्याची सोय झाली आहे. पुष्करणी २१३ पुरुष तरी खोल असावी. पोहोण्याची बंदी नव्हतीच; परंतु थंडी इतकी वाजत होती कीं आंघोळीचा बेत केव्हांच रहित करून टाकिला होता. पुष्करणीसभोंवतीं मोठी भिंत असून तिला लागूनच निवाऱ्याकरितां सुमारें २०।२५ ओऱ्या बांधल्या आहेत. कपडे काढून ठेवून स्नान करण्याची चांगली सोय आहे. आंत २ शिलालेख उर्दू लिपींत लिहिलेले आहेत. एकांत **इ. स. १६१९ मध्यें** जहांगीर वादशहानें ह्या ठिकाणास भेट दिल्याचा उल्लेख असून दुसऱ्यांत. ह्या ठिकाणाचें महत्त्व वर्णिलें आहे. पुष्करणींत शिरतांनाच आरंभीं एक इमारत मुख्य दरवाजावर बांधली आहे व डाव्या-उजव्या हातच्या ओऱ्यांत कांहीं देवांच्या मूर्तींची स्थापना केली आहे. तेथें बरीच काश्मिरी पंडित मंडळी गप्पा छाटीत बसली होती. हें एक मोठें पवित्र तीर्थ असून येथें कांहीं तरी धर्म करण्याबद्दल त्यांनीं फार आग्रह केला. मी त्यांस रिकामें बसून चकाट्या पिटण्याच्या व आल्यागेल्या यात्रेकरूंस लुबाड-ण्याच्या उद्योगापेक्षां दुसरा एकादा उपयुक्त उद्योग करण्यास सांगितलें. कारण ज्या ठिकाणीं मोगल वादशहा सुंदर सुंदर स्त्रियांसमवेत जलक्रीडा करीत असत तें ठिकाण एक पवित्र तीर्थ आहे हें ऐकून निदान इतिहासाभ्यासी तरी फसणार नाहीं. मी संस्कृतचें अध्ययन केलें आहे काय वगैरे चौकशी त्यांनीं केली असतां मी ' हो ' ठोकून दिलें. कारण त्यांच्या संस्कृत ज्ञानाची मजला माहिती झाली होती. त्यांत एक जण सामान्य संस्कृतज्ञ होता. त्यानें आपल्या वहींतून १।२ श्लोक वाचून दाखविले. श्लोक सोपे असल्यामुळें मी लगेच अर्थ सांगितला.

त्यांनीं लांकडापासून अग्निहोत्री विस्तव कसा तयार करितात ती माहिती

विचारली व करून दाखवितां काय म्हणून पृच्छाहि केली. मी अंदाजी माहिती सांगितली परंतु करून दाखविण्याचें टाळलें. मंडळींचा निरोप घेऊन पुष्करणीसमोरच असलेली बाग पहाण्यास गेलों. बागेंत मुसलमान जातीचा एक माळी १२ रु. दरमहावर काम करीत आहे. बागेची व्यवस्था पगाराच्या मानानेंच तो ठेवितो. निसर्गाची देणगी बागेस भरपूर असल्यामुळें परमेश्वरी कृपेनेंच बाग चांगली दिसते. अशा बागेची जर जादा खर्च करून व्यवस्था ठेविली तर ही बाग फारच मनोहर दिसेल ह्यांत शंका नाहीं. परंतु हा विचार व्यवस्थापकांपुढें अद्याप आलेला दिसत नाहीं. बागेच्या दोहों बाजूंस मोठमोठे चिनार वृक्ष आहेत व मध्यें अनेक रंगाच्या फुलांचीं झाडें लाविलीं आहेत. सर्व बाजूंनीं पाटाचें पाणी वाहात आहे. मोठा पाट बागेच्या मध्यावरून गेला आहे. त्यावर पूर्वकालीं २ लहानलहान इमारती बांधल्या होत्या. त्यांपैकीं एक नुकतीच पडली आहे आणि दुसरी पडण्याच्या स्थितींत आहे. बागेच्याजवळच एक प्रवाशांकरितां धर्मशाळा बांधलेली आहे. जर कोठें सोय झाली नसती तर येथेंच उतरलों असतो.


पलीकडे **श्रीनगराहून** आलेल्या २ दोन लॉर्‍या उभ्या होत्या त्यांजपाशीं तपास करितां त्या श्रीनगराहून कांहीं मंडळींनीं संबंध भाड्यानें आणल्या होत्या. मजला त्यांतून जावयाचें नव्हतेंच. येथून श्रीनगरपर्यंत चांगली सडक असून अंतर सुमारें ५० मैल आहे. बाग पाहून गांवांत गेलों. बाजूनें सारखें सपाट्यानें पाणी वाहात होतें. पाऊस झिम्झिम् पडत होता. थंडी बरीच वाजत होती. आतां हा प्रकार रोजचाच होऊन बसला होता. आज ता. ८।५।२८ सर्व दिवसांत चहा मिळाला नाहीं. गांवांत एक पोस्ट व तार आफिस आहे. पंडित शंभूनाथ दुकानदार वाटच पहात बसले होते. त्यांचा इंग्रजी पांच इयत्तापर्यंत अभ्यास झालेला आहे. घरांत वयोवृद्ध वडील, मातुश्री, एक बहीण व दोन भाऊ व ते मिळून ६ माणसें. वडील पटावारी होते, त्यांनीं आतां पेनशन घेतलें आहे. त्यांच्या १० रु. महिना पेनशनमध्यें संसार चालवून मुलांचें शिक्षण करणें त्यांस अशक्य झाल्यामुळें पंडितजींनीं शाळा सोडून गांवांत एक लहानसें किराण्या मालाचें दुकान उघडलें आहे व संसाराचा भार आपल्या शिरावर घेतला आहे. त्यांजपाशीं बृहत्स्तोत्र-रत्नाकर व भगवत्गीता वगैरे पुस्तकें होतींच. कांहीं भागांचा अर्थ सांगण्याबद्दल त्यांनीं आग्रह केला. यथाशक्ति सांगितल्यावर ते खूष झाले. बऱ्याच ठिकाणची माहिती त्यांनीं विचारिली. दुकानावरून बरीच मंडळी जात येत होती त्यांजपाशींही विचार-विनिमय केला. पुष्कळ लोक **व्हेरीनागला** येतात, परंतु ते मोटारमधून येतात. पुष्करणी व बाग पाहून मोटारनें परत जातात. गांवांतील लोकांशीं बोलण्याचा प्रसंग त्यांस बहुधा येतच नाहीं. त्यामुळें—A down Country gentleman दक्षिण हिंदुस्तानांतील एक गृहस्थ—पाहून त्यांस कुतूहल उत्पन्न होत असे. संध्याकाळीं सामानसुमान घेऊनच पंडितजींकडे वस्तीस गेलों. पंडितजींचें घर दुकानापासून सुमारें एक मैल लांब होतें. ओढे, दलदलीच्या जागा ओलांडीत ओलांडीत एकदांचा त्यांच्या

घरीं पोहोंचलों. घरासभोंवतीं सारखे पाण्याचे पाट वाहात असून सुंदर झाडेहि होती. त्यांचें घर तीन मजली होतें. घरांत गरिबी बरीच दिसली परंतु घरांतील मंडळींचें मन मात्र अत्यंत श्रीमंत दिसलें. त्यांचे वडील एक भव्य गृहस्थ असून दाढी वाढविल्यामुळें ते एकाद्या साधूप्रमाणें दिसतात. रोज गार पाण्यानें ३ वेळां स्नान करून पूजा करीत बसण्याचा त्यांचा नियम आहे. ते जम्मू संस्थानास लागूनच राहातात. तरीही त्यांनीं काश्मिरच्या बाहेर पाऊलही टाकिलें नाहीं. **जम्मूस** सुद्धां गेले नाहींत. मी गेलों तों ते शेकत बसले होते. लगेच मजलाही शेगडी-कांगरी-मिळाली— " तुम्हांस चहा व जेवण दोन्हीही देण्याचें ठरविलें आहे; अगोदर काय पाहिजे " असें पंडितजींनीं विचारिलें. जेवणानंतर चहा घेणें मी पसंत केलें. इकडील चहाचा आपल्याकडील चहासारखा झोंपेवर परिणाम होत नाहीं. घरांतील सर्व मंडळींनीं अत्यंत प्रेमळपणानें विचारपूस करून भोजनाची व्यवस्था ठेविली.

माझें जेवण झाल्याबरोबर पंडितजी दुकानावर झोंपण्याकरितां निघून गेले. कारण विचारितां चोरांची भीति हें त्यांनीं सांगितलें. इकडील दुकानांत बहुतेक सर्व माल मडक्यांतून ठेवितात. लोक अत्यंत दरिद्री आहेत. कारण मुख्य पीक तांबडा तांदूळ. रेल्वे स्टेशन २०० मैल लांब व गिन्हाईक त्याहून लांब. पंजाब, संयुक्तप्रांत, सिंध इकडील लोक गहूं खातात. महाराष्ट्र व बंगाल इकडे खपावयाचा तर तांबडा तांदूळ. इतका लांब नेऊन विकणें परवडत नाहीं म्हणून तो काश्मिरांतच विकावा लागतो व तो १ रुपयास १०।१२ शेरपर्यंत मिळूं शकतो. रेल्वेपासून २०० मैलांवर लोक रहात असल्यामुळें सुधारणेचें वारें त्यांच्यांत फारसें शिरलें नाहीं. म्हणून आर्य लोकांची साधी राहाणी अजून त्यांच्यांत जीव धरून आहे व अतिथिसत्काराची चालही सर्वत्र आहे. म्हणून **काश्मीर** प्रांतांत मजला एकदां सुद्धां हातानें स्वयंपाक करावा लागला नाहीं. जेवण झाल्यानंतर पंडितजींच्या वडिलांजवळ हिंदींत गप्पा मारीत बसलों. एकाच ठिकाणीं राहिल्यामुळें जरी त्यांच्या विचारांत एकदेशीपणा दिसून येत होता, तरीही सात्त्विक आर्य गृहस्थ कसा असतो, ह्याचीही साक्ष पटत होती. ते वैष्णव असल्यामुळें मांसाहारी नव्हते. काश्मिरांत शेंकडा ९० ब्राह्मण मांसाहारी असतात. मजला मांसाहारी ब्राह्मणांकडेही भोजन करण्याचा प्रसंग आला. परंतु ज्याप्रमाणें आपल्याकडे कांदा खाणारे लोक पाहुण्याची कांदा खातो किंवा नाहीं, चवकशी करितात व मग त्यास कांदा घालतात, तशीच इकडे पद्धत आहे. मी बहुधा प्रथमच सांगत असे कीं मी पूर्ण शाकाहारी आहे, हारामत्स्यीसुद्धां नाहीं.त्यामुळें मजला अभक्ष्यभक्षण करण्याचा प्रसंग आला नाहीं. निजण्याकरितां दुसऱ्या मजल्यावर गरिबीचाच परंतु भरपूर पांघरूण असलेला बिछाना मजला मिळाला होता. त्यामुळें झोंप फार मजेदार लागली. एक मातीची पंती तेवत ठेविली होती. पंडित-श्रीधरभट्टजी-हें पंडित शंभूनाथजींच्या वडिलांचें नांव-त्याच खोलींत झोपले होते. सुमारें ११ च्या सुमारास सहज जांगा झालों, पाहातों तों पंडितजींची बायको त्यांच्या पायावर पाय देत होती व हें तिनें

काम जवळजवळ तासभर चाललें होतें. तिची पतिभक्ति पाहून मनास फार समाधान वाटलें.

सकाळीं उठल्याबरोबर रीतीप्रमाणें चहा वगैरे झाला. मी लगेच पंडितजींच्या वडिलांजवळ पुढें जाण्याची गोष्ट काढली. परंतु त्यांनीं जेवण झाल्याशिवाय पुढें जाऊं नका, कदाचित् संध्याकाळपर्यंत जेवणाची सोय होणार नाहीं; मग पस्ताव्यांत पडाल असें सांगून जेवण्याचा फार आग्रह केला व तुमच्याकरितां शक्यतितका लौकर स्वयंपाक करितों, असेंही सांगितलें. तेव्हां त्या वृद्ध व सात्त्विक गृहस्थाची आज्ञा मोडणें माझ्या जिवावर आलें व त्यांजकडे राहाणेंही जिवावर आलें. तरीही मी रुकार दिला. जिवावर येण्याचें कारण इतकेंच कीं त्या गरीब गृहस्थास जास्त त्रास देणें प्रशस्त वाटत नव्हतें. त्यांनीं आणखी कांहीं इच्छा असल्यास कळवा, व्यवस्था करितों असेंही सांगितलें.



**श्रीनगर येथील महाराजांचा राजवाडा.**

२ दोन दिवसांत आंघोळ झाली नव्हती व गार पाण्यानें स्नान करण्याची छाती हो नव्हती म्हणून स्नानास कढत पाणी मागून घेतलें. त्यांनीं कढत पाण्यानें स्नान करणें असल्यास ते निवाऱ्याच्या जागेंत करा असें सांगितलें व आपल्या गोठ्यांत स्नानाची सोय करून दिली. उघड्यावर स्नान केल्यास ताप येईल असें ते म्हणाले. गार पाण्यानें उघड्यावर स्नान केल्यास हरकत नाहीं, असेंही त्यांच्या सांगण्यांत आलें. जनावरांकरितां सुद्धां चारी बाजूंनीं बंद असलेली व खालीं भरपूर पेंढा पसरलेली जागा बांधलेली असते. स्नान करून कांगरी घेऊन **पिरपंजाल**कडे पाहात जेवण तयार होण्याची मार्गप्रतीक्षा करीत मोठ्या आरामानें बसलों. पाहातां पाहातां पिरपंजाल धुक्यानें अगदीं भरून गेला व मोठें वादळही तेथें झालें पुढें २ दिवस त्या रस्त्याची रहदारी बंद होती व त्या दिवशींही धुक्यांत सांपडून प्रवाशांचे फार हाल झाल्याचें

समजलें. मी मात्र त्या पर्वतावरून शिरसलामत पार पडलों, ह्याबद्दल मी परमेश्वराचे अत्यंत आभार मानले. यथाक्रम भोजन पार पडलें. पंडितजींच्या मातुश्रींनीं आग्रह कर-करून भोजन घातलें. पुढें भोजन उरकून पंडितजींच्या वडील मातुश्रींच्या पायांवर डोकें ठेवून त्यांचा निरोप घेतला. पंडितजी आदल्या दिवशीं दुकानावर गेले होते ते १० वाजेपर्यंतही परत आले नव्हते. मजला अद्याप १८।२० मैलांचा पल्ला त्याच दिवशीं (९-५-२८) गांठावयाचा असल्यामुळें निघणें जरूर होतें, म्हणून पंडित शंभूनाथजींचें लवकरच लग्न होण्याची इच्छा त्यांच्या आईजवळ प्रदर्शित करून व लग्नास जरूर आमंत्रण करण्याबद्दल बजावून मार्गस्थ झालों.

येथून १० मैलांवर असलेली **आच्छाबल** नांवाची बाग पाहाण्यास जाण्याचा विचार करून निघालों होतों. **व्हेरीनागहून** एक डोंगर ओलांडून मधल्या वाटेनें




**डाल सरोवर, काश्मीर.**

गेलें असतां आच्छाबल १० मैल पडतें. परंतु माझी वाट चुकून मी डोंगरास वळसा घालून गेलों म्हणून मला चांगलें १७।१८ मैल चालावें लागलें. वाटेंत काश्मिरांतील बरींच खेडीं पाहाण्यास सांपडलीं हा फायदा झालाच. **व्हेरीनाग**पासून सुमारें १॥ मैलावर **डोरू** म्हणून एक गांव आहे येथें पोस्ट व दवाखानाही आहे. वाटेंत एके ठिकाणीं पाण्याच्या जोरावर चालविलेली दळण्याची पाणचक्कीही लागली. थंडीचा फार त्रास होऊं लागला परंतु ब्लँकिटाच्या कफनीमुळें तो सुसह होत होता इतकेंच.

आतां सर्व प्रवास सपाट प्रदेशांतून सुरू झाला. वाटेंत सारखीं भाताचीं शेतें रस्त्याच्या दोहों बाजूंस लागलेलीं आहेत व गरीब शेतकरी त्यांत काम करीत आहेत हा देखावा पाहून आपण कोंकण प्रांतांतूनच प्रवास करीत आहों असा कित्येक वेळां भास होतो. मात्र भात तयार करण्याची रीत कोंकणसारखी नाहीं. कोंकणांत प्रथम भात

माळ जमीन भाजून तीवर पेरतात व तेथून भाताचें रोप उपटून शेतांत नेऊन लाविं-तात. इकडे एकदमच शेतांत भात पेरतात. व तें भात कोकणच्या देवभातासारखें असतें. म्हणजे त्यास कुसळें असतात—कोंकणांत उपासास देवभात चालतें, म्हणून ह्या प्रदेशास नंदनवन हें नांव असल्यामुळें व येथील लोक देवमाणसें असल्यामुळें तीं देव-भात खात असावीं अशी कल्पना मनांत आली. **आच्छावल**कडे जाणारा रस्ता गाड्या जाण्यासारखा नाहीं. फक्त माणसें व जनावरें जाण्यासारखा आहे. तरीही त्याच्या दोहों बाजूंस सारखीं झाडें ओळीनें लाविलीं आहेत. त्यांमधून जातांना केव्हांही उन्हाचा त्रास होत नाहीं. डोरूपासून सुमारें १ मैल गेल्यानंतर २ रस्ते फुटले. जवळ रस्ता सांगण्यास मनुष्य नसल्यामुळें व त्या ठिकाणीं हाताचे खांब नसल्यामुळें उजव्या हाताचा रस्ता सोडून समोरच्या रस्त्यानें निघालों. तोही रस्ता आच्छावलास जात होता, परंतु तो लांबचा होता व उजव्या हातचा जवळचा होता. पण ही माहिती पुढें



**चाश्मा शाही बाग, काश्मीर.**

समजली. वाटेंत अनेक खेडीं लागलीं. कफनी घातलेला परक्या प्रांताचा मनुष्य पाहून खेडेगांवचीं मुलें व कुत्रीं थोडा वेळ बरोबर चालून करमणूक करीत. काश्मिरी स्त्रियाही वाटेंत भेटत. शेतकरी शेतांत कामास गेले असतां त्यांचें अन्न घेऊन जाण्याचें काम त्यांच्या बायकांकडे असतें. सर्व स्त्रिया नेहमीं हंसतमुख असतात. वाटेंत सुपारीची चव-कशी केली तर तांबडी अगर पांढरी कोणत्याही प्रकारची सुपारी मिळाली नाहीं. एके ठिकाणीं १ पैशास २ लहान चिकण्या सुपारीचे तुकडे मिळाले. रस्ता चुकल्यामुळें संध्याकाळीं ५॥ वाजतां **आच्छावलास** येऊन दाखल झालों. म्हातारेबुवांच्या सांगण्याप्रमाणें भोजन उरकून निघालों असल्यामुळें फारसा त्रास झाला नाहीं. नाहीं-तर भुकेनें प्राण व्याकुळ झाले असते.

आच्छावल ही बाग देवदार वृक्षांनीं पूर्ण भरलेल्या अशा एका डोंगराच्या पायथ्याशीं बसविली आहे. इ. स. पूर्वी ४८६ ते ४२६ पर्यंत **काश्मीर** प्रांतावर राज्य करणाऱ्या **अक्षराजानें अक्षवल** नांवाचें मोठें शहर बसविलें त्याच शहरास सध्यां अच्छावल म्हणतात. आतां मात्र येथें २५।३० घरेंच आहेत. काश्मीर प्रांतांत असलेल्या सर्व झऱ्यांत उत्तम असा झरा ह्या बागेंत आहे. डोंगराच्या पायथ्याशीं असलेल्या एका कुंडांतून सुमारें १॥ फूट व्यासाच्या झऱ्यांतून सपाट्यानें पाणी बाहेर येतें तेथून तें एका मोठ्या पुष्करणींत नेऊन पुढें त्याचे मोठमोठे पाट काढले आहेत. व शेवटीं बागेच्या तोंडाजवळ ८।१० फुटांवरून खालीं सोडून दिलें आहे, म्हणून बागेंत शिरतांना आरंभींच धबधब्याची मजा पहावयास सांपडते.

**ब्रिंघी** नांवाची नदी **ब्रँग** नांवाच्या प्रांतांत **दिवलगांव** नांवाच्या खेड्याजवळ गुप्त होते. तिचें पाणी अच्छावलच्या झऱ्यांतून बाहेर पडतें अशी आख्याइका आहे.

ह्या बागेस **बेगमबाग** असेंहि म्हणतात कारण इ. स. १६४० मध्यें **शहाजहान व मुमताज इ. महाल** यांची मुलगी **बेगम जहान आरा** हिनें हें सुंदर ठिकाण पाहून येथें बाग तयार करण्याचा हुकूम दिला. हीच **जहानआरा** भाजून अतिशय आजारी पडली असतां **ग्रॅब्रिएल बाउटन** नांवाच्या इंग्रज डॉक्टरानें तिस बरें केलें व **फीबद्दल बंगालप्रांतांत इंग्रजांच्या मालावर जकातीची माफी मिळविली.**

आच्छावल बाग ४६७ फूट लांब व ४५ फूट रुंद आहे. ह्या बागेंत निरनिराळीं फळझाडें असून चिनारवृक्ष पुष्कळच आहेत. बागेंत एकंदर ३ कालवे आहेत. मधल्याची रुंदी १६ फूट असून बाजूचे दोन प्रत्येकीं ६॥ फूट. रुंदीचे आहेत. बागेंत एक १८८ फूट लांब व ७४ फूट रुंदीची पुष्करणी आहे. तींत अनंत कारंजीं उडत असतात. कारंज्यांची व पाण्याची शोभा पहाण्याकरितां पुष्करणीच्या कांठावर सुंदर नक्षी काम केलेले लहान लहान दिवाणखानेहि बांधले आहेत व त्या दिवाणखान्यांत माणसांना बसण्याकरितां बाकेंहि ठेविलीं आहेत. हे दिवाणखाने पाहून **अकबराच्या शिक्री** येथील वाड्याची आठवण झाली. तेथें पाण्याचा दुष्काळ होता व येथें पाण्याचा सुकाळ होता इतकाच फरक. व्हेरीनागपेक्षां ही बाग जास्त सुंदर दिसली, कारण अनंतनाग नांवाच्या मोठ्या शहरापासूनहि जवळच असल्यामुळें येथें माणसांची रहदारी जास्त होती, बागेच्या बाहेरहि सुंदर व गर्द झाडी आहे तींत कांहीं गुलहौशी लोकांनीं तंबू ठोकले होते व तंबूच्या बाहेर टेबलें मांडून त्यांवर त्यांचें चहापान चालले होतें.

बागेंत अनंतनाग येथील पंडित शंभूनाथ धार ह्या नांवाचे वकील भेटले. त्यांजपाशीं गप्पा मारीत कांहीं वेळ बसलों. ते म्हणाले काश्मीरच्या हवेपेक्षां पंजाबची हवा चांगली आहे. काश्मिरी लोक दिवसेंदिवस खालीं खालीं जात आहेत. त्यांच्यांत चहाचें

व्यसन फार बोकाळलें आहे. आतां काश्मीर पहाण्यांत कांहीं चव राहिली नाहीं मी म्हणालों आम्हीं सुद्धां दिवसेंदिवस काश्मिरी लोकांसारखेंच खालीं खालीं चालला आहों, म्हणून त्यांच्या व आमच्यामधील अंतर कायमच आहे व तें तसेंच रहाणार असें वाटतें. पंडितजी आपल्या मुलांस घेऊन चैनीनें फिरण्यास आले होते. कांहीं मंडळींनीं बागेंत फराळाचें वगैरे आणलें होतें. चहाचे बंबहि कांहीं मंडळीजवळ होते. पाणी पिऊन थोडा वेळ विश्रांति घेतली व जाण्याचा विचार करितों तों सहाचा सुमार झाला.



**निशट बाग; काश्मीर.**

बागेच्या पायथ्याशींच **अच्छाबल** ह्या नांवाचें एक गांवहि आहे. गांवांत खाणावळीची चवकशी केली; परंतु खाणावळ नाहीं असें समजलें. रात्रीच्या वेळीं धर्मशाळेंत हातांनीं स्वयंपाक करण्याचा फार त्रास होतो, म्हणून **अनंतनाग** येथें जाण्याचें ठरविलें. गांवांच्याबाहेर पडतों तोंच, " **इसलामाबाद है** " अशी टांगेवाल्याची आरोळी ऐकिली. तपास करितां २ आण्यास टांगा मिळाला. ६ पैसेहि पडतात. येथून अनंतनागपर्यंत पक्की सडक आहे. येथून एक सडक परस्पर मटन मार्तंड येथेंहि जाते.

**मार्तंड** येथून सुमारें ४ मैल आहे **अनंतनाग हें ह्या गांवाचें मूळ हिंदू नांव तें बदलून मुसलमानी अमदानींत इ. स. १६६४ मध्यें** त्या **गांवास इसलामाबाद हें नांव मिळालें.** मुसलमान लोक हेंच नांव उपयोगांत आणतात. हिंदु मात्र अनंतनाग म्हणतात. टांगा अत्यंत वेगानें निघाला. पहाडी लोकांसारखेच पहाडी घोडेहि कणखर असतात. ते फार जोरानें पळतात व दिवसास ५० मैल जाणें म्हणजे त्यांच्या हिशेबांत नसतें. संध्याकाळीं ६॥ च्या सुमारास **अनंतनाग** येथें येऊन पोहोंचलों. अनंतनाग हें सुमारें १० हजार वस्तीचें गांव एका डोंगराच्या पायथ्याजवळ बसलें आहे. डोंगराच्यापासून निघालेल्या एका मोठ्या झऱ्यावर एक पुष्करणी बांधली आहे. सभोंवतीं गर्द झाडी असून देवळें व धर्मशाळा बांधलेल्या आहेत. एक शिखांचें गुरुद्वारहि आहे. ह्या प्रांतांत शिखांची वस्ती असण्याचें कारण पंजाबचा सुप्रसिद्ध राजा **रणजितसिंग** ह्याच्या अंमलाखालीं काश्मीर प्रांत बरेच दिवस होता. गुरुद्वारांत उतरण्यास जागा मिळते, असें समजल्यावरून गुरुद्वाराच्या महंताची गांठ घेऊन जागे-बद्दल विचारलें. त्यानें पहिलाच प्रश्न टाकिला. ' आप क्या हिंदू हो ! ' मी होय सांगितल्यावर ' आप अकेले हो '—एकटेंच आहांत काय?—हेंहि विचारलें व माडीवर एक स्वतंत्र खोली दिली. खोलींत सामान टाकून भोजनाची व्यवस्था पहाण्याकरितां बाहेर पडलों.

त्यावेळीं **गुरुद्वारांत** पुराणकथन चाललें होतें. शेकडों हिंदू व शीख मंडळी पुराणाकरितां येत जात होती. पुराणिकबुवा एक मोठे दाढीवाले शीख असून त्यांच्यापुढें सुमारें ४।५ चौरस फुटांचें एक एक पान असलेला मोठा ग्रंथ ठेविला होता, व त्यांतील श्लोक वाचून ते अर्थ सांगत होते. ह्या **ग्रंथास ग्रंथसाहेब म्हणतात.** शिखांच्या गुरुद्वारांत कोणाहि हिंदु मनुष्यास रहाण्यास जागा मिळते. मात्र गुरुद्वारांत असेंतोंपर्यंत गुरुद्वाराचे नियम पाळले पाहिजेत.

१ गुरुद्वारांत केंस काढतां कामा नये.

२ विडी, सिगारेट, चिलीम वगैरे कोणत्याहि स्वरूपांत तंबाखू ओढतां कामा नये. ह्या गोष्टी तुम्ही बाहेर केल्यास त्यांची हरकत नाहीं.

अगदीं गरीब लोकांस गुरुद्वारांत जेवणहि मिळूं शकतें. खाणावळीचा तपास करितां येथें हिंदूची खाणावळ नाहीं. फक्त एक शिखाची खाणावळ आहे, अशी चवकशी लागली. शीख लोक मांसाहारी आहेतच परंतु त्यांजकडे निर्मांस पदार्थ मिळतात असें समजल्यामुळें त्याच्या दुकानांत गेलों व २ आणे खर्च करून पोटभर भात-भाजीचें जेवण उरकलें. २ पैशास १ ह्याप्रमाणें पोळ्याहि मिळत होत्या परंतु मी भातच पसंत केला. इकडे भात, पोळी, पुरी वगैरे कोणताहि जिन्नस विकत घेतल्यास त्याच्याबरोबर भाजी फुकट मिळते. ताक, दूध, तूप वगैरे जिन्नस खाणावळींत मिळत नाहींत. मी बहुधा २।३ पैशांचें दही घेऊन त्याचें ताक दुकानदाराकडूनच करून घेऊन खाणावळींत जात असे. **इकडे खाणावळींत जितकें खावें तितके पैसे आकारतात.**

एक आण्याचेंहि जेवतां येतें. ४ आण्याचेंहि जेवतां येतें. मी २ ते ३ आण्यापर्यंत जेवीत असे. भोजन पोटभर झाल्यामुळें व दिवसभर चालून थकल्यामुळें गुरुद्वारांत येऊन खोलीस कडी लावून ताणून दिली. आज निजण्याकरितां व पांघरण्याकरितां कांहीं मिळालें नव्हतें. परंतु खोलींत गवताची एक सुमारें ६ फूट रुंद व १२ फूट लांबीची चटई पसरली होती तिचाच उपयोग करून घेण्याचें ठरविलें. कांगरीहि नव्हती. चटईच्या अर्ध्या भागावर निजलों. सर्व कपडे पांघरण्यास घेतले व ते सुटूं नयेत म्हणून पिननें टांचून टाकिले व वरती चटईचा अर्धा भाग ओढून घेतला. पहांटे पहांटे बराच त्रास झाला, परंतु कांहीं वेळानें दुसरा दिवस उजाडला व मी चालण्यास आरंभ करण्याचें ठरविलें. सकाळीं पुन्हां पोट रिकामें होऊन बसलें होतें. म्हणून प्रातर्विधी उरकून



**हाऊस बोट, काश्मीर.**

खाणावळीचा रस्ता पकडला. भात तयारच होता. २ आण्यांत पोटभर जेवण खाणावळीच्या मालकांनीं वाढलें. त्या वेळीं धनुर्मासांतील जेवणाची आठवण झाली. गरम व पोटभर जेवणाचें खरें सुख प्रवासांत कळून येतें. २ पैसे खर्च करून एक पेलाभर चहाहि करून घेतला. तो पिऊन अनंतनागहून सुमारें ४॥ मैलांवर असलेल्या मटन नांवाच्या गांवास जाण्यास निघालों.

वाटेंत पाण्याचे झरे सारखे लागत होते. अनंत झऱ्यांच्या मुळेंच ह्या गांवास अनंतनाग असें नांव पडलें आहे. **अनंतनाग येथें गालिच्यावर नक्षी-काम करणारे बरेच लोक आहेत.** वाटेंत त्यांचीं बरींच दुकानें आढळलीं. अनंतनाग सोडल्यावर एक सुंदर सडक लागली ह्या सडकेवर दोहों बाजूंस सुंदर झाडें असून पलीकडे सारखें पाणी वहात होतें व पाण्याच्या पलीकडे सारखे डोंगर लागले होते. **मटन**हून इंग्रजी शिकण्याकरितां येणारे बरेच विद्यार्थी वाटेंत भेटले. मी कोणी-

तरी साधू-कफनी धारण केल्यामुळें-आहे, अशा कल्पनेनें बरेच विद्यार्थी आदरपूर्वक नमस्कार करीत. कांहीं विद्यार्थ्यांनीं कोण कोठले वगैरे चवकशी केली व एकानें रात्रीं भोजनास येण्याबद्दल आमंत्रणहि दिलें. परंतु त्याच दिवशीं अनंतनाग सोडण्याचा माझा विचार असल्यामुळें मी आमंत्रण आभारपूर्वक नाकारिलें. **मटन** येथील हवा अनंतनागपेक्षां चांगली असल्यामुळें व हें इकडील लोकांचें मृतांची क्रिया करण्याचें आपल्या इकडील **नाशिकसारखें क्षेत्र असल्यामुळें** येथें काश्मिरी पंडितांची बरीच वस्ती आहे व त्यांचींच मुलें शाळेंत चाललीं होतीं. आज ( १०-५-२९ खांद्यावर ओझें नव्हतें. तें कुलूप लावून धर्मशाळेंतील खोलींतच ठेविलें होतें. फक्त एका पिशवींत पाणी पिण्याचा तांब्या, लहानसा पंचा, चाकू, नोटबुक वगैरे जरूरीचेंच. सामान होतें. भोजन उरकलें होतें. उन्हाचा ताप होत नव्हता. थंडीहि ब्लँकेटाच्या कफनीमुळें लागत नव्हती. म्हणून मोठ्या आनंदानें प्रवास चालला होता. वाटेंत रोज ५ मैल चालत जाऊन ५ मैल परत घरीं जाणारे गौरवर्णाचे सतेज विद्यार्थी भेटत होते व त्यांस पाहून आनंद होत होता, तर २ हातांवर जाण्याकरितां सायकलचा उपयोग करणाऱ्या **पुण्याच्या** निस्तेज विद्यार्थ्यांचें चित्र डोळ्यापुढें उभें राहून वाईटहि वाटत होतें. सुमारें ११ वाजतां **मटन** गांवाजवळ येऊन पोहोंचलों.

गांवाच्या बाहेर मोठमोठे चिनार वृक्ष आहेत. त्यांखालीं पंडे मंडळी यात्रेकरूंची वाट पहात बसलीच होती. सर्व मंडळींनीं गिल्ला करण्यास सुरवात केली. मला हिंदुस्थानांतील पंड्यांचा पूर्ण अनुभव असल्यामुळें तुम्हांस मजकडून एक पैसाहि मिळणार नाहीं, तुम्ही दुसऱ्या उद्योगास लागा असें त्यास सांगितलें.

ब्राह्मणवर्गाबद्दल ब्राह्मणेतरांच्या मनांत अप्रीति उत्पन्न करण्याच्या पापाचे मोठे वाटेकरी जर कोणी असतील तर हे पंडेच होत. जों जों क्षेत्र मोठें तों तों त्या ठिकाणीं लोकांस फसवून धर्माच्या नांवावर अधर्म करणाऱ्या ह्या पंड्यांची संख्या मोठी. काशीस जितका नीच वृत्तीच्या ब्राह्मणांचा भरणा आहे, तितका हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि भागांत नसेल. त्यांच्याकडून मोठा त्रास गरीब लोकांस होतो. गयेच्या गयावळाची दुराचाराबद्दल प्रसिद्धी असतांनाहि आमचे गाढव लोक पितर स्वर्गांत जावे म्हणून त्यांची भर करीतच आहेत. मात्र घरची मोलकरीण २ दिवस आजारी पडली तर तिचा पगार खाडे कापून तिला देण्यांत कमी करीत नाहींत. असो.

**पंडित काशीराम निळकंठ पंडा** ह्यांनीं नुसता लेख तरी द्या म्हणून गळ घातली. त्यांस फक्त नांव गांव वगैरे सर्व माहिती लिहून दिली. व रस्त्याच्या उजव्या हातास **मार्तंड** नांवाच्या सुप्रसिद्ध देवालयाकडे रस्ता जातो त्या रस्त्यास लागलों. रस्ता फक्त पायवाटच आहे. सुमारें १ फर्लांग चालल्यानंतर लहानसा चढाव लागतो. तो ओलांडून पलीकडे गेलें म्हणजे कांहीं वेळानें एक कालवाहि ओलांडावा लागतो व कांहीं वेळानें देऊळ येतें.

मार्तंडाचें देवालय—हें देवालय इ. स. पू. ३००५ ते २९३६ पर्यंत राज्य

करणाऱ्या रामदेव नांवाच्या राजानें बांधिलें. देवळाचा आकार काटकोन चौकोनाकृति असून त्याची उंची ५० यार्ड आहे. देऊळ संपूर्ण दगडीच आहे. देवळाच्या कामाकरितां ६ ते ९ फूट लांबीच्या दगडांचा उपयोग केला आहे व इतके मोठे दगड सुमारें ५००० वर्षांपूर्वी यंत्राच्या सहाय्याशिवाय इतक्या उंचीवर कसे चढविले हा एक आधुनिक शास्त्रज्ञांपुढें महत्त्वाचा प्रश्न आहे. देवळाच्या सभोंवतीं अष्टकोनी खांबांच्या रांगाच्या रांगा लागल्या आहेत. त्या खांबावरील नक्षीकाम पहाण्यासारखें आहे.

आवारांत सर्वत्र चांगले ६ फूट उंचीचे व ४१५ फूट व्यासाचे रांजण जमिनींतून उकरून बाहेर काढून ठेवलेले दिसत होते. कांहीं रांजण जमिनींत पुरलेलेही आढळून येत होते. देऊळ पडक्या स्थितींतच आहे; परंतु त्याच्या डागडुगीचें काम चालूं आहे. देवळांत **सूर्याची मूर्ति होती. परंतु आतां नाहीं. तिचा नाश मुसलमानी अमदानींत झाला म्हणतात.** रांजण अगदीं नवीन रांजणाप्रमाणें कोरे करकरीत दिसले. ह्यावरून **पूर्वकालीं—**Pottery **अगर मातीचीं भांडीं घडविण्याची कला किती उच्च दशेस पोहोंचली होती ह्याची साक्ष पटते.**

मार्तंडाचें देवालय पाहून निघालों तों **मटन** येथें आलों. येथें मार्तंडाचें एक लहानसें देवालय आहेच. मटन ह्या गांवास भवन असें दुसरेंही नांव आहे. एका डोंगराच्या पायथ्याजवळ एक सुंदर झरा आहे. त्या झऱ्याचें पाणी आडवून तें एका मोठ्या पुष्करणींत सोडलें आहे. पुष्करणीसभोंवतीं बऱ्याच धर्मशाळाही आहेत. त्यांत कांहीं साधुसंन्याशी राहात होते. क्षेत्र असल्यामुळें येथें सदावर्त असावें म्हणून साधूंची वस्ती आढळली. मी गांवांत शिरल्यापासून पुन्हां पंड्यानें माझा पाटलाग केला. मला कांहीं कर्तव्य नाहीं तूं जा, असें त्यास हजार वेळां सांगितलें तरी तो जाईना. कुंडापर्यंत आल्यानंतर तो स्नान करून संकल्प सोडा असा आग्रह करूं लागला. परंतु मी स्नान करीत नाहीं, असें त्यास स्पष्ट सांगितलें. निदान नुसतें आचमन करून तरी संकल्प सोडा अशीही त्यानें विनंति करून पाहिली; परंतु सर्वच क्षेत्रस्थ ब्राह्मणांबद्दल माझें अतिशय प्रतिकूल मत बनलें असल्यामुळें मी तेंही नाकारिलें व पाणी पिऊन कांहीं वेळ स्वस्थ विश्रांति घेत पुष्करणींतील माशांची मजा पाहात बसलों. येथील कुंडांत अतिशय मासे आहेत. पंड्याचा आग्रह चालूंच होता. निदान तीर्थास वंदन करून कांहीं तरी दक्षणा द्या, असें तो म्हणाला. परंतु मजला जादा एक पैसाही खर्च करण्यास सवड नसल्यामुळें मी तीही गोष्ट नाकारली.

**काश्मिरांत शेंकडा ९० मुसलमान असून शें १० फक्त हिंदू आहेत.** तेव्हां तुम्ही ह्यापेक्षां मुसलमानांस हिंदू करून घेण्याचा उद्योग कां करीत नाहीं, असा मी त्यास सवाल टाकिला व शुद्धीकरणाचें काम करणारा एकादा पंड्या मला दाखव, चवकशी करून मी त्यास दक्षणा देईन, असेंही त्यास सांगितलें. **हैद्राबाद** ( निजाम ) संस्थानच्या पूर्णपणें उलट अशी काश्मिरची स्थिति आहे. काश्मीर-

मध्यें शें. ९० मुसलमान व शें. १० हिंदू. राजा हिंदू. नोकऱ्यांत शें. ९० प्रमाण हिंदूंचें. ह्याच्या उलट निजामच्या राज्यांत आहे. परंतु आमच्या मुसलमानांचे हिंदू न करून घेण्याच्या धर्मघातकी मूर्खपणामुळें इकडील मुसलमानांचे हिंदू होऊं शकले नाहींत. म्हणून इकडे हिंदूमुसलमानांत भांडण नाहीं. ह्या प्रांतांत शुद्धिचळवळीस पुष्कळ वाव आहे. नुकतीच तिकडे शुद्धिकरणाच्या चळवळीस आरंभ झाल्याची बातमी **संस्थानी स्वराज्य** १९।७।२९ मध्यें वाचली.

**काश्मीर**मध्यें मुसलमानांची संख्या इतकी कशी वाढली ह्याबद्दल चवकशी करितां खालील माहिती चांगल्या विश्वासार्ह व इतिहासाभ्यासी गृहस्थाकडून समजली.

काश्मीर प्रांतांत २५४८४९२ मुसलमान, ६९२३२४ हिंदू, ३७६८५ बौद्ध, ३९५०७ शीख व २५१० इतर धर्माचे लोक आहेत.

अगदीं आरंभीं काश्मीरमध्यें सर्व वस्ती ब्राह्मणांची होती. पण हिंदुस्थानांत **बौद्धधर्माचा** उदय झाल्याबरोबर **काश्मीर**मध्येंही पुष्कळ लोकांनीं तो धर्म स्वीकारला. परंतु इ. स. ६३८ च्या सुमारास पुन्हां पूर्ववत् लोक हिंदुधर्मी झाले. इ. स. १३३४ मध्यें **झुलकादर**खान ह्यानें ६०००० फौजेनिशीं काश्मीरवर स्वारी केली व लोकांना जुलमानें मुसलमान बनविलें. **अह्मद्खान व मदाद्खान** ह्यांनीं तर सर्वांवर ताण केली. त्यावेळीं मुसलमानांस धर्मच्छलाशिवाय दुसरा उद्योगच नव्हता. मुसलमानांच्या त्रासास कंटाळून लक्षावधि पंडितांनीं काश्मीरच्या बाहेर लपून छपून पाऊल काढले. जे तेथें राहिले त्यांच्या हालांस पारावारच राहिला नाहीं. प्रत्येक पंडितापुढें २ गोष्टी असत एक तर मुसलमान व्हावें अगर मरण्यास तयार व्हावें. एके वेळीं **इतक्या पंडितांचा जीव घेतला गेला कीं, त्यांच्या गळ्यांतील जानव्यांचें वजन पक्के ५ मण भरलें.** रस्त्यांतून जातांना एकादा पंडित आढळला कीं त्यास पकडून काझीपुढें नेऊन उभा करीत. काझी त्यास मुसलमान होण्याची आज्ञा करी व जर त्यानें नाकारिलें तर लगेच त्यास पोत्यांत घालून व पोत्याचें तोंड बंद करून रस्त्यावरून फरफटत ओढीत नेत व **दाल** सरोवरांत नेऊन बुडवून टाकीत. **मुसलमानांनीं कोणत्याही प्रकारचा अत्याचार करणें शिल्लक ठेविलें नाहीं. हजारों देवळांचा नाश केला. तीं पडकीं देवळें पाहून अजून बऱ्याच काश्मिरी पंडितांस वाईट वाटतें.** त्या पाशवी युगाची आठवण होऊन त्यांच्या अंगाचा भडका उडतो व डोळे पाण्यानें भरून येतात.

अशाही परिस्थितींत शेंकडा १० पंडित तरी कसे शिल्लक राहिले. ह्याचें उत्तर असें मिळालें कीं काश्मिरी पंडितांची सुमारें ११ कुटुंबें पळून दाट अरण्यांत जाऊन राहिलीं. कांहीं दिवसानंतर **झैनुलबादिन** नांवाच्या सुलतानानें—ह्यानें इ. स. १४२३ ते १४७४ पर्यंत राज्य केलें—सर्वांस परत येण्याबद्दल विनंति केली व त्यांचें झालेलें नुकसान भरून देण्याचेंही कबूल केलें. परंतु फारच थोडी मंडळी परत आली.

कारण त्यांचा मुसलमानांवर विश्वासच उरला नव्हता. ह्याच परत आलेल्या मंडळीची प्रजा काश्मिरी पंडित म्हणून ओळखली जाते. त्यांस **वनमाशी** व **मलमाशी** अशीं नांवें आहेत.

**रेनचनशाह** ह्या नांवाचा एक **तिबेटचा** राजा होता. त्यानें इ. स. १३२३ च्या सुमारास काश्मीरवर स्वारी करून तो प्रांत जिंकला. तो जन्मानें बौद्धधर्मी होता परंतु त्यास हिंदु होण्याची इच्छा होती कारण त्यास बौद्धधर्मासंबंधानें कांहींही माहिती



**पॉप्लर नांवाचा दुतर्फा झाडीचा रस्ता, काश्मीर.**

नव्हती. त्यानें ब्राह्मणांचा गुरु जो **देवस्वामी** नांवाचा ब्राह्मण होता त्यास हिंदु करून घेण्याची विनंति केली, परंतु देवस्वामीसुद्धां सर्व ब्राह्मणांनीं त्यास हिंदू करून घेण्याचें नाकारलें. म्हणून त्यानें मुसलमानी धर्माचा स्वीकार केला व नंतर त्यानें ब्राह्मणांचा पुरा सूड उगवला.

कुंडावरून बाहेर पडतो तोंच एक मोठे साधु पुरुष—जटांवरून—भेटले. त्यांजपाशीं पंड्यानें एकही पैसा न देणाऱ्या मजबद्दल तक्रार केली असावी. म्हणून मला

थोडेसें चिडविण्याच्या हेतूनें त्यांनीं बोलण्यास सुरवात केली. ते म्हणाले, तुम् पंडाकू मानते नहि तो तुम् हिंदू कैसे हो. पंडाके मदतबिना तुम् स्वरगमें कैसे जायेंगे. मी— पंडाकू पैसा देना यह तो पंडाकू मानना नहिं, हम तो पंडाकू जरूर मानते है फिर इसकू देनेके वास्ते हमारेपास पैसा है नाहि. पंडाकू पैसेवाला आदमी पैसा दे सकता है गरीब आदमीकू सताकर बहुत पैसा कमानेवाला आदमी आपके साथ पंडाकाही तिकिट नरक का निकाल कर नरकमें जाता है. हमने तो स्वरग का टिकिट निकाला है. हमारा पैसा खरच करके पंडाके साथ नरकमे जानेकी हमारी इच्छा है नहि. तुम्हारे यहांपर पैसेवाले आदमी आते है जो. आपके आरामके वास्ते गरीब मजदूरकू बहुत सताते है. **दूसरेका कष्ट मुफत लेनेबगर कुइबी आदमी पैसेवाला नहि हो सकता.** पंडाके मदत विना हम स्वरगमे जरूर जायंगे. हम् तो जरूर हिंदू है. तुम् हिंदू नहि है. तुमारा पहिला काम मुसलमान को हिंदू बनाना यहीं है वहाँ करनेकू चले जाव—

ते गृहस्थ ह्यावर कांहीं बोलले नाहींत. तेथून निघालों तों गांवाच्या बाहेर एक प्राथमिक शाळा दिसली. शिक्षक शाळेच्या बाहेर बाकें टाकून व फळा मांडून उघड्या हवेंत विद्यार्थ्यांस शिकवीत होते. त्या विद्यार्थ्यांचें मोकळ्या हवेंतील तें शिक्षण पाहून फार आनंद झाला व आपल्याकडील कोंदट हवेंतील कांहीं शालागृहांची आठवण होऊन थोडासा विषादही वाटला. दुपारीं २ च्या सुमारास **अनंतनाग** येथें येऊन पोहोंचलों. अनंतनागपासून १॥ मैलावर **खानाबल** म्हणून एक गांव आहे तेथून **झेलम** नदींतून **श्रीनगरास** जाण्यास होड्या मिळतात अशी बातमी लागली होती. माणशीं भाडेंही ४।५ आणे पडतें. श्रीनगर येथून सडकेनें ३४ मैल आहे व नदीनें सुमारें ५५ मैल. तेव्हां झेलममधून ५५ मैल प्रवास मजेनें करावयास सांपडेल ह्या विचारानें खानाबल्कडे मोर्चा फिरविला.

वाटेंत अनंतनागचें हायस्कूल लागलें. परंतु वेळ नसल्यामुळें आंत शिरलों नाहीं. विद्यार्थ्यांनीं **मटनच्या** वाटेंत आमंत्रण दिलेंच होतें. मटनपासून पुढें **पेहेलगांव** ह्या नांवाचें एक गांव बर्फप्रदेशांत बसलें आहे. बर्फाची मजा पाहाण्याकरितां शेंकडों लोक मोटारनें जात होते. येथें राहाण्याकरितां बंगले नसून भाड्यानें तंबू घ्यावे लागतात व दरमहा भाडें ८ ते १२ रुपये पडतें. मटन ते पेहेलगांव अंतर २२ मैल आहे व पेहेलगांवाहूनच सुप्रसिद्ध **अमरनाथ** येथें रस्ता जातो. पेहेलगांव ते **अमरनाथ** अंतर ३३ मैल. पेहेलगांवाहून अमरनाथला जाण्याच्या रस्त्यावर दुकानें नाहींत म्हणून अमरनाथला जाणाऱ्या यात्रेकरूस लाकूडफाटें, शिधा, कपडेलत्ते वगैरे सर्व जिन्नस पेहेलगांवाहूनच घ्यावे लागतात. पेहेलगांवच्या पुढें मोटारी जात नाहींत. घोडीं मिळतात. त्यांचा प्रत्येकीं जाऊन येऊन ७ रुपये निरख आहे. यात्रेच्या दिवसांतच वाटेवर सरकारी बंदोबस्त असतो. रस्ता बर्फ-प्रदेशांतून गेला असल्यामुळें भयंकर आहे. सन १९२८ सालीं वाटेंत झालेल्या बर्फाच्या वादळामुळें शेंकडों यात्रेकरू मृत्युमुखीं पडले. राजाकडून शक्य ती मदत मिळूं शकते. यंदा निदान १५ रु. तरी जवळ असल्याशिवाय

कोणास जाण्यास परवानगा राजानें दिली नाहीं म्हणतात. यात्रा वर्षांतून २ वेळा असते. पहिली आषाढी पौर्णिमेस व दुसरी श्रावण पौर्णिमेस. पेहेलगावांहून ११ मैल **चंदनवाडी**. तेथून ११ मैल **वावजान** पुढें ६ मैल **पंचतर्णी** व तेथून ५ मैलांवर **अमरनाथ**. मुक्काम पंचतर्णीसच करावा लागतो. अमरनाथला राहाण्याची सोय नाहीं. शक्य तर एकदम मुक्कामास **पंचतर्णीस** जावें अगर मधल्या ठिकाणीं मुक्काम करावा. रस्त्यांत मुक्काम करण्याची सोय नाहीं. चांगलें चालणारास **अमरनाथची** यात्रा ३ दिवसांत उरकतां येईल. ही यात्रा रस्त्याच्या भयंकरपणामुळें कठीण झाली आहे. **नेपाळची** यात्रा ह्या यात्रेपेक्षां लांब असली तरी मध्यें मुक्काम करणेची सोय पुष्कळ ठिकाणीं आहे. बर्फाचाही त्रास नाहीं. असो.

मी **पिरपंजाल**वरच वर्फाची मजा पाहिली असल्यामुळें पेहेलगावांस जाण्याचा बेत रहित केला. इकडच्या यात्रेस कपडेही जास्त लागतात. मजपाशीं कपडेही जास्त नव्हते. वाटेंत थंडी कशीवशी काढली. परंतु **श्रीनगरास** गेल्यावर एक गरम कापडाची पेटी शिवली. नाहीं तर माझा गरम कपडे न शिवण्याचा जवळजवळ निर्धार झाला होता. आपल्या प्रांतास गरम कपड्यांची मुळींच आवश्यकता नाहीं. गरम कपडे आपल्या भागांत शिवणें म्हणजे इंग्रजांचें अंधानुकरण आहे. असो.

**खानाबल** येथून संध्याकाळीं ४ च्या सुमारास बोटी सुटतात असा तपास लागल्यामुळें **अनंतनाग** जवळच एक गरम पाण्याचा झरा आहे. त्यास गंधकाचा वास येतो व ह्याच्या पाण्याचे रंगही बदलतात. तो पाहाण्याचा बेत रहित केला व ४ च्या सुमारास **खानाबल**ला पोहोंचलों. अनंतनाग ते खानाबल चांगली सडक आहे. सडकेच्या दोहों बाजूंस सुंदर चिनारवृक्ष सारखे लाविले आहेत. चालण्यास मुळींच त्रास वाटत नाहीं. खानाबल गांवापासूनच होड्या चालतात. तत्पूर्वी **झेलम** नदीस ओढ असल्यामुळें होड्या चालत नाहींत. येथें झेलमनदीवर लाकडी पूल आहे. हा पूल इ. स. १८९४ मध्यें **महाराजा सर प्रतापसिंह** ह्यांनीं बांधली. त्यावरून मोटारी जाऊं शकतात. पुलाजवळच पोस्ट ऑफिस आहे. पोस्ट-मास्तरसाहेब होतेच–त्यांस नावेबद्दल विचारिलें. ते म्हणाले पूर्वी येथून लोक नावेनें श्रीनगरास जात असत. नाव ४ आण्यांतच मिळत असे. ती संध्याकाळीं निघून रात्रभर चालून सकाळीं पोहोंचत असे. १०।१२ माणसें मिळाल्याशिवाय नाववाल्यास नाव नेणें परवडत नाहीं. हल्लीं लोक जास्त प्रतिष्ठित झाले आहेत. त्यांना रात्रभर नावेंत बसून १२ आणे वांचविण्यापेक्षां १ रु. भरून लॉरींतून जाणें परवडतें. एक नाववाला संध्याकाळीं नेतो म्हणाला, परंतु मास्तरसाहेबांनीं " ए लोक धोखा देनेवाले है, तुमकू रातकू कहेंगे, हमारेपास दुसरे आदमी है नहि. अढाई रुपया दे देव. अकेलेकू ले जाते है " असें सांगितल्यामुळें तो बेत रहित केला. पुढें मास्तरसाहेबांनीं दिलेल्या माहितिवरून चालूं लागलों तों सुमारें ४ मैल चालून गेल्यानंतर **बिजबिहारी** नांवाच्या गांवीं पोहोंचलों.

**विजविहारा** हें गांव **झेलम** नदीच्या कांठीं बसलें आहे. गांवची लोकसंख्या ४४२४ असून इ. स. पूर्वी ११४ ते १०६ पर्यंत राज्य करणाऱ्या **विजय** नांवाच्या राजानें हें गांव बसविलें. गांवाजवळ फार मोठमोठे चिनारवृक्ष आहेत. सर्व काश्मीरमध्यें इतके मोठे चिनारवृक्ष दुसऱ्या ठिकाणीं नाहींत. ह्या ठिकाणास दाराशिखू बाग म्हणतात. एका चिनारवृक्षाचा घेर ५४ फूट आहे. नदीस सुंदर घाट बांधलेले आहेत. नदींत शेंकडों होड्या उभ्या होत्या. ह्या होड्यांतून भात **श्रीनगरास** नेतात परंतु त्या फार सावकाश चालत असल्यामुळें श्रीनगरास जाण्यास ५।६ दिवस लागतात. सडक गांवांतूनच गेली आहे. नदीच्या कांठावर एक शंकराचें मोठें देऊळ असून देवळाच्या जवळच एक मोठी धर्मशाळाही आहे. गांवाच्या अगदीं तोंडावरच धर्मशाळा लागल्यामुळें आंत जाऊन चवकशी केली. देवळाचे मालक धर्मशाळेंतच राहात. मला त्यांनीं राहाण्याकरितां एक स्वतंत्र खोली दिली. पोहोंचेपर्यंत ६॥ चा सुमार झाल्यामुळें जेवण तयार करण्याचा बेत रहित केला व जलपान करून झोंपीं जाण्याचें ठरविलें. देवळांत एक ब्रह्मचारी बोवा भेटले. बरेच गप्पिष्ट होते. त्यांनीं सर्व हिंदुस्तानांत प्रवास केला होता. वृद्धापकाळ झाल्यामुळें येथें असलेल्या शिष्यमंडळींच्या सहवासांतच काळ घालवितो असें त्यांनीं सांगितलें.

रात्रीं ८ च्या सुमारास मेणवत्ती मालवून झोंपीं गेलों. आजही पांघरुणाची सोय लागली नव्हती. धर्मशाळेंत उतरलों असल्यामुळें कोणाजवळ मागणेंही प्रशस्त नव्हतें. दमलों असल्यामुळें झोंप लगेच लागली. रात्रीं १० च्या सुमारास कोणी तरी दार खडखडीत आहे असा भास झाला म्हणून थोड्याशा भीतीनें कोण आहे म्हणून प्रश्न केला. उत्तर आलें नाहीं. चांगला जागा झाल्यावर आपण काश्मिरांत आहोंत ही गोष्ट लक्षांत येऊन " कौन है " असा सवाल टाकिला. बाहेर एक मनुष्य कंदील घेऊन उभा होता त्यानें " दरवाजा खोलो " सांगितल्यावर दरवाजा उघडला. तो धर्मशाळेच्या मालकाचा स्वयंपाकी आहे म्हणून त्यास प्रश्न केला. तो म्हणाला भोजनास चला, मालकसाहेब तुमच्याकरितां थांबले आहेत. कां येथेंच भोजन आणूं. मी भोजनाची जरूर नाहीं म्हणून पुष्कळ सांगितलें. परंतु तो ऐकेना म्हणून मग जेवण घेऊन ये म्हणून सांगितलें. भूक होतीच. पोटभर जेवण झालें. पाणी वगैरे पिऊन आराम वाटला. त्या मनुष्याचा उदारपणा पाहून त्यास थंडी फार वाजत आहे, शक्य असल्यास मालकाकडून पांघरूण आणून देण्याबद्दल विनंति केली. त्यानेंही लगेच एक जुनाट लेप आणून दिला. धर्मशाळेंत चटई होतीच, त्यामुळें थंडीचें निवारण सामान्यतः झालें. झोंप चांगली लागली.

दुसऱ्या दिवशीं ( ता. ११-५-२९ रोजीं ) सकाळीं उठून प्रातर्विधी उरकून धर्मशाळेच्या मालकांचे आभार मानून निरोप घेतला व निघालों तों प्रथम गांवांत गेलों. एके ठिकाणीं पोळ्या भाजण्याचें काम चाललें होतें. पोळ्या भाजणारांस त्यांच्या पोषाखावरून मुसलमानच म्हटलें असतें. परंतु चवकशीअंतीं ते ब्राह्मण आहेत असें

समजलें. अत्यंत पातळ पोळ्या १ पैशास १ ह्या भावानें मिळतात. ५।६ पोळ्या खरेदी केल्या. ३ आणे शेरप्रमाणें अर्धा शेर दही व कांहीं साखर विकत घेऊन प्रथम फराळ केला. कारण पुढें खाणें न मिळाल्यास प्रवास कसा होणार ! गांवांत एक पोस्ट ऑफिस आहे. गांवास सुमारें ८ वाजतां रामराम ठोकून चालूं लागलों. खांद्यावर ओझें, भोजनाचा अनियमितपणा, चालण्याचे झालेले श्रम ह्यामुळें दिवसेंदिवस सपाट्यानें प्रवास होत नाहीं. चालण्याचा सराव आणखी कमी होण्याचें कारण सायकल. सायकल घेतल्यापासून लांबचा प्रवास शाळा सुरूं असे तोंपर्यंत तरी होत नाहीं, सुटींत काय होईल तेवढाच. आम्ही इंग्रजांच्या सायकल, मोटार वगैरे सुधारणा उचलल्या परंतु त्यांच्यासारखा शाळांतून सक्तीचा व्यायाम सुरूं केला नाहीं म्हणून सुधारणांपासून दुष्परिणाम मात्र घडून आले. **पूर्वींचे रोजचे नमस्कार टाकिले व इंग्रजांप्रमाणें फुटबॉल, टेनिस वगैरेकरितां लागणारा पैसा,** जागा व वेळ नाहीं म्हणून आम्हीं "हर हर न हिंदुर्न यवनः" झालों आहों. गव्हर्नराप्रमाणें आमच्यांतील किती मोठ्या पोटाचे, फिकट चेहेऱ्याचे मोटारींतून फिरणारे श्रीमंत क्रिकेट खेळतात ? रेसमात्र जरूर खेळतात. असो. बिजबिहाऱ्यापासून ४ मैलांवर विशाऊ Vishau & Ram-bi-ara-व राम बिआरा ह्या दोन नद्यांचा संगम झाला आहे त्या संगमावर एक खेडेंगांव वसलें आहे त्याचें नांवही संगम हेंच आहे. संगम गांवापासून सुमारें १॥ मैल चालून गेल्यानंतर डाव्या हातास एक टेलिग्राफ ऑफिस लागलें. हें टेलिग्राफ ऑफिस सडक व झेलम नदी ह्यांच्या मध्यावर बसविलें आहे. नदी ऑफिसला लागूनच वाहाते. सडक ½ फर्लांग दूर आहे. संकटांत सांपडलेल्या नदींतील अगर रुडकेवरील प्रवाशास उपयोग व्हावा म्हणून ह्या ऑफिसची योजना केली आहे. गांवांतलि काम ह्या ऑफिसला मुळींच नसतें. ऑफिसच्या व्हरांड्यांतच तारमास्तरसाहेब उभे दिसले, तेव्हां कांहीं चवकशी करून पुढें जावें अशा विचारानें त्यांजकडे गेलों. जगापासून दूर एकटे पडल्यामुळें मला पाहून त्यांनाही आनंद झालेला दिसला, कारण आसपास मैल दीड मैलांत गांव नाहीं, त्यामुळें मनमोकळें भाषण कोणाशीं करावें ? घरांतील २ माणसें व एक शिपाई यांजपाशीं किती बोलणार, शिपायास काम फारसें नसल्यामुळें तो चरक्यावर लोकर विणीत बसला होता. मास्तरसाहेबांचें नांव **निरंजन नाथ धार** असून ते बी. ए. झालेले आहेत त्यास अवघा २० रुपये पगार मिळतो असें समजलें. चौकशी कीरतां काश्मीरमध्येंही नौकरी मिळणें अत्यंत दुर्घट होऊन बसलें आहे, म्हणून त्यास ह्या निर्जनप्रदेशांत यावें लागलें.

लगेच त्यांनीं जेवणाबद्दल चौकशी केली. मी फराळ केल्याचें सांगितलें, तरीही भत्ता तयार आहे, तसे जाऊं नका वगैरे फार आग्रह केला. तेव्हां फारसे आढेवेढे न घेतां आमंत्रण स्वीकारिलें. भात भाजीचें काश्मिरी जेवण झालें. २ दिवसांपूर्वीं झालेल्या सूर्यग्रहणाच्या दिवशीं त्यांजकडे सत्यनारायण झाला होता त्याचा प्रसादही

बांधून दिला. सुमारें १ वाजतां हें ठिकाण सोडलें. रस्त्याच्या जवळून झेलमनदी वाहात होती. **श्रीनगराहून अनंत नागकडे** येतांना प्रवाहाच्या विरुद्ध दिशेनें नाव चालवावी लागते. ती नुसत्या वल्ह्यानें चालविणें शक्य नसतें म्हणून नांववाले व त्यांच्या बायका नावेस दोर बांधून ते हातांत घेऊन कांठानें नांव ओढून नेत असतांना आढळले. हें काम मोठ्या कष्टाचें आहे परंतु पुरुष व स्त्रिया यांच्या तें आंगवळणी पडलें आहे. येथून सुमारें ६ मैलांवर अवंतीपूर नांवाचें गांव आहे तेथें संध्याकाळीं ७ च्या सुमारास पोहोंचलों. वाटेंतच एक हालवायाचें दुकान लागलें तेथें दूध वगैरे विकत घेऊन चौकशीस सुरुवात केली गांवांत धर्मशाळा आहे अशी चवकशी लागली होती परंतु हलवाई म्हणाला येथें धर्मशाळा वगैरे नाहीं, समोरच्या वडाखालीं साधूलोक वस्ती करतात तेथें तुम्ही वस्ती करा. तोंच धुळीच्या मोठ्या वादळास सुरवात झाली. सारखी अर्धातास धूळ उडत होती. नंतर पाऊसही पडूं लागला,



**काश्मीरांतील मुलें.**

दुसऱ्या एका दुकानाच्या पडवीचा आश्रय करून बसलों. गांवांत मार्तंडाच्या धर्तीचीं १।२ देवालयें आहेत असें समजलें परंतु वादळामुळें कार्यक्रम रहित करावा लागला. अगदीं उघड्यावर पावसांत कसें निजावयाचें ह्याचा विचार करीत आहे तोंच एक पोलिस ऑफिसर भेटले. त्यांनीं ड्यूटी म्हणून कोण कोठले वगैरे चवकशी केली. मी इंग्रजींत माहिती सांगितल्यानंतर त्यांनीं आपल्याकडे झोपण्यास येण्यास सांगितलें.

**अवंतीपूर** हें एक तालुक्याचें ठिकाण आहे. येथून श्रीनगरास नेहमीं टांगे जातात. माणशीं ४।५ आणे भाडें पडतें. संध्याकाळ झाल्यामुळें टांगे मिळणेंही शक्य नव्हते. श्रीनगर येथून सुमारें १८ मैल आहे. संध्याकाळीं ७ च्या सुमारास एक मोटार लॉरी अनंतनागहून आली. प्रवासास कंटाळल्यामुळें ८ आणे देऊन तींत

बसलों. अवंतीपूराहून ८ मैलांवर पांपूर नांवाचें गांव लागतें तेथे केशराच्या बागा आहेत अशी बातमी लागली होती परंतु मोटारनें गेल्यामुळें त्या पाहाण्याचा बेत सोडून द्यावा लागला. संध्याकाळीं ८ च्या सुमारास श्रीनगर ह्या सुप्रसिद्ध शहरांत येऊन दाखल झालों. पाऊस पडतच होता. कशीबशी सनातनधर्मप्रतापभुवन ह्या नांवाची मोटार स्टॅन्डजवळच असलेली धर्मशाळा गांठली. धर्मशाळेच्या मॅनेजरसाहेबांस नांव गांव वगैरे लिहून देऊन त्यांजकडून एक खोली मिळविली. खोली चांगली हवाशीर स्वच्छ, तिसऱ्या मजल्यावर होती. रोजीं १ आण्याप्रमाणें खाट भाड्यानें मिळत होती परंतु मी फुकट मिळणाऱ्या चटईचाच उपयोग केला. ह्या धर्मशाळेंत ८ दिवस परवानगीशिवाय राहातां येते. जास्त राहाणें असल्यास मालकाची परवानगी काढावी लागते. पैखाना, नळ वगैरे सर्व सोई आहेत. पांघरुणाची सोय नाहींच. म्हणून अर्ध्या चटईचा पांघरुणाकडे उपयोग करीत असे. ता. ११-५-२९ रोजीं श्रीनगरांत पोहोंचलों होतों त्या दिवशीं रात्रीं तसाच जेवण न करितां धर्मशाळेंत झोपीं गेलों. दुसऱ्यां दिवशीं रविवार होता, त्याकरितांच मी श्रीनगरास येण्याची घाई केली होती, कारण श्रीनगराजवळ असलेल्या प्रख्यात शालिमार आणि निषाद ह्या बागा पाहाण्याची खरी मजा रविवारींच असते.

गेल्या सुमारें १९ दिवसांत वडील, बहीण, भाऊ, बायको मुलगा व मुलगी ह्यांची कांहींच खुशाली समजली नव्हती. घरीं मीं पत्रें पाठविलीं होतीं व उत्तरें c/o पोस्टमास्तर श्रीनगर ह्या पत्त्यावर मागविलीं होतीं व पोस्टमास्तर साहेबांस पत्रें आल्यास तशीच ठेवून द्या अशी सूचनाही दिली होती, म्हणून प्रथम पोस्ट ऑफिसचा रस्ता सकाळीं उठल्याबरोबर पकडला. जनरल पोस्ट ऑफिस नव्या वस्तींत आहे. रविवार असल्यामुळें डिलिव्हरीस उशीर होता, म्हणून जेवणाच्या चवकशीस लागलों.

येथें मांसाहारी हिंदूंच्या पुष्कळ खाणावळी आहेत ते शाक व भात निर्मांस देतों म्हणतात, परंतु शक्य तर शाकाहारी खाणावळ पाहावी म्हणून बऱ्याच मंडळी जवळ चवकशी केली. एकानें लालमंडमध्यें तशी खाणावळ आहे अशी बातमी दिली. फिरतां फिरतां Vishno Bhjoan Shala विष्णो भोजनशाळा अशी पाटी आढळली. खाणावळीचे मालक फार सभ्य गृहस्थ होते. त्यांनीं मोठ्या आनंदानें २ आण्यांत पोटभर जेवण वाढलें. ते पूर्वी राजाकडे स्वयंपाक करण्याच्या कामावर होते व त्या वेळीं त्यांनीं बराच प्रवास केल्याचेंही समजलें. दहीं विकत घेऊन त्याचें ताक बनवून आणिलें होतें. इकडच्या प्रांतांत हातानें स्वयंपाक करण्यापेक्षां खाणावळींत जाणें परवडतें. महिना ७।८ रु. दर पडतो, जेवण उरकून पोस्टांत गेलों.

रविवारीं पत्रें वगैरे १० वाजतां मिळतात. इतर वारीं ९ वाजतां मिळतात. घरचीं सर्व मंडळींचीं पत्रें मिळालीं. खुशाली वाचून आनंद झाला व पुढें चालूं लागलो. पोस्ट ऑफिस ( 1St Bridge ) पहिल्या पुला जवळच आहे. येथून **शालिमार**

**निषाद** इकडे जाण्यास नावा मिळतात. परंतु त्यांस ३।४ रुपये भाडें पडतें. मला त्यांमधून जाणें शक्य नव्हतें. तेव्हां गरिबांची सोय काय, म्हणून चवकशीस लागलों व माहिती काढली. पोस्टांतून प्रथम Nawpura **नवा पुरा** नांवाच्या भागाचा तपास केला. तेथूनही भाडें जास्त पडत होतें. तेथून Rainawwari **रैनावारी** नांवाच्या भागांत गेलों व त्याच्यापुढें Naidyar **नइडयार** ह्या नांवाच्या बंदरांतून **निषाद**ला स्वस्त भाड्यानें नावा सुटत होत्या तें ठिकाण गांठलें. सुमारें १॥-२ मैल चालावें लागलें परंतु **श्रीनगरचे** अनेक भाग पाहावयाचेच होते त्यांत हा भाग पाहून झाला. येथून निषादला सारख्या होड्या सुटत होत्या. भाडें माणशीं २।३ पैसे पडतात. मजला ३ पैसे पडले. **अमिरा कदल**वरून जितके रुपये भाडें पडते तितक्या पैशांत येथून जातां येतें; परंतु ह्या होड्यांचा उपयोग बहुतेक काश्मिरी लोकच करीत होते; कारण इकडे येणारे लोक श्रीमंत असल्यामुळें असल्या गोष्टींची चवकशी करितातच कशाला ! ते इकडील गरीब लोकांशीं बोलत सुद्धां नाहींत. मग गरिबांकडून ह्यांस माहिती कशी मिळणार. होडींत बरीच काश्मिरी पंडीत मंडळी भेटली. ही मंडळी मजेनें निषाद बागेंत चालली होती. त्यांजपाशीं बराच वेळ गप्पा झाल्या त्यांत **पंडित शंकर देव** ह्या नांवाचे **रैनावारीचे** काश्मीर संस्थानांत अकाउन्टन्ट जनरलच्या ऑफिसमध्यें एक्झामिनरचें काम केलेले पेन्शनर गृहस्थ होते. त्यांनीं काश्मीरची बरीच माहिती दिली व आल्यासारखे निदान तीन महिने तरी काश्मिरांत राहा, पुष्कळ मजा पाहाण्यास सांपडेल असें सांगितलें. मी खर्चाची सोय नाहीं व सुट्टीही नाहीं, असें सांगतांच ते व त्यांच्या बरोबरची मंडळी म्हणाली, आम्ही तुम्हांस ३।४ महिने सहज जेवावयास घालूं. मी त्यांचें आमंत्रण आभारपूर्वक नाकारिलें. तेथून नाव कांहीं वेळ **झेलम** नदींतून जाते व पुढें ती **दाल** सरोवरांत शिरते. ह्या सरोवराचें पाणी इतकें स्वच्छ आहे कीं १।२ पुरुषांवर असलेला तळ स्पष्ट दिसतो व सरोवरांत उगवलेल्या रंगीबेरंगी वनस्पती पाहून मन इतकें मोहून जातें कीं वरती डोकें करूंच नये असें वाटतें. सरोवरांत कमळें तर अनंत दिसत होतीं. तीं पाहून फुलांचा जणूं गालिचाच पसरला आहे असा भास होत होता. कांहीं वेळानें सरोवरांत असलेल्या तरत्या बागा लागल्या.

### तरत्या बागा. ( Floating Gardens )

उथळपाण्यांत उगवणारे दाट लव्हाळ पाण्याच्या पातळीपासून आंत २ फुटांवर तोडून त्यांचा व तळाचा संबंध नाहींसा करितात पाण्याच्या पातळीवरील संबंध मात्र कायमच ठेवतात. कारण लव्हाळें फार दाट उगवलेले असतात व ते एकमेकांस चिकटलेले असतात. नंतर ते लव्हाळें तसेंच आणखी जवळ जवळ आणतात व मग त्यांवर माती टाकतात त्या मातीच्या थराचें बेटच तयार होतें. मात्र तें बेट सरोवराच्या तळास टेकलेलें नसतें. पुढें त्या बेटावर कलिंगडें फुल झाडें वगैरेंची लागवड

करितात. ह्या बागा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेतां येतात, म्हणून थट्टेनें काश्मीरमध्यें जमीन चोरीस जाण्याची भीति आहे असें म्हणतात.

ह्याची लांबी सुमारें ४ मैल असून रुंदी २। मैल आहे. दालसरोवराचा विस्तार १०।१२ चौरस मैल तरी असावा असा अंदाज आहे. सुमारें २ तास प्रवास करून **निषाद** बागेस पोहोंचलों. बागेच्या बाहेर बरीच गर्दी जमली होती. मोटार लाऱ्या उभ्या होत्या; फराळाचीं दुकानेंही होतीं. बोटींतील पंडित मंडळींजवळ चहाचा बंब बिस्किटांचें गाठोडें व पेले वगैरे सामान होतें. त्यांनीं दुपारीं ३ च्या सुमारास चहा-पिण्यास येण्याचें आमंत्रण दिलें. ती मंडळी बागेंत झाडाखालीं बसण्याकरितां निघून गेलीं व मी बाग पाहाण्याकरितां चालूं लागलों. इ. स. १६३४ च्या सुमारास **नूरजहानचा भाऊ असफखान** ह्यानें हें उद्यान तयार करविलें. ह्या बागेस आनंदोद्यान असें नांव आहे. ह्या बागेची लांबी ५९५ यार्ड असून रुंदी ३६० यार्ड आहे. बागेसभोंवतीं १३ फूट उंचीची भिंत आहे. ही बाग एकावर एक असे पायऱ्याप्रमाणें दहा ( मजले ) चौथरे बांधून त्यांवर तयार केली आहे. प्रत्येक चौथऱ्यावर एक सुंदर पुष्करणी असून तींत अनेक कारंजीं उडत आहेत. एका पुष्करणींतून दुसरींत, दुसरींतून तिसरींत ह्याप्रमाणें पाणी वहात वहात खालीं येतें व दालसरोवरास मिळतें. प्रत्येक मजल्यावर एक एक धबधबा दृष्टीस पडतो.


अगदीं आरंभींच्या चौथऱ्यावर व शेवटच्या चौथऱ्यावर असे दोन बंगले बांधिले आहेत. पहिल्या बंगल्याची लांबी ५९ फूट असून रुंदी सुमारें ४८ फूट आहे. खिडक्यांवर सुंदर नक्षीकाम केलें आहे. पुष्करणींतील कारंज्यांची मजा पहात बसण्याकरितां बंगल्याच्या खालच्या व वरच्या मजल्यावर व्हरांड्यांत बाकें टाकिलीं आहेत.

पुष्करणींतील पाणी अनेक कालवे काढून सर्व बागभर खेळवलें आहे. कालव्यांच्या काठांवरून माणसांना चालण्यासारखा पक्का फरसबंदी रस्ता आहे. रस्त्याच्या दोहों-बाजूंस हिरवें गार गवत असून मधूनमधून सुंदर रंगीबेरंगी फुलझाडेंहि लाविलीं आहेत. तीं पाहून आपण सुंदर सुंदर गालिचेंच पहात आहोंत कीं, काय असा भास होतो. मधूनमधून सुंदर दगडी चौथरे बांधले आहे व बाकेंही मांडलीं आहेत. बाजूस उंच उंच चिनारवृक्ष आहेत. त्यांच्या छायेखालीं शेंकडों मंडळी बसून त्यांचे फराळ चालले होते. ह्या बागेस हरवान नांवाच्या तलावांतून पाण्याचा पुरवठा होतो.

## निषाद बाग.

**निषाद** ही बाग डोंगराच्या पायथ्याशीं बांधली आहे. बागेंत सुमारें ४।५ शें माणसें तरी आलीं असतील, परंतु बाग फार मोठी असल्यामुळें गर्दीचा त्रास कोणा-सहि होत नव्हता. ही बाग पाहून शालीमार पहाण्यास जाण्याचा विचार होता, परंतु बाग पहातां पहातां १॥ तास निघून गेला तरी बागेच्या बाहेर पाय निघेना. सरते शेवटीं होडींत भेटलेल्या मंडळीकडे गेलों. त्यांचा चहा तयार होताच. एक पेला चहा

व बिस्किटें मजला त्यांनीं दिलीं. आग्रह चाललाच होता. चहानंतर गुडगुडी पितां पितां गप्पाहि चालल्या होत्या. इकडील मंडळींची पिकनिक पार्टी म्हणजे आपल्या-कडच्यासारखे हजार पदार्थ व भयंकर खर्च नव्हे. चहा, बिस्किटें ( तींहि साधी ) व नंतर गुडगुडी म्हणजे खलास. चहा घेऊन मंडळींचा निरोप घेतला व बागेच्या बाहेर पडलों, तोंच **मुंबईस** आर्. एम्. एस्. मध्यें काम करणारे **श्री. गोपाळ शिवराम गाडगीळ** नांवाचे गृहस्थ दिसले. ते आपल्या वहिणीस घेऊन **अमर-नाथची** यात्रा करण्यास आले होते. त्यांनीं मजला ओळखलें नाहींच. कारण मी कफनी धारण केली होती. मी मात्र त्यांच्या पोषाखावरून ते महाराष्ट्रीयन् आहेत, हें तेव्हांच ओळखलें व कोण कोठलें वगैरे चवकशी केली. सुमारें १५ दिवसांत



**श्रीनगरमधील बाग.**

मराठी बोलावयास न सांपडल्यामुळें त्यांना पाहून मला फार आनंद झाला. त्यांनीं ३ रु. स स्वतंत्र शिकारा केला होता. ते **शालीमार** पाहून आले होते. मला पहा-वयास जावयाचें होतें म्हणून दुसऱ्या दिवशीं त्यांस भेटण्याचें कबूल करून त्यांचा निरोप घेतला. श्रीनगराहून निषादला येण्यास पक्की सडक आहे. श्रीनगर ते निषाद ७ मैल अंतर आहे. तेथून शालीमार १॥ मैल पडतें. तीच सडक पुढें गेली आहे. शालीमार बागेंत ५॥ च्या सुमारास पोहोंचलों तोंच ढगांनीं आकाश भरून आलें व काळोखीहि पडली. त्यामुळें शालीमार बाग फार वेळ पहाण्यास सांपडली नाहीं. ही बागहि डोंगराच्या पायथ्याजवळ आहे.

## शालमार.

**शालमार दाल** सरोवराच्या ईशान्येस आहे. **श्रीनगर** शहर वसाविणारा राजा दुसरा **प्रवरसेन** ह्यानें स्वतःस रहाण्याकरितां ह्या ठिकाणीं एक सुंदर वाडा बांधला व त्यास **शालमार** The abode of love "**प्रेमगेह**" असें नांव दिलें अशी अख्यायिका आहे. इ. स. १६१९ मध्यें **जहांगीर** बादशहानें येथें एक सुंदर बाग तयार करविली. ह्या बागेची लांबी ५९० यार्ड असून रुंदी २६७ यार्ड आहे. बागेसभोंवतीं १० फूट उंचीचा एक तट बांधिला आहे. ही बाग एकावर एक चार मजले पायऱ्यांसारखे बांधून त्यांवर तयार केली आहे. प्रत्येक चौथऱ्यावर मोठमोठे हौद बांधलें असून त्यांत अनंत कारंजीं सारखीं उडत असतात. हौदांतील कारंज्यांची मजा पहाण्याकरितां हौदाच्या कांठावर लहान लहान बंगले बांधले आहेत व बंगल्यांच्या व्हरंड्यांत बाकें टाकिलीं आहेत. त्यावर शेंकडों लोक मजा पहात बसलेले असतात. ९ ते १४ यार्ड रुंद व १॥ फूट खोलीच्या पाटांनीं हे हौद एकमेकांस जोडले आहेत. वरच्या हौदांतून खालच्या हौदांत पाणी येतांना ते जोरानें वहात येतें म्हणून सर्व ठिकाणीं धबधब्याची मजा पहाण्यास सांपडते. हौद व पाट बांधण्यास सुंदर गुळगुळीत व चकचकीत काळा दगड वापरला आहे. बागेच्या मागील बाजूस असलेल्या जलप्रवाहांतील पाणी वळवून ह्या बागेस घेतलें आहे. शालीमार आणि निषाद ह्या बागा जर **मुंबईस** तयार करावयाचा विचार केला तर मुंबईस येणाऱ्या पाण्याचा चौथा हिस्सा पाणी ह्या बागांवारीच खर्च होईल, अशी माझी कल्पना आहे. बहुतेक मोंगल बादशहा ह्या बागांत आराम करण्याकरितां येत असत. औरंगजेबाच्या बरोबर प्रवास करणारा युरोपियन प्रवासी **बर्नियर** म्हणतो "ह्या ठिकाणीं वापरण्यांत आलेले दगडी खांब व दरवाजे हे **शहाजहान** बादशहानें उध्वस्त केलेल्या अनेक देवालयांचे असावेत. त्यांच्या किंमतीची कल्पना करणें अशक्य आहे.

ह्या बागांचें यथायोग्य वर्णन करणें माझ्या शक्तीच्या बाहेरचें काम आहे. मात्र अशा सुंदर बागा हिंदुस्थानांत माझ्या पहाण्यांत आल्या नाहींत.

येथून ३ मैलांवर **हरवान** नांवाचें ठिकाण आहे, तेथें डोंगराच्या दरीस मोठा बंधारा बांधून एक तलाव तयार केला आहे ह्याच तलावाचें पाणी **श्रीनगरास** नळानें नेलें आहे व ह्याच तलावांतून शालीमार व निषाद ह्या बागांस पाण्याचा पुरवठा होतो. संध्याकाळ होऊन पाऊस पडूं लागला म्हणून हरवानला जाण्याचा बेत रहित करावा लागला. हरवान येथें गुलाबाचीं झाडें सर्वत्र पसरलीं आहेत म्हणतात. येथून परत चालत जावें तर रात्र होणार म्हणून चवकशीस लागलों. तों श्रीनगरास जाणारी नाव मिळाली. **निषादबाग दाल सरोवराच्या** कांठावर वसली आहे; परंतु **शालीमार** सरोवरापासून सुमारें १ मैल आंत आहे; परंतु सरोवरापासून बागे-

पर्यंत कालवा खोदला आहे, त्यांतून नावा चालतात. मात्र जशा **निषाद**हून नावा सुटतात तशा शालीमारहून सुटत नाहींत. मुद्दाम कोणी **नांव केल्यास जातां येतां येतें.**

ह्या कालव्याची रुंदी १२ यार्ड असून त्याच्या दोहों बाजूंस हिरवागार गवतानें आच्छादिलेला रस्ता असून पलीकडे सुंदर कमानदार वृक्ष आहेत. त्यांच्या छायेखालून नांवेनें जातांना अतिशय आनंद होतो.

एक नांव एका गृहस्थानें स्वतंत्र आपल्या कुटुंबाकरितां केली होती तींत. जागा मिळाली. नांववाल्यानें **अमिरा कदलला** नेऊन सोडण्याचें कबूल केलें होतें. नांव **दाल** सरोवरांत गेल्यानंतर पाऊस पडून वाराहि जोराचा वहाण्यास सुरवात झाली. नांव उलटते कीं काय, अशी भीति कांहीं वेळ वाटली. परंतु नांव सुखरूपपणें किनाऱ्यास लागली. नांव लागली तें ठिकाण आमिराकदलपासून चांगलें २।-२॥ मैल होतें. नांववाला येथेंच उतरा म्हणाला. फसविल्याबद्दल त्याजपाशीं बोलाचाली झाली; परंतु जास्त बोलून वेळ घालवून रात्र होणार म्हणून १ आणा त्याच्या हातावर ठेवून रस्ता सुधारला व श्रीनगरच्या **जैनाकदल** नांवाच्या भागांत येऊन पोहोंचलों. व येथें पुन्हां १ आण्याची नांव करून **अमिराकदलला** आलों. खाणावळींत जेवण करून झोपी गेलों. ( १२।५।२९ )


ता. १३।५।२९ ला आज विश्रांति घेण्याचें ठरविलें होतें. कारण ता. २६ ४।२९ पासून विश्रांति मिळाली नव्हती. तसेंच थंडीमुळें रोज आंघोळहि घडत नसे. म्हणून आंघोळ करणें, कपडे धुणें व दुपारीं स्वस्थ झोंपणें असा कार्यक्रम ठरविला होता. खाणावळवाल्यास कढत पाण्याबद्दलहि विचारून ठेविलें होतें. सकाळीं उठून प्रथम चहाची चवकशी केली. **पुण्यामुंबई**सारखें एक हॉटेल दिसलें. चहाची चवकशी करितां ३ आणे कप चहा मिळेल असें मालकांनीं सांगितलें. बेत रहित केला. नंतर एक हालवायाचें दुकान दिसलें. येथें सामान्य प्रतीचा चहा मिळत होता. भाव ३ आणे शेर होता. पावशेर चहा व पाव वगैरे खाऊन रा. **गाडगीळ** ज्या बद्रीआश्रम नांवाच्या धर्मशाळेंत उतरले होते, तिच्या चवकशीस लागलों. ही धर्मशाळा लालमंडींत आहे. त्यांनीं पुण्याच्या पद्धतीप्रमाणें चहा वगैरे देऊन स्वागत करून दुपारच्या भोजनाचें आमंत्रणहि दिलें. **श्रीनगरांत** महाराष्ट्रीय जेवण हा योग अपूर्व होता, म्हणून फारसे आढेवेढे न घेतां आमंत्रण स्वीकारलें व आंघोळीकरितां कढत पाण्याचा वारहि लावला. यथाक्रम भोजन सुव्यवस्थितपणें पार पडलें.

**अमरनाथची** यात्रा कठीण असल्यामुळें सोबत मिळाल्यास उत्तम म्हणून त्यांनीं मला अमरनाथाच्या यात्रेस येण्याचा आग्रह केला व ४ महिन्यांचा कपडे, खाणेंपिणें, वगैरे सर्व खर्च पुरवितों म्हणूनहि सांगितलें. परंतु मजला ४ महिने मोडण्यास सवड नसल्यामुळें त्यांच्या म्हणण्यास मजला आभारपूर्वक नकार द्यावा लागला.

आज पोष्टांत असलेल्या बुकस्टॉलवर मुंबईइलाख्याच्या वर्तमानपत्रांची चवकशी

केली. ४ दिवसांचा शिळा टाइम्स विकत मिळाला. येथें **टाइम्स** येण्यास ४।५ दिवस लागतात. त्याच्या रोज पांच प्रती येथें येतात. **क्रॉनिकल** वगैरे पत्र येत नाहीं. टाइम्स वाचल्यामुळें आपल्या प्रांताची थोडी हालहवाल समजली. सुमारें ४ वाजेपर्यंत झोंप काढली. पुढें थंडीचें निवारण करण्याकरितां एक काश्मिरांत मिळणाऱ्या गरम कापडाची पेटी शिवून घेतली. २ रु. खर्च आला. येथें शाली वगैरे फार स्वस्त मिळतात. ३ रु. पासून शाली मिळूं शकतात. जातांना पैसे व आर्डर नेली असतां चांगला फायदा होईल. काश्मिरांत तयार होणाऱ्या लोंकरीच्या कपड्यास Puttoo ( पुट्टू ) हें नांव आहे.

संध्याकाळीं फिरत फिरत **झेलम** नदीची लेव्हल बिघडूं नये म्हणून श्रीनगरजवळ जो बंधारा बांधला आहे तो पहाण्यास गेलों. बंधाऱ्याच्या वरच्या पाण्याची



**थर्ड ब्रिज, श्रीनगर.**

लेव्हल खालच्या पाण्याच्या लेव्हलपेक्षां ५।६ फूट जास्त आहे. त्यामुळें वरून जहाजें खालच्या भागांत नेण्याकरितां व खालचीं जहाजें वरती आणण्याकरितां ३।४ दरवाजांची स्वतंत्र व्यवस्था केली आहे. ही व्यवस्था पाहून **पनामाचा** कालवा कसा असेल ह्याची कल्पना येते. नदीवर एकंदर ७ पूल बांधले आहेत. पैकीं पहिला फार उत्तम आहे. त्यावरून मोटारी जाऊं शकतात. इतर पूल लाकडी आहेत. त्यांवरून टांगे व माणसेंच फक्त जाऊं शकतात. त्या पुलांस इंग्रजींत फर्स्ट ब्रिज, सेकंड ब्रीज अशींच नांवें आहेत परंतु काश्मिरी लोक हीं नांवें ओळखत नाहींत. त्यांनीं त्यांस स्वतंत्र नांवें दिलीं आहेत तीं क्रमानें:—१ **आमिराकदल**, २ **हब्बाकदल**, ३ **फतहकदल**, ४ **जैनाकदल**, ५ **अलीकदल**, ६ **सफाकदल**, ७ **नवाकदल** अशीं आहेत, हें नांव विचारल असतां पत्ता लागतो.

पहिल्या पुलापासून सातव्या पुलापर्यंत नांवेनें जाण्याचें माणशीं भाडें १ ते २ आणे पडतें. अंतर सुमारें २॥–३ मैल आहे. साधारणतः इकडील नांवा काळोख पडल्यानंतर चालत नाहींत. म्हणून नांवेनेंच जाऊन नांवेनें परत येणें असेल, तर लवकर निघावें हें उत्तम. एकवार नावेनें जाऊन परत येणें ही एक आनंददायक सफर आहे. मधून मधून माणसें चढत व उतरत असतात. कांठावरून २।३ पैसे घेऊन अमक्या कदलला येतोस काय, वगैरेसंबंधीं नांववाल्यांजवळ लोकांची चवकशी चाललेली असते. नदीच्या कांठानेंहि रस्ता आहे. त्या रस्त्यानेंहि एकवार सफर करावी म्हणजे **श्रीनगरची** सामान्य कल्पना येते. गांव अत्यंत गलिच्छ आहे. सारखा चिखल तुडवीत जावें लागतें. नवीन वस्ती अमिराकदल हा भाग सोडल्यानंतर लागतें. तींत रस्ते वगैरे अगदीं रेखीव मुंबईसारखे आहेत. बागा, खेळण्याच्या जागा, मोठमोठीं ऑफिसें वगैरे ह्या वस्तींत आहेत. नदींत जिकडे तिकड हॅाउस बोटी दृष्टीस पडतात. ह्यांस दरमहा १०० ते १५० रु. भाडें पडतें. मग मात्र सर्व सोई बोटींत होऊं शकतात. शेंकडों श्रीमंत लोक ह्या बोटींत रहातात. अमिराकदल जवळ **काश्मिर** हिंदु हॅाटेल नांवाची खाणावळ रहाण्याच्या सोईसुद्धां बोटींतच आहे व काश्मीर खालसा हॅाटेल नांवाची मोठी खाणावळ पहिल्या पुलाजवळच एका मोठ्या इमारतींत आहे. ह्या हॅाटेलांत रोजीं १ ते ३ रु. माणशीं खर्च येतो. रहाण्यास जागाहि मिळते. पहिल्या पुलाजवळ **डॉ. अत्री**, M. B. B. S. ह्यांचा दवाखाना आहे. त्यांजकडे काश्मिर गाईड १॥ रुपयास मिळतें. त्यांत नको ती माहिती भरपूर व पाहिजे ती माहिती नाहीं, म्हणून मी तें विकत घेण्याचा बेत रहित केला.

**श्रीनगरास** सर्वत्र विजेचे दिवे दृष्टीस पडतात. श्रीनगरापासून सुमारें ५० मैलांवर **रामपूर** येथें पाण्यचा प्रवाह आडवून वीज उत्पन्न करून ती श्रीनगरास आणली आहे म्हणून ती स्वस्त पडते. इकडील लहान नावांस **किस्ती** हें नांव आहे. प्रवासी त्यांस **शिकारा** म्हणतात. दुकानांचीं तोंडें नदीकडे असल्यामुळें बाजार करण्याकरितां बरीच मंडळी नावेंतून जातात. आपल्याकडील टांग्यासारखा इकडे नांवेचा उपयोग करितात. म्हणूनच ह्या शहरास युरोपांतील **व्हेनिसची** उपमा देतात. ह्या प्रांतांतील नद्या व सरोवरांचें पाणी संथ असल्यामुळें नांवास हेलकावे फारसे बसत नाहींत, म्हणून इकडील नांवा आपल्या प्रांतासारख्या खालीं निमुळत्या होत गेलेल्या नसतात, तर खालून सपाट असतात. त्यामुळें त्यांत पाय पसरून अगर मांडी घालून बसावें लागतें. बसण्याकरितां नावेंत सुंदर गाद्यागिरद्या असून वरती छप्परहि असतें. नांववाले, टांगेवाल्यासारखेंच गिऱ्हाइकांस फसविण्यास तयार असतात. नवीन गिऱ्हाइकांस तर फसविणें म्हणजे ह्यांच्या हातचा मळ आहे. कितीहि पैसे दिले तरी बक्षीस मागण्याची यांची चालच आहे.

एक दिवस मी **जैनाकदल** येथील कापडाचे व्यापारी पं. विष्णुजी कौल ह्यास भेटावयास गेलों. येतांना १ आण्यास नेतो, म्हणून कबूल करून नाववाल्यानें

बदलला होता. नंतर गांवांत फिरण्यास गेलों. गांवाजवळ नदी असल्यामुळें व पाणी जमिनींत मुरून जमीन ओली झाली असल्यामुळें गांवांतील लहान लहान घरें, लांकडें पुरून त्यावर फळ्या टाकून त्यांवर बांधलीं होतीं. सुमारें २ वाजतां पाऊस पडण्यास सुरवात झाली. गांवांतून फिरून देवळांत येईतों सर्व कपडे भिजून गेले. थंडी वाजूं लागली. हलवायाच्या दुकानांतून थोडें दूध घेतलें. चहाचें दुकान इकडे नसतेंच. बाकीची मंडळी बंब पेटवून चहाच्या तयारीस लागली. लांकडें जमवून चहा तयार करणें मला शक्य नसल्यामुळें तसाच धर्मशाळेंत बसून राहिलों, तोंच एका गृहस्थास मी कोणी तरी परदेशी मनुष्य असून चहाशिवाय बसलों आहे हें आढळून आलें व तो चहा व पोळी घेऊन आला. इकडे चहाबरोबर खाण्याकरितां तुपांत तळलेल्या मोठ-मोठ्या पोळ्या मंडळींनीं आपल्याबरोबर आणल्या होत्या. तो गृहस्थ म्हणाला, " बाबाजी, आप के वास्ते चाय और रोटी लाया है. " मी आढेवेढे न घेतां स्वीकार केला. चहा वगैरे घेतल्यामुळें थंडीचें मान थोडें कमी झालें. मग धर्मशाळेच्या तिसऱ्या मजल्यावर जाऊन सृष्टिशोभा पहात स्वस्थ बसलों. तोंच पंडित **आफताबजी** माझा शोध करीत आले. त्यांजबरोबर खालीं आलों. पंडितजींनीं चहापाण्याची विचारपूस करून संध्याकाळची भोजनाची सोय करितों म्हणूनहि सांगितलें; परंतु मी त्यांस कृपा-करून आतां आणखी तसदी घेऊं नका म्हणून सांगितलें व त्यांनीं घेतलेल्या तसदीबद्दल त्यांचे पुन्हां एकवार आभार मानले. त्यांनीं एकमेकांच्या आंगास हात लावून पूजा थोडक्यांत आटोपली व उभयतां पंडितांनीं आपल्या घराकडे मोर्चा वळवला. संध्या-काळच्या स्वयंपाकाकरितां जागेच्या शोधास लागलों. पावसामुळें बाहेर सर्व जागा ओली झाली होती व धर्मशाळेंतील सर्व जागा यात्रेकरूंनीं व्यापून टाकिली होती. आतां काय करावें ह्या विचारांत होतों तोंच फराळाच्या दुकानांत जाऊन येथें खाणावळ आहे काय म्हणून चवकशी केली. दुकानदार म्हणाला येथें येतील तितक्या यात्रेकरूंस फुकट जेवण मिळण्याची सोय देवस्थानाच्या उत्पन्नांतून होते. त्या समोरच्या खोलींत मंडळी जेवत बसली आहेत, तेथें जा. तेथें व्यवस्थापक बसलेच होते. जातांक्षणींच त्यांनीं " क्या भोजन करना है, जरूर आइये, कहां से आते हो, " वगैरे प्रश्न केले. मी पूनेसे म्हणतांच ओं पूनासातारा, मी :म्हणालों जीहाँ. लगेच त्यांनीं नौकरास वाढण्याबद्दल आज्ञा केली सर्वांस वाटी वाटी खीर, भात, आमटी, भाजी वगैरे जिन्नस वाढले होते परंतु मला परदेशी आदमी म्हणून चांगली शेर दीडशेर खीरच आरंभीं दिली खिरीनेंच पोट भरलें. नंतर इतरही जिन्नस आग्रहपूर्वक वाढले. बायकापुरुष वगैरे सर्व मंडळी एकाच ओळींत बसली होती. पोटभर जेवण झालें. बाहेर पडतों तों संध्याकाळ होऊन आरतीची तयारी चालली होती. १०।१५ माणसांच्याकरितां जरी पूजा एकानें केलेली चालत असे तरी निरांजन मात्र प्रत्येकाचें. लहान मुलांसुद्धां स्वतंत्र पाहिजे असा नियम असल्यामुळें थोड्याच वेळांत जिकडे तिकडे दिवेच दिवे दिसूं लागले. मातीच्या पंत्यांतून तूप घालून त्या विक्रीकरितां दुकानांत ठेवल्या होत्या. मंडळी सारखी खरेदी

करून आणीत होती. सर्व मंडळीस कुंडासभोंवतीं उभे राहाण्यास जागा नसल्यामुळें बरीच मंडळी धर्मशाळेंत बसली होती व ती तेथूनच निरांजनें ओवाळीत होती. धर्मशाळांचे तीन ही मजले दिव्यांनीं भरून गेले होते. आपल्याकडील दिवाळीच्या दिव्यांपेक्षां जास्त मौज दिसत होती. साधारणतः ५०० तरी दिवे लागले असतील. आरती संपल्यानंतर सर्वांनीं कुंडासभोंवतीं दिवे ठेवून प्रदक्षिणा घातल्या व हा समारंभ खलास झाला. क्षीरभवानीस आल्यामुळें पुष्कळ काश्मिरी पंडित मंडळी पाहाण्यास सांपडली. हंसतमुख सुंदर स्त्रिया व मोकळ्या अंतःकरणाचे व उदारवृत्तीचे पुरुष पाहून चिडखोरवृत्तीच्या मनुष्याची वृत्ति सुद्धां आनंदी होऊन जाईल. मात्र त्याकरितां इकडील गरीब लोकांशीं स्नेह जोडला पाहिजे. रात्रीं निजण्याचा प्रश्न महत्त्वाचा होऊन बसला होता. धर्मशाळा सर्व उघड्या होत्या. थोडीशी कुठें निवाऱ्याची जागा होती, ती आलेल्या मंडळींनीं पूर्वींच पटकावून टाकिली होती. अगदीं उघड्यावर



**शहा हॅमडन नांवाची मशीद, श्रीनगर.**

सर्वांनीं नाकारलेली अशी जागा माझ्या वांट्यास आली. तेथें जाऊन तळ दिला. कपडे पावसानें ओले झालेच होते तरी तशीच सतरंजी पसरली. जवळच श्रीनगरच्या प्रताप कॉलेजांतील कांहीं विद्यार्थी बसले होते. एकानें चवकशी केली. चवकशीअंतीं मी एक शिक्षक आहे हें समजल्यानंतर त्यानें फारच मदत केली. प्रथम शेकण्याकरितां कांगरी दिली, तीवर मी कपडे वाळविले व आंगही शेकलें. नंतर आंथरण्याकरितां चटई दिली म्हणून सतरंजीचा पांघरण्याकडे उपयोग करितां आला. मी एकास काश्मीरच्या दुय्यम प्राथमिक व विश्वविद्यालयीन शिक्षणाबद्दल माहिती विचारिली. त्याचें नांव **रघुनाथ** खोडा असें असून तो इंटरच्या वर्गांत होता. त्याला पर्शियनमध्यें कविता करण्याचा नाद असून " मुस्ताकी " ह्या टोपण नांवानें त्याच्या कविता

प्रसिद्ध होतात. संस्कृत येत नाहीं. त्यास संस्कृत शिकण्याबद्दल सांगितलें. ते विद्यार्थी म्हणाले "आमच्या इकडे राजकीय चळवळ करणारे लोकच नाहींत. वर्तमानपत्रें वाचून आम्हांस उपरती होऊन आम्ही हल्लीं खादी वापरतों. प्राथमिक शिक्षण संस्थानांत मोफत मिळतें, मात्र सक्तीचें नाहीं. हायस्कूलमध्यें २ आण्यांपासून १ रु. पर्यंत फी असून तीही पालकांच्या उत्पन्नावर अवलंबून आहे. गरिबांस फी नाहीं ( आमच्याकडे १०००० रु. पगार मिळविणाऱ्या पालकाच्या मुलास व १० रु. मिळविणाराच्या मुलास फीचें प्रमाण एकच आहे. ) कॉलेजमध्यें मासिक फी अवघी २ रुपये असून तेथेंही शेंकडा ४०।५० नादाऱ्या व अर्ध नादाऱ्या आहेत त्यामुळें काश्मिरांत शेंकडा ९० पंडितांस इंग्रजी येतें. इंग्रजी शिक्षणामुळें त्यांचेंही ध्येय नोकरी हेंच ठरून गेलें आहे. आमच्याकडे लोकांस तालीम करण्याचा शोक नाहीं." पिळदार शरिराचे काश्मिरी पंडीत माझ्या पाहाण्यांत आले नाहींत. उत्तम हवापाण्यामुळेंच त्यांची प्रकृती कार्य चांगली राहील तितकीच—येथून मानसबल नांवाच्या सरोवराची चवकशी करीत दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून चालण्यास सुरवात केली.

क्षीरभवानीपासून मानसबल सुमारें ६ मैल आहे. दोन मैलांवर एक खेडेंगांव लागलें. तेथील एका पंडितांनीं चवकशी करून चहा वगैरे दिला. सुमारें १० वाजतां मानसबल नांवाच्या सरोवराजवळ येऊन पोहोंचलों. ह्या सरोवराची लांबी सुमारें २॥ मैल असून रुंदी अर्धामैल आहे. सरोवराच्या कांठावर बरीच लहानलहान गांवें वसलीं आहेत. ह्या सरोवरांत सिंधू नदीचें पाणी येतें म्हणतात. ह्या प्रदेशास सिंधदरी असेंही नांव आहे. ह्या सरोवरांतून होडीनें श्रीनगरास जातां येतें. कांठावर एक तंबू ठोकला होता त्यांत कांहीं युरोपियन मंडळी दिसली. सभोंवतीं डोंगर, कांठावर वसलेलीं सुंदर खेडीं त्यांतील सुंदर घरें सरोवराच्या कांठावर असलेलीं. सुंदर झाडें वगैरे पाहून फार समाधान झालें. नंतर सरोवराच्या कांठानेंच चालूं लागलों. २ मैल गेल्यानंतर **सफापूर** नांवाचें गांव लागलें. येथें पंडित मंडळींची वस्ती आहे. आतां जगप्रसिद्ध वूलर सरोवर पाहण्यास जाण्याचा विचार होता त्या चवकशीस लागलों होतों. मानसबलाहून वूलर सरोवराच्या कांठच्या १८ मैलांवर असलेल्या **बंडापूर** गांवीं वस्तीस जाण्याचें ठरविलें होतें. मानसबलाहून बोटीनें जातां येतें परंतु कांहीं रुपये भाडें पडतें. भाडें आण्यांत असतें तर विचार केला असता. सुबल नांवाच्या गांवांतून नावा सुटतात अशी बातमी लागली म्हणून सफापुराहून सुमारें १ मैलावर असलेल्या सुबल गांवीं गेलों तोंच १२ चा सुमार झाला. दुपारच्या उन्हाचा त्रास होऊं लागला. जवळच एक तीन मजली उत्तम बांधलेलें घर होतें. घराच्या बाहेर बायका उभ्याच होत्या. त्यांच्या डोक्यावर असलेल्या पांढऱ्या पट्ट्यावरून त्या ब्राह्मणाच्या बायका आहेत हें मी ओळखलें. मुसलमानांच्या बायकांच्या डोक्यास पांढरी पट्टी नसते. कडक कॉलरसारखी एक पांढरी पट्टी प्रत्येक पंडितानीच्या डोक्यावर असते. झाडाखालीं घरासमोरच विश्रांति घेत बसलों. कांहीं वेळानें शेतकऱ्याच्या वेषांतील घरधनी आले. त्यांच्या पोषाखावरून त्यांस

मुसलमानच म्हटलें असतें परंतु गळ्यांतील जानव्यावरून ते ब्राह्मण असावेत अशी खात्री झाली. त्यांनीं परदेशी मनुष्य म्हणून चवकशी करून भोजनाचें आमंत्रण दिलें. घरावरून ते बरेच श्रीमंत असावेत अशी सहज कल्पना होत होती. ते स्वतः राबून शेती करतात. घर जरी उत्तम व मोठें होतें तरी घरांत मडकींच होतीं. आग्रह कर-करून त्यांच्या पत्नीनें भोजन वाढलें परंतु आदल्या दिवशीं खाल्लेल्या खिरीनेंच पोट इतकें भरलें होतें कीं भूक फार थोडी होती. भोजनोत्तर थोडा वेळ गप्पागोष्टी मारीत बसलों. पलीकडेच त्यांची बायको मातीनें भांडीं घाशीत बसली होती. नुसत्या कोरड्या मातीनें भांडीं घासून तीं तशींच पुसून ठेवावयाची इकडे चाल आहे. त्यांस पाण्याची आवश्यकता भासत नाहीं. असें कां म्हणून मी शेतकरीबुवांस विचारिलें ते म्हणाले आतां उन्हाळ्याच्या दिवसांत एकवेळ पाण्याचा उपयोग करून भांडीं स्वच्छ करितां येतील परंतु हिंवाळ्यांत कसें करणार ? आमच्या इकडे हिवाळ्यांत घराबाहेर ५।५ ६।६ फुटांचें बर्फाचें थर रस्त्यावर पडतात. घराच्या बाहेर पडणें म्हणजे प्राणसंकट इतकी थंडी असते. अशा वेळीं पाण्यांत हात घालणें शक्यच नसतें म्हणून आमच्याकडे कोरड्या मातीनेंच भांडीं घासण्याची चाल आहे. आपल्याकडील खेडेगांवांतलि लोकांप्रमाणेंच इकडील खेड्यांतील लोक सुद्धां पाहुण्याचें आदरातिथ्य फार चांगलें करतात. योग्य वेळीं घातलेल्या भोजनाबद्दल त्यांचे आभार मानून चालण्यास सुरवात केली.

**सुबल**पासून **सदराकूट** नांवाच्या गांवाकडे निघालों. सदराकूटला जातांना उजव्या हातास निरनिराळ्या रंगांच्या फुलझाडांचीं शेतें व पलीकडे डोंगर व डाव्या हातास हिरव्यागार गवतांचा समुद्र व पलीकडे पाण्याचा कालवा असा मोठा रमणीय देखावा दिसत होता. रस्ता चांगला बांधलेला आहे. सुबल तें सदराकूट अंतर ४ मैल आहे. येथेंही नाव मिळाली नाहीं. येथून सडक तशीच पुढें **अजस** नांवाच्या गांवीं गेली आहे. तेथें नक्की नाव मिळेल असा तपास लागला. सडकेनें गेल्यास लांब पडतें म्हणून सदराकूट गांवांतून अजसला पायवाट गेली आहे तिनेंच गेलों. सुमारें २॥ मैल चालल्यानंतर बंदर आलें. येथें बऱ्याच नावा उभ्या होत्या. वाटेंत एका मुसलमानानें जेवण झालें आहे काय ? नसल्यास चला शिधा देतों, जेवण तयार करून जा म्हणून सांगितलें. ह्या प्रांतांत पंडित लोकांची वस्ती फार थोडी. बहुतेक लोक मुसलमान आहेत परंतु ते चांगले आहेत. अजस हें गांव **सफेता** नांवाच्या वृक्षाच्या झाडींत बसलें आहे. झाडी इतकी दाट आहे कीं दिवसा भर १२ वाजतां सूर्यप्रकाश खालीं पोहोंचावयाचा नाहीं. **वूलर** सरोवराच्या पाण्याचा एक कालवा **मानसबलला** मिळविला आहे तो **अजस**वरून गेला आहे. नाववाले गिऱ्हाइकांची वाटच पहात होते. मी गेलों तों ३ चा सुमार झाला होता मला वाट पाहाण्यास सवड नव्हती. अजून **बंडापूर** ८।९ मैल होतें व दिवस मावळण्यापूर्वी तेथें जाऊन पोहोंचणें जरूर होतें म्हणून मी स्वतंत्रच नाव एकट्याकरितां भाड्यानें केली. भाडें घासाघिशीनें ३ आणे ठरलें. पाय-

लांब करून टेंकून आरामशीर बसलों. थकल्यामुळें विश्रांतीची जरूर होतीच. आज सुप्रसिद्ध वूलर सरोवर पाहाण्यास मिळणार म्हणून आनंद वाटत होता. नावेच्या डाव्या हातास सुंदर दाट झाडी होती तिच्या छायेंतून नाव चालल्यामुळें उन्हाचा त्रास होत नव्हता. उजव्या हातास सडक असून पलीकडे हिरवेगार डोंगर होते. मोठा आनंददायक देखावा होता. सुमारें १ मैल कालव्यांतून गेल्यानंतर नाव वूलरसरोवरांत शिरली. ह्या सरोवराची लांबी सुमारें १३ मैल असून रुंदी ७ मैल आहे. ह्या सरोवरानें सुमारें १०० चौरस मैलांचा प्रदेश व्यापून टाकिला आहे. लहानसा समुद्रच वाटला. सूर्य अस्तास जाण्याच्या बेतांत होता तोंच नाव किनाऱ्यास पोहोंचली. ह्या सरोवराच्या कांठचा सूर्यास्त पाहाण्याकरितां लांबलांबचे लोक येतात इतका तो देखावा मजेदार असतो. सरोवराचें पाणी **दाल** सरोवरासारखें स्वच्छ नाहीं, साधारण गढूळच आहे. इतक्या उंचीवर इतकें मोठें गोड्या पाण्याचें सरोवर जगांत नाहीं म्हणतात. नाव थेट बंडापूरपर्यंत जात नाहीं तेथून १॥-२ मैल लांबच उभी राहाते. नावेंतून उतरून चालूं लागलों तों संध्याकाळ झाली. संध्याकाळीं ७ च्या सुमारास गांवांत पोहोंचलों. आरंभींच पोष्ट ऑफिस लागलें. पोष्टमास्तरसाहेब भेटले त्याजपाशीं धर्मशाळेची चवकशी इंग्रजींत प्रश्न विचारून केली. ते म्हणाले, धर्मशाळेंत कशाला आमचेकडेच राहा, कांहीं हरकत नाहीं. फारसे आढेवेढे न घेतां सामान ठेवून गांव पाहाण्यास गेलों. हें ठिकाण शिखरांवर नेहमीं बर्फ पडणाऱ्या डोंगराच्या पायथ्याजवळ बसलें आहे म्हणून येथील हवा फार सुदर आहे. संस्थानच्या लष्करांतील १०० शिपायांची येथें राहाण्याची सोय केली आहे व आळींपाळीनें सर्व शिपायांस येथें आणून ठेवतात. येथून संस्थानच्या सरहद्दीवरच्या **गिलगिट** प्रांतास सुरवात होते.

गिलगिट हें ठिकाण येथून १९६ मैल दूर आहे. सर्व रस्ता डोंगरांतून आहे. ह्या प्रांतांतील लोकांस **गिलचे** म्हणतात. बंडापूर ज्या डोंगराच्या उतरणीवर बसलें आहे त्यावर बर्फ पडत असल्यामुळें तें वितळून वाहाणाऱ्या पाण्याचे प्रवाह सर्व गांवांतून चालले होते. गांवांतून फिरून आलों. मास्तरसाहेबही फिरून आले होते. मास्तरसाहेबांचें नांव पंडित **श्रीधरजी रैना असून** ते मोठे आनंदी गृहस्थ आहेत. त्यांनीं पोस्टासमोर सुंदर बाग तयार केली आहे. चारी बाजूंनीं गुलाबाचीं झाडें लावून मध्येंच बसण्याकरितां जागा केली आहे. पोस्ट ऑफिस उंचावर आहे. तेथून सुमारें १ मैलपर्यंत सपाट प्रदेश आहे. त्यांत असलेल्या बागांमुळें तो प्रदेश हिरवागार दिसतो व पलीकडे समुद्राप्रमाणें पसरलेलें वूलर सरोवर दृष्टीस पडतें. हा देखावा पाहात व पुस्तक वाचीत ते तासचे तास बसतात असें त्यांनीं सांगितलें. गांव डोंगराच्या उतरणीवर बसलें असल्यामुळें एका घराच्या डोक्यावर दुसरें घर अशी घरांची बांधणी झाली आहे. गांवांत धर्मशाळा, देऊळ वगैरे सर्व सोई प्रवाशांकरितां आहेत. येथून वूलर सरोवराच्या अगदीं समोरच्या तीरावर **शोपूर** म्हणून गांव आहे. तेथें वूलर सरोवर नावेंतून ओलांडून जावें म्हणून मी येथें आलों होतों. मी गेलों त्या दिवशीं हवा

वादळी होती व तशीच दुसऱ्या दिवशीं असण्याचा संभव होता. वादळामुळें लहान होड्या मध्येंच उलटतात. मोठ्या होड्या सध्यां सुटत नाहींत तरी तुम्ही चालतच **शोपूरला** जा असा तेथील पी. डब्ल्यू. डी मधील गृहस्थ पंडित **कंठराम** ह्यांनीं सल्ला दिला व तो मजला पटला म्हणून मी चालतच जाण्याचें ठरविलें. शिवाय नावा बंदरांतून सकाळीं ६ वाजतां सुटतात व बंदर गांवापासून १ मैल लांब आहे म्हणजे रात्रीं बंदरावर वस्तीस गेलें पाहिजे, हेंही मला त्रासाचें वाटलें. तळास सपाट असलेल्या नावा लवकर उलटतात. शोपूर येथून सुमारें १८ मैल दूर आहे. रात्रीं मास्तरसाहेबांकडेच मुक्काम झोडला. जेवण काश्मिरी पद्धतीचेंच झालें. मात्र रात्रीं निजतांना चांगलें आटीव दूध मास्तरांनीं प्यावयास दिलें. बऱ्याच गप्पा झाल्या आतांपर्यंत भेटलेल्या मंडळींत मास्तरसाहेबांची सांपत्तिक परिस्थिति बरी दिसली. त्यांनीं प्रश्नही मोठा चमत्कारिक विचारला. ते म्हणाले तुम्हीं काश्मीर बहुतेक पायांनीं फिरून पाहिलें तर काश्मिरी लोकांत कोणते दोष तुम्हांस आढळले तें सांगा. मी त्यांस गुण सांगण्यास तयार झालों. त्यांचा मनमिळाऊपणा, कुशाग्र बुद्धि, उदारपणा, दिलदारपणा, पाहुण्यांचा आदरसत्कार, सचोटी वगैरे गुणांची मी तारीफ केली परंतु त्यांनीं दोष सांगाच, आम्हांस ऐकावयाचे आहेत असा आग्रह धरल्यामुळें मी बऱ्याच गोष्टी सांगितल्या. त्यांपैकीं आठवतात तितक्या येथें देतों.

( १ ) शरीरप्रकृतीकडे स्वतंत्र लक्ष नाहीं. परमेश्वराच्या कृपेनें कांहीं चांगली राहील तितकीच. पिळदार दंडाचा एकही पंडित मला आढळला नाहीं—मुसलमानांत मात्र सशक्त लोक आढळले. कारण ते शेतांत काम करितात—

( २ ) स्त्रीशिक्षणाची अनास्था.

( ३ ) चालू देशस्थितीबद्दलचें औदासिन्य.


( ४ ) अस्वच्छपणा—कारण कपडे भरपूर असले तरी मळकट असतात.

त्यांनीं सर्व प्रश्नांचें एकच उत्तर दिलें व तें म्हणजे [ Poverty ] दारिद्र्य. व नंतर कलमवार खुलासाही केला.

( १ ) पोटाकरितां दिवसभर काम करावें लागतें म्हणून शरीरप्रकृतीकडे पाहाण्यास वेळ मिळत नाहीं व काम करूनही इतका थोडा पैसा मिळतो कीं दूध, तूप वगैरे पदार्थ विकत घेण्यास परवडत नाहीं.

( २ ) घराच्या बाहेर पडावयाचें म्हणजे कपडे चांगले पाहिजेत. पोटाची खळगी भरून फार थोडा पैसा शिल्लक राहातो त्याचे थंडीच्या निवारणाकरितां शक्य तितके कपडे घेतलेले असतात परंतु त्यांस काम फार पडतें. २।२ सेट ठेवणें परवडत नाहीं म्हणून वाईट कपडे घालून शाळेंत जाण्यास मुलींना लाज वाटते. लोक परंपरागत रूढीला चिकटलेले आहेत.

( ३ ) देशस्थितीचा विचार करणारा वर्ग म्हणजे सुशिक्षितांचा. परंतु संस्थानांतील सुशिक्षितांचा जो पंडितांचा वर्ग तो सर्व सरकारी नोकरींत अडकून गेला



टॅनिन लिडर दरीचा देखावा काश्मीर.


आहे. म्हणून त्यांपैकीं कोणी बोलूं शकत नाहींत. खालच्या वर्गास कळत नाहीं. दिवसेंदिवस सुशिक्षितांची बेकारी वाढत आहे तिचा परिणाम राजकीय चळवळ होण्यांत कदाचित् होईल.

( ४ ) थंडीमुळें कपडे सारखे घालावे लागतात. धुवावे तर लवकर वाळत नाहींत. जादा कपडे नाहींत म्हणून अस्वच्छता आहे. मी त्यांस ब्लँकेटावर जेवण्याचें कारण विचारिलें. ते म्हणाले आमची पूर्वापार चाल जमीन चांगली सारवून तीवर ताट ठेवून जेवण्याची आहे, परंतु थंडीच्या दिवसांत पाण्यांत हात घालून जमीन सारवणें अत्यंत कठीण असल्यामुळें थंडीच्या दिवसांत ब्लँकेटावर जेवण्याची परवानगी आमच्या शास्त्रांत ठेवली आहे. कापसाच्या वस्त्रांत जीव जंतू राहातात तसे ब्लँकेटांत राहात नाहींत म्हणून तें पसंत केलें आहे. आम्ही सुधारक मंडळी नेहमींच ब्लँकेटाचा उपयोग करूं लागतो. आमचे वडील जमीन सारवून तीवरच जेवतील त्यांस ही आमची सुधारणा पसंत नाहीं. ही आमच्याकडे आतां फ्याशन झाली आहे. परंतु शाळेंत मुलीं पाठविणाऱ्या सुधारकांस मात्र अजूनही त्रास होतो. रात्रीं झोपण्याकरितां अंथरूणपांघरूण भरपूर मिळालें. तेथून बर्फप्रदेशास सुरवात असल्यामुळें व हें ठिकाण सरोवराच्या कांठावर असल्यामुळें थंडीचें प्रमाण फार होतें, पण पांघरूण इतकें उबदार दिलें होतें कीं रात्रीं आंगांतून घाम बाहेर आला. आज बरेच दिवसांत न मिळालेली गोष्ट म्हणजे ( हिंदुस्तानटाइम्स ) हें इंग्रजी वर्तमानपत्र मास्तरसाहेबांकडे मिळालें. खेडेगांवांतून फिरतांना जग सुटल्यासारखें झालें होतें. वर्तमानपत्र वाचून झोपीं गेलों. सकाळीं उठून पंडितजींचे आभार मानून त्यांचा निरोप घेतला. आज चालण्याच्या प्रवासाचा शेवटचा दिवस होता. म्हणून जसा बैल घराच्या ओढीनें जोरानें चालतो तसा थोडासा उत्साहानें चालत होतों. रस्ता मोठा मजेदार होता. डाव्या हातास सुंदर झाडें असलेला प्रदेश असून पलीकडे समुद्राप्रमाणें वाटणारें वूलर सरोवर दिसत होतें. उजव्याहातास बर्फाच्छादित पांढऱ्या शुभ्र डोंगरांची रांगच्यारांग लागली होती. वाटेंत खळखळ वाहाणारे पांढऱ्या गोळ्यांनीं भरलेले स्वच्छ पाण्याचे ओढे सारखे लागत होते. हा प्रदेश पाहून नेपाळच्या प्रवासाची आठवण झाली. नेपाळ प्रांतांतील प्रवास चढउताराचा व हा सपाटीवरचा इतकाच फरक. बंडापूरपासून सुमारें दोन मैलांवर एक खेडेगांव लागलें. तेथें रस्त्याची चवकशी केली. सर्व रस्ता वूलरच्या कांठाकांठानेंच आहे. मंडळी म्हणाली आतां शोपूरपर्यंत ब्राह्मणवस्ती नाहीं; कोठें जेवण कराल ? हातानें स्वयंपाक करण्यांत वेळ मोडाल तर रात्र होईल; मध्येंच मुक्काम करावा लागेल स्वयंपाक मुसलमानाकडे करावा लागेल व वस्तीही त्यांजकडेच करावी लागेल. येथें जेवण करून जा. तसें जाऊं नका. जेवणाकरितां थांबणें म्हणजे १॥ तास फुकट घालविणें हेंही जिवावर आलें. मंडळी तर आग्रह सोडीनात. एक पंडितजी म्हणाले तुम्हांस जाण्याची घाईच असेल तर आमच्याकडे कालचा भात आहे, चालत असल्यास चला. उपाशीं १८ मैल चालण्यापेक्षां शिळा भात खाणें पसंत करून

त्यांजकडे गेलों. थंडीच्या दिवसांत थंड प्रदेशांत थंड पाण्याशीं तो थंड भात कसाबसा घशाखालीं लोटला. चांगली थंडी वाजूं लागली, परंतु पंडितजींनीं गेल्याबरोबर चहा-चीहि ऑर्डर देऊन ठेविली होती तमुळें बचावलों. नेपाळच्या प्रवासाच्या वेळीं असल्या भोजनाचे प्रसंग बरेच आले, परंतु लहानपण कष्टांत गेलें असल्यामुळें त्यांचा विशेष कांहीं त्रास वाटला नाहीं. परंतु त्यापुढें आतां १२ वर्षे कांहींसा सुखांत काळ काढल्यामुळें जीभ तक्रार करूं लागली, परंतु मनानें तिचा अर्ज काढून टाकून पोट, पाय इत्यादिकांच्या म्हणण्याचाच पहिल्याप्रथम विचार केला व त्या जेवणाचा स्वीकार करणें जिभेस भाग पाडलें. जेवण झाल्यामुळें चालण्यास एकप्रकारचा हुरूप आला. मी गेलों त्याच दिवशीं गांवांत एक मुलगा मयत झाला होता. गांवांतलि मंडळी त्या गडबडींत होती. मोठमोठीं लाकडें घेऊन मंडळी स्मशानाकडे चालली होती. प्रेत भाकडाच्या २ फळ्या एकास एक बांधून त्यांवरून तेथें नेऊन ठेविलें होतें. दहन कर-ण्याकरितां एके ठिकाणी जागा चांगली सारवून तीवर रांगोळी काढली होती व पलीकडे होमहवन चाललें होतें. नंतर चिता रचून अग्नी देण्याची त्यांची चाल दिसली. परंतु जास्त वेळ तेथें उभें राहाणें अप्रशस्त वाटल्यामुळें पुढचा रस्ता सुधारला. सुमारें अर्धा मैल जातों तोंच पाठीमागून एक मुसलमान शोपूरला जाणाराच आला व तुमचा बोजा मजपाशीं द्या, मला कांहीं मजुरी देऊं नका, मलाही शोपूरलाच जाव-याचें आहे असें म्हणून बोजा देण्याबद्दल फार आग्रह करूं लागला. तोंडावरून तो लबाड दिसला नाहीं म्हणून बोजा त्याच्या स्वाधीन करून चालण्यास सुरवात केली.

**बंडापूर**पासून सुमारें ५।६ मैलांवर **किमाघाट** नांवाचें गांव लागलें. रस्ता कच्चा आहे. १।२ रुपयांस **बंडापुराहून शोपूरला** जाण्यास घोडीं मिळतात परंतु त्यांचा धनी बरोबरच येत असल्यामुळें तीं माणसाच्याच चालीनें चालतात. तो प्रवास फारसा सुखावह नाहीं. **किमाघाट**हून ६ मैलांवर **क्यूनुसा** अगर **टक्की** नांवाच्या गांवापर्यंत सरोवराच्या कांठाकांठानें नावेंतून जातां येतें असें समजलें. सरोवराच्या मध्या-वर नाव उलटण्याचा संभव असतो तितका कांठाशीं नसतो. म्हणून ४ आण्यांत दोघांस नेण्याकरितां एक नाव ठरविली. **वूलर** सरोवरांतून शक्य तितका जास्त प्रवास नावेंतून करावा अशी फार इच्छा होती. व संपूर्ण चालण्याचा आतां त्रासहि वाटत होता. सारखे १८ दिवस चालणेंच चाललें होतें. सुमारें ४ मैल प्रवास सुखानें झाला व पुढें नाव थोडीशी खोल पाण्याकडे वळली तोंच वारा सुटून पाऊसहि पडण्यास सुरवात झाली. नाव हेलकावे खाऊं लागली. एकदोनदां तर उलटते कीं काय असें वाटून पोटांत गोळा उठला. सरतेशेवटीं नावाड्यास नाव किनाऱ्यास घेण्यास सांगितलें. "मूर्खा-सारखा वादळ असतांना नावेंतून जाऊन बुडून मेला" ह्या कीर्तीपेक्षां वादळास भिऊन नाव सोडून दिली ही अपकीर्ति पत्करून रस्ता धरला. नाहींतर तळ पहाण्याची वेळ आली असती. नाववाल्यास ठरलेले पैसे देऊन वाटेस लावलें. सुमारें २ मैल चालल्यानंतर एक डोंगर लागला. ह्याच्यावरून रस्ता गेला आहे, चढाव

फारसा नाहीं. डोंगरमाथ्यापासून **शोपूर** ७ मैल आहे. डोंगर उतरल्यावर पक्की सडक लागते. सडकेच्या दोहों बाजूस सुंदर झाडी आहे. दुपार झाली होती, तरी चालण्याचा त्रास वाटत नव्हता. सुमारें ३।–३॥ वाजतां **शोपूरला** पोहोंचलों. हें एक लहानसें गांव **वूलर** सरोवरास झेलम नदी मिळते त्या ठिकाणीं बसलें आहे. हें ब्लँकेटाकरितां प्रसिद्ध आहे. येथून **झेलम** नदींतून नावेनें **बारामुळा** येथें जातां येतें.



**झेलम नदीवरील झुलता पूल.**

परंतु सडकेनेंहि जातां येतें. मोटारीस ५।६ आणे पडतात. आज वस्ती बारामुळा येथें करण्याचा विचार केला होता. **शोपूरहून** ३ मैल सडकेनें गेल्यानंतर **श्रीनगरहून** पिंडीस जाणारा रस्ता लागतो. येथून ७ मैलांवर **बारामुळा** आहे. १० मैलास ३ आणे-प्रमाणें टांगा मिळाल्यामुळें टांग्यांतून गेलों. वाटेंत सुंदर झाडी आहे. **काश्मीर**मध्यें **विलो, चिनार, तूत** व **सफेता** हे वृक्ष मुख्यतः दृष्टीस पडतात. **श्रीनगर** ते **शोपूर** अंतर ३० मैल आहे. **बारामुळा श्रीनगर**पासून ३४ मैल आहे.

**बारामुळा** हें झेलमनदीच्या दोन्ही तीरावर वसलें आहे. नदीवर एक मोठा तारांचा झुलता पूल बांधला आहे. येथें व्यापार फार मोठा चालतो. बारामुळा येथून जवळच **गुलमर्ग** म्हणून एक सुंदर हवेचें ठिकाण आहे ह्या ठिकाणीं बाराहि महिने पाऊस पडतो म्हणून येथें उन्हाळ्यांत तीन चार महिनेच रहातां येतें. पुष्कळ युरोपियन लोक येथें जाऊन रहातात. ह्या ठिकाणीं सुंदर रंगाचीं फुलझाडें कित्येक मैलपर्यंत पसरलीं आहेत. **श्रीनगर** ते **गुलमर्ग** अंतर २५ मैल आहे. मी गुलमर्ग पाहण्यास गेलों नाहीं. बारामुळा येथें विजेचा मोठा कारखाना आहे त्यामुळें गांवांत जिकडे तिकडे विजेचा चकचकाट दिसत होता. येथून **रावळपिंडी**पर्यंत स्वस्त मोटार मिळेल अशी बातमी लागली होती. मिळाली नसती तर चालत जाऊनहि **रावळपिंडी**


गांठतां येईल इतके दिवस अंगावर होते. परंतु डोंगराळ मुलखांतून मोटारीनें प्रवास करण्याची ही एकप्रकारची मजा असते. दुसरें ह्यापुढें देखावा कमी कमी प्रमाणांत दिसत जाणार कारण प्रवास सुंदर प्रदेशाकडून रुक्ष प्रदेशांकडे होणार अर्थात नवीन नवीन चांगले देखावे पाहून उत्पन्न होणारा उत्साह ह्या वाटेनें उत्पन्न होणें शक्य नव्हतें म्हणून चवकशीस लागलों. वाटेंत एका सद्गृहस्थांनीं २ रु. पेक्षां जास्त पैसे देऊं नका म्हणून मुद्दाम बजावून सांगितलें होतें. मे महिन्यांत बाहेरचे लोक काश्मिरांत येत असतात व ते आगष्टअखेर काश्मीर सोडतात;म्हणून मोटारवाल्यांस **श्रीनगराहून**



काश्मिरी झोपडी.

परत **रावळपिंडीस** जातांना मे महिन्यांत गिऱ्हाईक मिळत नाहीं. एकादें गिऱ्हाईक असलें तर त्याच्याकरितां उड्या पडतात. पुष्कळशा मोटारी दुसऱ्या दिवशीं सकाळीं **रावळपिंडीस** जाणार होत्या. बऱ्याच मोटारएजंटांचा घोळका जमला व त्यांनीं ५ रु. पासून सुरवात केली. मी २ रु. बोलून स्वस्थ बसलों. ४ द्या. ३ तरी द्या म्हणून त्यांनीं बरीच कटकट केली. शेवटीं एकजण २ रुपयास कबूल झाला. मोटारचा धंदा करणारे लोक बहुतेक मुसलमान आहेत व त्यांचा **पंजाबशीं** नेहमीं संबंध येतो


म्हणून त्यांच्यामध्यें हिंदूबद्दलचा द्वेष वसत असतो. तसेंच इंग्रजी राज्याशीं आलेल्या संबंधामुळें फसवेगिरींतहि ते निष्णात असतात म्हणून मला बरीच सावधगिरी बाळगावी लागली. एजंटानें लगेच पैसे मागितले व तिकीट फाडून देऊं लागला. मी त्यास सांगितलें तिकीट उर्दूत चालणार नाहीं, इंग्रजींत मी सांगतों तशी २ रुपयांची पावती लिहून देशील तर पैसे देईन. हो ना करितां करितां तो तयार झाला. झोंपण्याकरितां एजंटाची खोली होती तिचाच आश्रय केला. गांवांत एक वैष्णवाची खाणावळ होती. तेथें भोजन २ आण्यांत उरकलें. रात्रीं खाटहि एजंटाकडूनच मिळाली. मी एजंटास पुरें ओळखलें हें त्यास आढळून आल्यामुळें तो माझ्याशीं फार सभ्यपणानें



**सिंद दरी.**

वागला. मात्र दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यानें वाटेंत भरावा लागणारा १२ आणे कर तुम्ही भरा असें सांगितलें. कराची गोष्ट आदल्या दिवशीं आगाऊ माहीत असती तर तसा स्पष्ट खुलासा पावतींत केला असता. कारण कर मोटारवाल्यांपासून घेतात परंतु त्यानें ऐत्या वेळीं सांगितल्यामुळें १२ आणे जादा खर्च झाला. वाटेंत ३ ठिकाणीं कर भरावा लागतो. मोटार सकाळीं सुमारें ९ वाजतां निघाली पुढें कदाचित् जेवण मिळणार नाहीं म्हणून बारामुळा येथेंच सकाळीं भोजन उरकून घेतलें होतें. सुमारें १०॥ वाजतां बारामुल्याहून २९ मैलांवर असलेल्या **उरी** नांवाच्या गांवीं मोटार थांबली. येथें मोठी बाजार पेठ असून वैष्णवांच्या खाणावळीही आहेत. मोटार येथें चांगली पाउणतास थांबली. येथून उतारास आरंभ होतो. एका आंगास पर्वत व दुसऱ्या आंगास सपाट्यानें वाहाणारी नदी यांमधून रस्ता गेला आहे. उरीपासून ४८ मैलांवर असलेल्या **डुमेल** नांवाच्या गांवीं मोटार सुमारें २।–२॥ वाजतां पोहोंचली. मोटारींत मी एकटाच **रावळपिंडीस** जाणारा उतारू होतो, त्यामुळें पाय ताणून वाटेल तसें

बसतां येत होतें मोटार १६ माणसांची होती. मधून मधून थोड्या अंतरावर जाण्याकरितां कांहीं लोक बसत २, २, ४, ४, पैसे भाडे देऊन उतरून जात. मोटारला **डुमेल** येथें १० रु. कर भरावा लागतो. मोठेंच जकातीचें ऑफिस आहे व रस्त्यावर एक मोठा अडसर लावून ठेविला आहे. येथें सर्व उतरूंच्या सामानाची झडती



**सिंद दरीवरील कोलाहोई पर्वत.**

होते व जकातीस योग्य अशा सामानाची जकात देऊन मग मोटार जाण्यास परवानगी मिळते. माझ्याकडून कांहीं जास्त पैसे काढावे अशी मोटारवाल्याची फार इच्छा होती ती साध्य मात्र झाली नाहीं. मोटारवाला **डुमेलला** मला म्हणाला मजपाशीं कर भरण्यास पैसे नाहींत, मला १० रु. उसने द्या, **रावळपिंडीस** गेल्यावर परत देईन. ह्यास पैसे उसने देऊन **रावळपिंडीस** गेल्यावर ह्यानें कानावर हात ठेवल्यास अगर आज उद्यां केल्यास काय करावयाचें. तेथें तर मुसलमानांचें प्राबल्य. म्हणून मी नाहीं म्हटलें. तो म्हणाला नाहींतर आज येथेंच मुक्काम करावा लागेल. मी त्यास सांगितलें मी ही गोष्ट येथील तशीच रावळपिंडिच्या पोलिस ऑफिसरला कळवीन. येथील पोलीसकडे आतांच फिर्याद देतों. मला चांगलें इंग्रजी येत आहे. तुझा परवाना रद्द करण्याची वेळ आणीन पहा पाहिजे तर. व लगेच खालींच उतरलों तेव्हां तो ताळ्यावर आला. मग गांवांतून पैसे घेऊन येतों कृपा करून पोलिसला कळवूं नका असें म्हणाला म्हणून मी बेत रहित केला. सुमारें १ तासानें मोटार सुटली. **डुमेलजवळ** एक लोंबता पूल बांधला आहे त्यावरून मोटार जाते. आतां मी एकटाच मोटारींत राहिलों होतों. मी व मोटार ड्रायव्हर असे दोघेच जंगलांतून चाललों होतों. वाटेंत मोटार वारंवार बिघडून थांबूं लागली. मोठ्या त्रासानें संध्या-

काळीं ७ वाजतां **डोमेल**पासून ३१ मैलांवर **कोहाला** नांवाच्या गांवीं मोटार थांबली. ह्याही गांवाजवळ नदीवर पूल बांधला आहे तो ओलांडावा लागतो. गांवांत एक गुरुद्वार आहे. एक वैष्णवाची खाणावळही आहे. मात्र तींत भात मिळाला नाहीं. २ पैशास एकप्रमाणें ४ पोळ्या ( अर्थात् भाजी फुकट ) घेऊन रात्रीचें भोजन उरकलें ह्या गांवीं माणशीं ६ आणेप्रमाणें कर प्रवाशांस द्यावा लागतो. **काश्मीर-मध्यें** मोटारींना सूर्यास्तानंतर व सूर्योदयापूर्वी प्रवास करण्याची परवानगी नाहीं व बैलगाड्यांस सूर्यास्तापूर्वी व सूर्योदयानंतर प्रवास करण्याची परवानगी नाहीं त्यामुळें मोटारी व बैलगाड्या ह्यांची गांठ रस्त्यांत कधींच पडत नाहीं. बैल मोटारीस बुजून कांहीं बैलगाड्या डोंगराखालीं कोसळल्या म्हणून हा नियम केला म्हणतात. घोड्यांच्या गाड्यांस मात्र कांहीं निर्बंध नाहीं. बैलगाड्या रात्रभर चालतात व दिवसा विश्रांती घेतात. बराच माल बैलगाड्यांतून **श्रीनगरास** जातो. रात्रीं मोटारींतच झोपलों. मोटार सुमारें ७॥ वाजतां चालू झाली. येथून सारखी चढावास सुरवात झाली. चढाव सुमारें २८ मैल आहे. कांहीं वेळानें उतारास सुरवात झाली. **कोहाळ्या-**पासून सुमारें ४७ मैलांवर **चत्तर** नांवाच्या गांवाजवळ मोटार थांबली. येथें माणशीं ६ आणे कर द्यावा लागला. येथून **रावळपिंडी** १७ मैल दूर आहे. आतां चांगला उन्हाळा जाणवूं लागला. दुपारीं ११ च्या सुमारास रावळपिंडीस सुखरूप पोहोंचलों. रेल्वेस्टेशन नजरेस पडल्यावर घरीं पोहोंचल्याचा आनंद झाला. व रेल्वेनें मजल दर-मजल करीत ता. ३-६-२९ रोजीं **पुणें** गांठलें.

ज्या परमेश्वराच्या कृपेनें हा सर्व प्रवास सुखरूप पार पडला त्याचें आभार मानून मी वाचकांची रजा घेतो.

**आली तैसी मना केली खटपट**
**वाईट कां नीट देव जाणें ॥ १ ॥**

तुकाराम.

# प्रवासासंबंधी माझे कांहीं विचार.

प्रवास करावा असें सर्वांस वाटतें परंतु जितकी पुस्तकी शिक्षणाची आवश्यकता सर्वांस वाटते तितकी प्रवासाची वाटत नाहीं म्हणून हिंदुस्तानांत कूपमंडूक वृत्तीच्या लोकांचा भरणा फार झाला आहे व त्याजकडून देशपर्यटण ज्यांच्या हाडींमासीं खिळलेलें आहे अशा इंग्रजांचा प्रतिकार होऊं शकत नाहीं.

प्रवासास पैसा लागतो अशी तक्रार पुष्कळ लोकांची आहे परंतु पुस्तकी शिक्षणास कोठें पैसा लागत नाहीं ? बी. ए. च्या परीक्षेसच ५० रु. नुसती बसण्याची फी आहे इतर खर्च शिवाय, त्याच ५० रुपयांत हिमालयाचें व गंगायमुनांचें दर्शन सहज होईल. जर्मनींतील चांभारास गंगायमुनांचा संगम व हिमालय पाहण्याची इच्छा असते. ( प्रो. गुणे यांचा युरोपचा प्रवास पान १७५ ) तर आमच्याकडच्या सुशिक्षितांस–मी बऱ्याच लोकांस तर साक्षर समजतों–अद्याप प्रवासाचें महत्व पटावयाचें आहे. पैसा नसल्यास भिक्षावृत्तीनें प्रवास करावा. जर भिक्षावृत्तीनें पुस्तकी शिक्षण घेण्यास लाज वाटत नाहीं तर प्रवासास कां वाटावी.–मी वार, माधुकरी, फंडांतील मदत ह्या सर्वांस भिक्षावृत्तीच समजतों–चालत प्रवास केल्यास खर्च अगदीं थोडा येतो. तो अंगावर घ्यावा. हिंदीमध्यें एक म्हण आहे " या घुमे अमीर या घुमे फकीर " एक अमीर तरी फिरूं शकतो अगर एक फकीर तरी फिरूं शकतो– कांहीं तरी काम करून फिरण्याची इच्छा करावी तर हिंदुस्तानांत काम करून घेऊन पोटास घालणारे लोकच नाहींत ते फुकट जेवावयास घालतील पण काम करून घेणार नाहींत. हिंदुस्तानांत कामकऱ्यापेक्षां भिक्षेकऱ्यांस पोटभर जेवावयास मिळते.

पुष्कळांची अडचण काय करावें हो जाणार होतो परंतु कोणी जोडीदारच मिळत नाहीं. ही ही सबब खोटी आहे. सरकारनें बांधलेल्या सडकांवरून माणसें चालतात. चालावयास सुरवात केल्यास मागून कोणी तरी येऊन भेटतोच. त्याच्याशीच समरस होतां आले पाहिजे व त्याजबरोबरच संभाषण करून ज्ञानप्राप्ति करून घेतली पाहिजे. त्याचे व आपले विचार न पटल्यास त्यास सोडून देतां येते परंतु बरोबरच्या स्नेह्याच्या व आपल्या विचारांत तफावत पडल्यास उभयतांस त्रास होतो. करिता हिंदींतील– " मन मिळे तो मेळा नाहि तो सबसे भला अकेला " ह्या म्हणीप्रमाणें एकटेच फिरावें हें उत्तम. परमेश्वर सर्वत्र सहाय्यकारी असतोच.

कोणापासून आपणास त्रास होईल अशी भावना मनामध्यें न धरितां निर्भयपणानें चालले म्हणजे " नंगासे खुदा बेजार " ह्या म्हणीप्रमाणें परमेश्वरही त्रास देऊं शकत नाहीं. मग मनुष्यांची गोष्ट कशास पाहिजे परंतु मनुष्यांत हिंमत पाहिजे हिंदींत म्हणच आहे " हिंमत मर्दा तो मदत खुदा ".

पायीं भिक्षावृत्तीनें केलेल्या प्रवासापासून अनेक फायदे होतात पैकीं कांहीं देतों.

( १ ) संध्याकाळीं ६ ते सकाळीं ६ दिव्याच्या अभावामुळें स्वस्थ विचार करीत पडावें लागतें त्यामुळें ज्या तत्त्वांचा उलगडा पुस्तकांचीं पारायणें केल्यानेंही होत नाहीं त्यांचा उलगडा दिवसा पाहिलेल्या अनेक चमत्कारीक गोष्टींचा विचार करून सहज होतो.

( २ ) भिक्षेकऱ्यास कांहीं किंमत व जगाच्या दृष्टीनें कांहीं अक्कल नसल्यामुळें जग सावकाशीनें चांगलें पाहातां येतें व आपली स्वतःचीही खरी किंमत कळून येते. कारण ज्या गांवांत लोक आपणांस ओळखतात त्या गावांत मिळणारा मान हा आपले सगेसोयरे वाडवडील ह्यांच्यामुळें लोक या बसा चहा घ्या वगैरेप्रकारें आपला मान मरातब करितात परंतु ज्या ठिकाणीं आपणांस कोणी ओळखत नाहीं अशा परदेशांत आपल्या कर्तबगारीवरच मान मिळूं शकतो. म्हणून आपली खरी किंमत काय आहे हें अजमावण्याकरितां प्रत्येकानें एकवार जरूर प्रवास करावा.

( ३ ) हिंदी इंग्रजी, वगैरे भाषांची बोलण्याची संवय आपोआप वाढते. कारण त्या भाषांत बोलल्याशिवाय गत्यंतरच नसते.

( ४ ) वेळेवर मिळेल तें अन्न खावें लागत असल्यामुळें जिभेची चव नाहींशी होते व मनुष्य खाण्यासंबंधांत सुखी होतो.

( ५ ) ठराविक वेळीं अन्न मिळत नसल्यामुळें कोठ्यास वाटेल तितका वेळ थांबण्याची असार वाटेल तें अन्न पचविण्याची ताकद येते.

( ६ ) भांडण करून त्रास होण्याचा संभव असल्यामुळें पुष्कळ वेळां अनेक अपमान सहन करावे लागतात त्यामुळें सहनशीलता वाढते.

( ७ ) अनेक विषयांच्या अभ्यासी लोकांजवळ भाषण करण्याचा प्रसंग येत असल्यामुळें समयसूचकता व बहुश्रुतपणा ह्या दोन गुणांची वाढ होते.

( ८ ) सारखें शेंकडों मैल चालण्यानें कोठा साफ होऊन मनुष्य फार सुखी होतो.

( ९ ) प्रवासांत जवळ असलेल्या थोडक्याच जिनसांत अनेक गोष्टी कराव्या लागत असल्यामुळें मनुष्याच्या गरजा फार कमी होतात.

( १० ) जगाची खरी ओळख पटते व जगाची खोटी लाज वाटत नाहींशी होते. आमच्या देशांत हातांनीं काम करणें कमी प्रतीचें समजतात तर पाश्चात्य देशांत कितीही मोठा मनुष्य असो तो हातानें कोणतेंही काम करण्यास तयार असतो.

( ११ ) अनेकप्रकारचीं माणसें पाहिलीं असल्यामुळें मनुष्य स्वभावाचें चांगलें ज्ञान होतें व बोलणाऱ्या मनुष्याच्या बोलण्यांत खराखोटा भाग किती हें लवकर लक्षांत येतें.

( १२ ) स्वतःच्या एकाद्या चुकीमुळें जगास तोंड दाखवूं नये असा प्रसंग आल्यास आत्महत्येचा भ्याडपणा स्वीकारण्यापेक्षां परदेशगमन केव्हांही करितां येते. असे अनेक फायदे आहेत तरी प्रत्येकानें स्वतःच्या संसारास आरंभ करण्यापूर्वीं एकवार हिंदुस्तनची सफर करावी. एक अमेरिकन प्रवासी हिंदुस्तानांत आला असतां त्यास

वर्तमानपत्राच्या बातमीदारानें विचारिलें तुम्ही काय पहाण्यास आलांत ? तो म्हणाला, मी तीन गोष्टी पाहून परत जाणार आहे. १ आग्र्याचा ताजमहाल २ महात्मा गांधी व त्यांचा आश्रम व ३ हिमालयाचीं बर्फाच्छादित शिखरें. अर्थात् हिंदुस्तानांतील लोकांनीं ह्या तीन गोष्टी तरी अवश्य पहाव्या. मात्र हिमालयाचीं बर्फाच्छादित शिखरें पहावयाचीं असल्यास कोणत्याही रेल्वेस्टेशनपासून हिमालयाच्या अंतरभागांत सुमारें १०० मैल तरी प्रवास करावा लागतो. अर्थात् हरिद्वार पाहूनच जर कोणी हिमालय पाहिल्याची बढाई मारील तर ती खोटी बढाई आहे हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें कारण हरिद्वारला नुसते साधे डोंगर आहेत खरा हिमालय पुढेंच आहे. तरी शक्य तितक्या लोकांनीं कूपमंडूकवृत्ति जाण्याकरितां प्रवास अवश्य करावा अशी विनंति करून मी आपला लेख संपवितो.

---

8303

# परिशिष्ट.

## काश्मीरांतील महत्वाचे पांच मार्ग.

### जम्मू ते श्रीनगर.

| गांव | उंची फूट | अंतर मैल. |
|---|---|---|
| झाजर | | १९ |
| ७ामपूर | २५०० फूट | २१ |
| धरमथळ | | १३ |
| बटोटे | ५२०० | २२ |
| रामबन | ३५३५ | १७ |
| रामसू | ४०७० | १६ |
| बनिहाल | ५५८० | १० |
| व्हेरीनाग | ६००० | १५ |
| अनंतनाग | | १७ |
| अवंतीपूर | | १६ |
| श्रीनगर | | १९ |

### ( २ ) रावळपिंडी ते श्रीनगर

| गांव | उंची | अंतर मैल. |
|---|---|---|
| बाराको | | १४ |
| ट्रेट | | १२ |
| मरी | ७४५७ फूट | १४ |
| फगवाडी | | १४ |
| कोहाला | २००० | १४ |
| दुलाई | २१८० | १२ |
| डोमेल | २३२० | १० |
| गढी | २७५० | १३ |
| हाटिआन | | ११ |
| चकोठी | ३७८० | ११ |
| उरी | ४४२५ | १३ |
| रामपूर | ४८२५ | १४ |
| वारामुळा | ५१७० | १५ |
| पट्टण | ५२०० | १७ |
| श्रीनगर | ५२५० | १७ |

## श्रीनगर ते लदाक अगर लेह.

| गांव | उंची फूट | अंतर मैल. |
| --- | --- | --- |
| गांधरबल | ५२३० | १४ |
| कांगन | | १२ |
| गोंड | | १४ |
| सोनामर्ग | ८६५० | १५ |
| बालटल | | ९ |
| मातायन | | १५ |
| द्रास | १०००० | १३ |
| ठासगांव | ९२९६ | १५ |
| चुनीगुंड | ८६७५ | १५ |
| कारगिल | ८७८७ | ८ |
| शारगोल | १०२९० | १७ |
| खारबू | ११८९० | १९ |
| लामायुरू | ११५२० | १५ |
| खालसी | | १० |
| नुरलाह | | ८ |
| सासपोला | | १५ |
| निमू | | १२ |
| पिटुक | | १४ |
| लेह | ११५०० | ४ |

## श्रीनगर ते गिलगिट,

| गांव | उंची फूट | अंतर मैल |
| --- | --- | --- |
| शालटेंग | | ५ |
| सुंबल | | ११ |
| बंडापूर | ५३०० | १९ |
| ट्रागबल | ९१६० | १२ |
| गुराइ | | १३ |
| गुरेस | ७८०० | १५ |
| पुशवारी | | १४ |
| बुरझिलचौकी | १०७४० | ११ |
| चिल्लाम | | १७ |
| गुढाई | | १६ |
| आस्टोर | ७८५३ | १७ |

| | | |
|---|---|---|
| डास्किन | | १४ |
| डोइआन | ८७२० | ११ |
| बुंजी | ४६३१ | १८ |
| परी | | १८ |
| गिलगिट | ४८९० | १९ |


**श्रीनगर ते अमरनाथ**

| **गांव** | **उंची फूट** | **अंतर मैल** |
|---|---|---|
| अनंतनाग | | ३४ |
| पहलगांव | | १२ |
| चंदनवाडी | १०५०० | ७ |
| वावजन अगर<br>शिश्रमनाग | १२८५० | ७ |
| पंचतर्णी | १२९०० | ७ |
| अमरनाथ | १३९०० | ३ |

**गुलमूर्गः**—ह्या ठिकाणचें पहिलें नांव गौरीमर्ग म्हणजे गौरा देवीचें मैदान असें होतें त्याचें रुपांतर गुलमर्ग म्हणजे फुलांचें मैदान असें मुसलमान राजांनीं केलें ह्या ठिकाणीं अनंतरंगीं फुलझाडें कित्येक मैलपर्यंत पसरलीं आहेत. स्वित्सरलंडप्रमाणें येथील देखावा आहे. हिंदुस्थानांत हें ठिकाण सृष्टिसौंदर्यांत सर्वांत वरिष्ठ दर्जाचें ठरेल. सकाळच्या प्रहरीं फुलांचा व बर्फाचा देखावा पाहून मन अत्यंत आनंदीत होतें.

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १३ | शेंवटची | बनिहील | बनिहाल |
| २९ | १२ | चाश्माशाही | चश्माशाही |
| ३० | १९ | ४५ फूट रुंद | २४५ फूट रुंद |
| ३१ | ७ | निशटवाग | निषाद बाग |
| ४३ | २५ | लालमंड | लालमंडी |
| ४३ | २६ | Bhjoan | Bhojan |
| ५३ | ३२ | नथ्थु | सथ्थू |




बंदीपूर (५२००)
बारामुला
झेलम
कोहाळा
ॲबटाबाद
मरी
गुलमर्ग (८५००)
किलनमर्ग
शादीपूर
काश्मीर
रावळपिंडी
(१५०००)
पंच पीर पंजाल
जम्मू
मांडरा
रामपूर
मिरपूर
भिंबर
झेलम
आरवनूर
झेलम नदी
लालामुसा
चिनाब नदी
वझिराबाद जं.
सियालकोट

6303



नावेंत घेतलें. नांव पाण्यांत नेऊन उभी केली व गिन्हाइकाची वाट पहात बसला. इतका वेळ मोडण्यास मजला सवड नव्हती. मी चालत २०।२५ मिनिटांत धर्मशाळेंत पोहों-चलों असतों. नाव लगेच सोडण्याचा करार होता. तो म्हणूं लागला २ आणे द्या, तर नाव एकट्याकरितां सोडतों, नाहींतर थांबा. मी त्यास नाव किनाऱ्यास घे नाहीं तर चल असें सांगितलें. तो कांहींच करीना. सरतेशेवटीं त्यांस चाकूहि दाख-विला व मजला त्रास देणें तुला शक्य नाहीं, असें त्यास बजावलें व होडीचा नंबर पाहून पोलीसच्या ताब्यांत देईन असेंहि सांगितलें. तेव्हां तो ताळ्यावर आला व पोलिसला कळवूं नका, होडी सोडतों असें म्हणून होडी सोडली. सर्व होडी-वाले मुसलमानच असतात. काश्मीर प्रांतांत बरेच लोक कायमचेच होड्यांत रहातात. मध्यें एक लहानसें घर असतें त्यांत स्वयंपाक करितात. नवरा व बायको दोघेहि वल्हवण्याचें काम करितात. इकडून तिकडे माल पोहोंचवायचें काम सारखें चालूं असतें. बराचसा व्यवहार भाताचा चालतो. नदीवर ठिकठिकाणीं होड्या उभ्या असतात व किनाऱ्यावर उखळ्या मांडून भात कुटण्याचें काम सुरूं असतें. पोटाकरितां इकडील लोकांस फार कष्ट पडतात. अमिराकदल जवळ लालमंडी म्हणून एक भाग आहे, ह्या भागांत सर्व प्रकारचीं दुकानें आहेत. काश्मीरमध्यें तयार होणारें लोंकरीचें कापड, लांकडी सामान, सर्व प्रकारचीं फळें वगैरे जिन्नस येथें मिळतात. श्रीनगर येथें प्रताप कॉलेज टेक्निकल स्कूल, रेसिडेंटचा बंगला, श्रीगदाधराचें मंदीर, श्रीरघुनाथ मंदीर, श्रीशंकरा-चार्य मंदीर, शाह हमदान मशीद, रेशमाचा कारखाना, म्युझियम व झेलम नदीवरचा बांधलेला महाराज हरिसिंग ह्यांचा राजवाडा वगैरे ठिकाणें पहाण्यासारखीं आहेत. ता. १४।५।२९ रोजीं आमिराकदलपासून सुमारें १ मैलावर असलेला शंकराचार्य मठ पहाण्याकरितां सकाळींच निघालों. मठ एका टेकडीच्या पायथ्याशीं आहे. मठांत साधू, संन्याशी, बैरागी, अतिथी, वगैरेंची उतरण्याची व भोजनाची सोय फुकट होते. येथेंच उतरण्याचा पुष्कळ मंडळींनीं मला सल्ला दिला होता, परंतु श्रीनगरमध्यें १ शिखांची धर्मशाळा, २ आर्य समाज, ३ यारकंद सराई, ४ बदरी आश्रम, ५ सनातन धर्मप्रतापभुवन वगैरे अनेक धर्मशाळा असून त्यांत वाटेल तितके दिवस रहातां येईल ही बातमी मिळाल्यामुळें गांवापासून लांब रहाण्याचा बेत रहित केला. जेवणासहि फार खर्च येत नव्हता. मठांत कित्येक विद्यार्थी चटयांवर बसून संस्कृतचें अध्ययन करीत होते. मठाधिकारी पूजा वगैरे करण्यांत गुंतले होते. म्हणून त्यांचे आटपेपर्यंत थांब-ण्याचा बेत रहित करून मठ सोडला. मठांतूनच टेकडीवर जाण्यास रस्ता आहे. ह्या टेकडीस उर्दू नांव तख्त-इ-सुलेमान असून हिंदू लोक हिला शंकरपर्वत म्हणतात. मठाजवळ एक दुर्गामंदिरहि आहे. टेकडीवर एक पुरातन काळीं सुमारें साडेचार हजार वर्षांपूर्वी बांधलेलें शंकराचें देऊळ आहे. चढाव सुमारें २ मैल आहे. फारसा कठीण नाहीं. वरती चढून गेल्यानंतर श्रीनगरकडे नजर फेंकली तों सर्वत्र पसरलेलें पाणी त्या-मधून चाललेल्या नांवा, मधूनमधून दिसणारी हिरवाळीचीं बेटें व त्यावर असलेलीं

लहान लहान घरें, शहराच्या बाहेर जाणारे दुतर्फा झाडीचे रस्ते व हिरवेगार शेतें पाहून अत्यानंद झाला. देवळांत शंकराची पिंडी आहे. शाळुंका साधारणतः कमरे-इतकी उंच आहे. देऊळ पूर्ण दगडी बांधलेलें आहे. देवळाच्या चारी बाजूस खांब उभे करून त्यांवर विजेचे मोठ्या प्रकाशाचे दिवे लावले आहेत व त्यांचा प्रकाश फक्त देवळांवरच पडावा अशी योजना केली आहे. म्हणून रात्रीं सुद्धां देऊळ शहरांतून दिसतें हे दिवे पाहून पुण्याच्या शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ लावलेल्या काजव्या-सारख्या दिव्याची आठवण झाली व व्यवस्थापकांस एकवार काश्मीरला आणून मोठे दिवे कसे असतात, तें तरी दाखवावे असें वाटलें. परंतु तो बेत अनेक कारणांस्तव रहित केला. देवळांत एक संन्याशी भेटले. त्याजपाशीं चष्माशाहि नांवाच्या बागेच्य रस्त्याचा तपास केला. देवळाच्या समोरूनच उतरलें असतां जी सडक लागते, तीच



डाल सरोवर.

चष्माशासीस जाते असें सांगितलें व दूर डोंगराच्या पायथ्याशीं दिसणारी बागहि दाखविली. रस्ता नव्हताच; परंतु उतार फारसा कठीण नसल्यामुळें तसाच उतरलों तों १० चा सुमार झाला. फार भूक लागली. वाटेनें सारखी तुतीचीं झाडें लागत होतीं, त्यांखालचीं फळें वेंचून त्यांचाच फराळ केला. तोंच एक हालवायाचें दुकान लागलें. त्याच्या दुकानांत दूध व बिस्किटें मिळालीं. तीं घेऊन साग्रसंगीत फराळ उरकला व चालूं लागलों. मोठ्या रस्त्यानें सुमारें १॥ मैल चालल्यानंतर उजव्या हातास सडक चष्माशाहीकडे जाते. मोठा रस्ता तसाच पुढें निषादबागेकडे जातो. येथून निषाद २॥ मैल लांब रहाते. चष्माशाही श्रीनगरपासून ५ मैलांवर आहे. रविवारीं सकाळीं

लवकर निघाल्यास चालत हरवानपर्यंत सर्व ठिकाणें पाहून निषादवरून नावेनें परतहि येतां येईल. मी रविवारीं उशिरा निघाल्यामुळें घोंटाळा झाला. चष्माशाही आड-वारीं पहावी लागली. म्हणून ही बाग पहातांना फारशी मजा वाटली नाहीं. मात्र झरा पाहून आनंद झाला. ही बाग शहाजहान बादशहानें इ. स. १६३२ मध्यें काश्मीरचा सुभेदार अली मर्दानखान ह्यांजकडून बांधविली. चष्माशाही ह्याचा अर्थ बादशाही झरा असा आहे. चष्मा म्हणजे झरा. एका मोठ्या झऱ्याच्या तोंडावर एक रुंद तोंडाची नळी बसविली आहे. तींतून पाणी बाहेर येतें व बाहेर येतांना ते उपळ्या हडीसारखें वाटोळें बाहेर पडतें. पाणी पाहून फार मजा वाटतें. पाणी गोड गार होतेंच. तें फार पाचक आहे असें म्हणतात. तेथून तें धबधब्यासारखें वहात एका पुष्कर-णींत पडतें. नंतर त्याचे पाट काढून सर्वत्र तें पाणी खेळवून त्याची बाग तयार केली आहे. बाग पाहून परत निघालों, बागेपासून श्रीनगराकडे जातांना सुमारें २॥ मैलां-वर डाव्या हातास एक रस्ता फुटतो. हा पनरतन नांवाच्या पुरातन काळीं बांधलेल्या मंदिराकडे जातो. तें मार्तंडाच्या धर्तीवर बांधले आहे. परंतु श्रीनगर लवकर सोडणें असल्या-मुळें तें पहाण्याचा बेत रहित करून श्रीनगरास आलों व लाल मंडीमध्यें असलेला अजब-खाना पहाण्यास गेलों ( Museum ) अजबखान्यांत श्रीनगरास पूर्वी तयार होणारे व सध्यां तयार होत असलेले सर्व जिन्नस ठेविले आहेत. नाना प्रकारच्या मूल्यवान शाली येथें पाहाण्यास मिळतात. ह्या प्रकारच्या शाली बाजारांतही असतात; परंतु गरिबांस त्या कोणी दाखवीत नाहींत. काश्मिरमध्यें तयार होणाऱ्या लाकुड कामाचेही नमुने येथें ठेविले आहेत. काश्मीरमध्यें वस्ती करून राहात असलेल्या निर-निराळ्या जातीचे Life size माणसाच्या आकाराचे पुतळेही पोषाख घालून उभे करून ठेविले आहेत. त्यांवरून कोणता माणूस कोणत्या भागाचा हें समजून येऊं शकेल. म्युझियम पाहाण्यास फी नाहीं. तें रोज सकाळीं १० ते संध्याकाळीं ५ पर्यंत उघडें असतें. गुरुवारीं व गॅझेटेड सुट्ट्यांच्या दिवशीं फक्त बंद असतें. म्युझियम पाहून तेथून नांवेनेंच श्री रघुनाथ मंदीर दुसऱ्या पुलाजवळ आहे तें व ३ ऱ्या पुला जवळची मशीद पाहिली. मशीद लाकडी बांधली असून नक्षीकाम पाहाण्यासारखें आहे. येथें सुद्धां पैसे मागण्याकरितां मौलवी बसले होतेच. तेथून चालत चालत सातव्या पुला-पर्यंत गेलों व होडीनें परतलों. वाटेंत एक आनंदगीर नांवाचे संन्याशी भेटले. पुण्यास सोमवार पेठेंत राहात असत. गेलीं १५ वर्षें ते काश्मीरमध्यें आहेत. त्यांचा मुकाम सध्यां लालमंडीमध्यें वझीर मंदीरांत असतो. त्यानीं मला चेहऱ्यावरून ओळखलें व मराठींत प्रश्न केला. दुसऱ्या दिवशीं भेटण्यास बोलाविलें. त्यांनीं काश्मीर प्रांत संपूर्ण पाहिला आहे. परंतु दुसऱ्या दिवशीं सकाळींच श्रीनगर सोडण्याचा बेत केला अस-ल्यामुळें त्यांची भेट घेतां आली नाहीं. पुढील प्रवासाची माहिती श्रीनगरच्या नथ्थू नांवाच्या भागांत राहाणारे पंडित अर्जुननाथ टिक्कू ह्यांनीं फार आस्थापूर्वक दिली. व त्यांचे स्नेही पंडित अफताब कॉ ह्यांस भेटण्यास सांगितलें, व क्षीरभवानीची यात्रा



वुळर सरोवरावरील सूर्यास्ताचा देखावा.

अमर पहा म्हणूनही सांगितलें. ही यात्रा प्रत्येक महिन्याच्या शुद्ध अष्टमीस असते व त्या वेळीं येथें पुष्कळ काश्मिरी पंडित जमतात. ता. १६ रोजीं शु॥ ८ मी आली होती. म्हणून रेशमाचा कारखाना पाहाण्याचा राहून गेला. त्याबद्दल मला वाईटही वाटलें नाहीं. कारण रेशमी वस्त्राची मजला कधीं आवश्यकता भासत नाहीं. तसेंच श्रीनगरजवळ एक हरपर्वत म्हणून ठिकाण आहे. येथें एक तुरुंग आहे. हरपर्वत पाहाण्यास सरकारी परवाना काढावा लागतो. तितकी स्वस्थता मजला मिळाली नाहीं म्हणून तो बेतही मीं रहित केला. क्षीरभवानीस जाणें असल्यास गांधारबल नांवाच्या गांवावरून रस्ता आहे. गांधारबल हें श्रीनगरपासून सुमारें १ मैल आहे. श्रीमंत लोक मोटारनें जातात अगर स्वतंत्र नांत्रा काढून जातात. स्वतंत्र नांवेस ७।८ रु. पडावयाचे, म्हणून तोही बेत रहित करून स्वतः रस्त्याच्या चवकशीस लागलों. रस्ताही सांपडला. अमिराकदलहून महाराजागंज ह्या भागांतून पुढें विचारनाग नांवांच्या भागांत जावयाचें व पुढें विचारनागाहून अध्या मैलावर असलेल्या सोवार बंदरांतून गाधारवलला नांवा सुटतात. माणशीं भाडें २ पैसे पडते. महाराजगंजाची चवकशी करीत निघालों. वाटेंत पंडित शामलाल कौल नांवाचे पंजाब युनिव्हर्सिटीचे ग्रॅजुएट भेटले, त्यांनीं कोण कोठले, वगैरे चवकशी करून जेवून जाण्याबद्दल आग्रह केला. रस्ते चिखलानें भरलेले असल्यामुळें चालतांना फार त्रास होत होता. एकदाचा त्यांच्या घरीं पोहोंचलों. त्यांचें वय सुमारें २५।२६ वर्षांचें असेल. गृहस्थ मोठे हुषार दिसले. घरांत त्यांची १४।१५ वर्षांची फक्त बहीणच होती. बाकी मंडळी कोठें बाहेर गेली होती. जेवण तयार होतें. बहिणीनें मोठ्या हंसत मुखानें जेवण आणून पुढें ठेविलें, तेव्हां तिच्या शिक्षणाची मी सहाजिकच चौकशी केली. तेव्हां "तिचें लग्न अद्याप व्हावयाचें आहे, इकडील लोक स्त्रीशिक्षणाच्या विरुद्ध असल्यामुळें तिचें शिक्षण झालें नाहीं तुमच्याकडे ज्याप्रमाणें प्रोफेसर कारवे ( कर्वे ) अहर्निश स्त्रीशिक्षणाची खटपट करितात, तशीं माणसें आमच्या इकडे नाहींत, म्हणून आमचें संस्थान स्त्रीशिक्षणांत मागासलेलें आहे. सवंध काश्मीरमध्यें अवघ्या ४।५ मुलींच्या शाळा आहेत. आमच्या इकडे १४ च्या आंत मुलीचें व १८ च्या आंत मुलाचें लग्न करण्याची कायद्यानें बंदी केल्यामुळें तिचें अद्याप लग्न झालें नाहीं." वगैरे माहिती सांगितली गु. आण्णांचें नांव इतक्या दूरच्या प्रदेशांत ऐकून "सूरतसे कीरत बडी बिनपंक उडजाय सूरत तो जाती रही कीरत कबू न जाय" ह्या दोह्याची आठवण झाली व फार आनंद झाला. पंडितजी संस्थानच्या टेलिग्राफ खात्यांत नोकर असून त्यांस २० रु. पगार मिळतो त्यांत ते आनंदानें प्रपंच करीत आहेत. भोजनोत्तर त्यांनीं चहाही दिला. त्यांचा आभारपूर्वक निरोप घेऊन विचारनागचा शोध करीत चाललों. विचारनाग येथून सुमारें ३ मैल आहे. पुढे सोवारबंदर गांठलें. हें बंदर गर्द झाडींत आहे. येथून दोहों बाजूंस सारखीं झाडें असलेल्या एका कालव्यांतून कांहीं

वेळ नांव जाते. झाडी इतकी दाट होती कीं सूर्य डोक्यावर आला असूनही, उन्हाचा अगदीं त्रास होत नव्हता. कांहीं वेळानें नांव शेंवाळ व रंगविरंगी वनस्पतींनें भरलेल्या एका हिरव्यागार आनचर Anchar सरोवरांत शिरली. पाण्याचा रंग पांढरा होता. नांवेच्या रस्त्याशिवायचा पाण्याचा भाग हिरवा दिसत असल्यामुळें शेतांतून मळलेले रस्ते दिसतात तसा देखावा दिसत होता. नांव सरोवरांत गेल्यानंतर मात्र उन्हाचा थोडा त्रास होऊं लागला. कांहीं वेळानें नांव सरोवरास मिळणाऱ्या एका नदीच्या मुखांत शिरली. पाण्याच्या प्रवाहाच्या उलट नांव चालविणें त्रासाचें असल्यामुळें नांवें-तून उतरलों. येथून गांधारबल हें गांव सुमारें १॥ मैल असावें नदीच्या काठाकाठानें गांधरबलास पायवाट गेली आहे. नावेमुळें सुमारें १० मैल चालणें वाचले व त्याब-द्दल अवघे २ पैसे खर्च झाले. गांधारबलजवळही सुंदर मोठमोठे चिनारवृक्ष आहेत. नदींत अनेक हाउसबोटी उभ्या होत्या व त्यांतील मंडळी किनाऱ्यावर येऊन चिनार-वृक्षाखालीं आराम करीत बसली होती. श्रीनगरपेक्षां गांधरबलची हवा चांगली असल्यामुळें पुष्कळ श्रीमंत लोक आपल्या हाउसबोटी घेऊन येथें येतात.

**गांधारबल काश्मिरांत** अत्यंत उत्तम हवेचें ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. बोटीकरितां किनाऱ्यावर खांब पुरून त्यांवर नांगर टाकिलेले असतात. एका बोटीस दरमहा किनाऱ्यावर उभे रहाण्याचें ५ रु. भाडें पडतें. बऱ्याच बोटींची जागा रिकामी होती कारण सीझन अद्याप सुरूं व्हावयाचा होता. काश्मिर सीझन साधारणतः जुलै-अखेर सुरूं होतो. येथें सुमारें १०० हाऊस बोटी रहाण्याची सोय आहे. गांवांत शिरतांच एक ए. व्ही . स्कूल लागलें. ह्या शाळेंतील सेकंड मास्तर पंडित **अफताब** कों ह्यांची माहिती **श्रीनगरासच** मिळाली होती. त्यांची भेट घेतली व त्यांस **क्षीर भवानीस** जाणाऱ्या रस्त्याची माहिती विचारली. माझा वस्तीस क्षीर भवानीसच जाण्याचा विचार होता परंतु पंडितजींनीं फार आग्रह केल्यामुळें त्यांजकडेच रात्रीं रहाण्याचें ठरविलें. पंडितजी फार उदार अंतःकरणाचे व दिलदार स्वभावाचे गृहस्थ आहेत. ते संस्थानांत १२।१३ वर्षें शिक्षकाचें काम करीत आहेत. मॅट्रिकची परीक्षा पास असूनहि त्यांस सध्यां अवघा ३० रु. पगार मिळतो. येथें गांवांत ६ रु. भाड्याची एक खोली घेऊन २ बंगाली मुसलमान विद्यार्थी रहात होते त्यांचीहि भेट शाळेंत झाली. त्यांच्याशीं झालेल्या संभाषणावरून त्यांची देशाभिमानशून्यता स्पष्ट दिसून आली. माझा कलकत्ता, गोरखपूर, वृंदावन वगैरे बऱ्याच ठिकाणीं बंगाली, हिंदूंशीं संबंध आला. प्रत्येक जणाच्या अंगांत देशाभिमानाचें वारें खेळत असल्याचें तेव्हांच माझ्या निदर्शनास येत असे. पंडितजी हातानेंच स्वयंपाक करितात व ते व शाळेचे फर्स्ट मास्टर ( हेडमास्तर ) **पं. रघुनाथ धार** एके ठिकाणींच रहातात. दोघे हे एकएकटे असल्यामुळें एकत्रच स्वयंपाक होतो. दोघांचाहि स्वभाव फार उदार आणि विनोदी आहे. घरीं दोघे सख्ख्या भावाप्रमाणें एकमेकांशीं वागतात. त्याच दिवशीं रात्रीं त्यांचेकडे जेवणाकरितां एक ( State official ) संस्थानचे अधि-

कारी आले होते. मी सर्वांशीं गप्पा मारीत होतों. गांवांतलिहि कांहीं मंडळी तेथें जमली होती. हिंदूंस मुसलमान करून घेण्याची खटपट तुम्ही कां करीत नाहीं? देश-स्थितीचा कांहीं तरी विचार तुम्ही केला पाहिजे, त्याकरितां मोठी चळवळ केल्या-शिवाय भागणार नाहीं वगैरे गोष्टी सुरूं झाल्या, तेव्हां ते संस्थानाधिकारी थोडेसे घावरले व लगेच म्हणाले ( Please don't make use of words country and agitation ). हें शब्द ऐकून मी एकादा राजकीय बाबतींत चळवळ करणारा गृहस्थ आहे अशी ऐकणाराची कल्पना व्हावयाची व संस्थान तर राजकीय चळवळी पासून पूर्ण अलिप्त फक्त राजकीय बाबतींत कांहीं कळत असेल तर तें **महाराजांना**. मला माझ्या भाषणापासून थोडासा त्रास झाला असता तर तो मी सोसण्यास तयार होतों; परंतु मला आश्रय देणाऱ्या सद्गृहस्थांस मात्र कोणतीहि तोषीस लागूं नये अशी माझी इच्छा होती म्हणून मी ( Agitation ) च्या ऐवजीं (Try) व (Country) च्या ऐवजीं **काश्मीर** हे शब्द घालून आपल्या बोलण्यास सुरवात केली. ऑफिसर म्हणाले तुम्ही असें बोलत चाललांत तर तुम्हांस सरकारी अधिकारी घ लवून देतील. मी म्हणालों आतां मजला काश्मीरबद्दल साधारण कल्पना आली आहे, मी आतां परतलोंच आहे. सरकारी खर्चानें जावयास मिळालें तर फारच चांगलें.

**ऑफिसर**—आमचे महाराज फार चांगले असून ते आमच्याकरितां फार खटपट करितात.

**मी**—तुमचे महाराज काय किंमतीचे आहेत ह्याची माहिती ते गादीवर येण्यापूर्वीच **इंग्लंड**मध्यें त्यांनीं केलेल्या कुलंगड्यावरून मजला झाली आहे. ती गोष्ट सर्व जगास माहीत आहे. आजची प्रजेची दैन्यावस्था मी पहात आहे. आपण दुसरी कसली नसली तरी निदान स्त्री-शिक्षणाची तरी खटपट करा.

रात्रीं येथेंहि माझें गीतावाचन ( प्रवचन ) झालें. इकडील बहुतेक लहान शाळा सुद्धां अँग्लोव्हर्नाक्युलर आहेत. देशभाषा म्हणून उर्दू शिकविण्यांत येतें. संध्या-काळीं गांधारबलपासून अर्ध्या मैलांवर असलेल्या ( Beehama ) **बीहामा** नांवाच्या गांवीं गेलों. येथें एक सुंदर झरा आहे. जवळच जकातनाकें आहे. नाकेदार एक काश्मिरी पंडीत होते. मध्य-आशियांतून **यारकंद** वगैरेकडून येणारा माल ह्या गांवा-वरून **श्रीनगरास** जातो. पंडितजींनीं जरदाळू, पाणी वगैरे देऊन स्वागत केलें. गुडगुडी पुढें केली व चहा विचारला. ते येथें एकटेच असतात. चहा मी नकोच म्हटलें. त्यास इंग्रजी येतच होतें. बराच वेळ बोलत बसलों. संध्याकाळीं परतलों. वाटेंत एक मुसलमान शेतकरी भेटला. मी कोणी तरी साधू आहे अशा कल्पनेनें त्यानें माझी म्हैस कालपासून हारवली आहे सांपडेल किंवा नाहीं तें हात पाहून सांगा म्हणून आग्रह धरला. मला हें शास्त्र माहीत नाहीं असें त्यास मी पुष्कळ सांगितलें परंतु तो ऐकेना. सरतेशेवटीं परवां संध्याकाळपर्यंत सांपडेल असें कांहीं तरी त्यास सांगून चालूं लागलों. रात्रीं पांघरूण वगैरे व्यवस्थित मिळालें. माझ्या फिरण्याचा कार्यक्रम पाहून मीहि

एकवार तुमच्यासारखा फिरूं इच्छितों असें म्हणून पंडित **अफताबजींनीं** बरीचशी प्रवासाची माहिती विचारिली. आपल्याकडील महासाधू **रामदास, तुकाराम** ह्यांचीं वचनें सांगून मी पैशाशिवाय फुकट प्रवास कसा करतां येईल ह्याची सविस्तर माहिती दिली व नक्की ठरल्यानंतर जादा माहिती पुरविण्याचें आश्वासन दिलें. पंडितजी विधूर असून त्यांस एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें आहेत. काश्मिरांत, ब्राह्मणांत पुर्नविवाहाची चाल नाहीं. त्यांचा पुन्हां लग्न करण्याचा विचार दिसला नाहीं. मुलें वगैरे **श्रीनगरास** आपल्या चुलतीजवळ असतात. तीसहि नवरा नाहीं. मी आपल्याकडची संतवचनें सांगितल्याबरोबर तंतोतंत तशींच वचनें त्यांनीं उर्दूत सांगितलीं.

**बनाकर फकीरूका हम् बेस कलिप ।**
**' तमाशाये अहले करम देखते है. '**

**अर्थ**—फकिराचा वेष घेऊन मी लोकांची परिस्थिति पहात आहे.

**२ नहि राह चलतेसे अच्छी है प्रीत.**

**अर्थ**—रस्त्यावरून जाणाऱ्यावर प्रेम करणें ठीक नाहीं.

संस्कृत—**अज्ञातकुलशीलस्य वासो देयो न कस्यचित् ।**

ह्यासारखीच ही म्हण आहे—

पहिली समर्थ रामदासांच्याः—

**कुग्रामें अथवा नगरें । पहावीं घरांचीं घरें ॥**
**भिक्षामिषें लहान थोरें । परीक्षुनी सोडावीं ॥**

ह्यासारखी आहे. ह्यांवरून मुख्य मुख्य नीतितत्त्वांविषयीं सर्व धर्मांची एकवाक्यता आहे ही गोष्ट ध्यानांत येईल.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून प्रातर्विधी उरकून पंडितजींची जाण्यास आज्ञा मागितली, परंतु १० वाजतां आम्ही शाळेंत जाणार आहोंत तुम्ही जेवून पुढें जा, आम्ही शाळेंत जाऊं असें सांगून फार आग्रह केला म्हणून जेवणाकरितां थांबलों. पं. **अफताबजी** स्वयंपाक करीत होते. मी पं. **रघुनाथजी**जवळ बोलत बसलों. त्यांची संस्थानांत १५ वर्षे नौकरी झाली आहे. मॅट्रिक पास आहेत. पगार फक्त ३० रु. मिळतो. त्यांनीं काश्मिरच्या सरहद्दीवर असलेल्या **लदाक** अगर **लेह** प्रांतांत नौकरी केली आहे येथून **लेह** सुमारें २५० मैल असून रस्ता डोंगराळ व बर्फांतून असल्यामुळें सुमारें १६ दिवस चालावें लागतें. गाड्या चालत नाहींत. घोड्यांवरून अगर चालत प्रवास करावा लागतो. ह्या प्रांतांत बौद्ध लोकांची वस्ती आहे. राजकीयदृष्ट्या जरी हा प्रांत **हिंदुस्थानांत** मोडत असला तरी सामाजिक व धार्मिकदृष्ट्या हा प्रांत तिबेटांतच मोडतो. म्हणून ज्यास तिबेट पहाण्यास सांपडणार नाहीं, त्यानें हा प्रांत तरी पहावा. ह्या प्रांतांत बहुपतित्वाची चाल आहे. ५ भावांमिळून एक बायको असते. ३ भावांत

एकास संन्यास घ्यावा लागतो. माहिती ऐकून तिकडे जावेसें वाटलें परंतु वेळ व पैसा ह्यांची सवड नसल्यामुळें पुन्हां एकाद्या सवडीनें येऊन पहाण्याचा विचार केला. चहा वगैरे घेऊन झाला. आदल्या रात्रीं पाहुणे असल्यामुळें त्यांच्याकरितां मांसाहारी व आमच्याकरितां ( मी व **अफताबजी** ) शाकाहारी जेवण तयार केलें होतें परंतु आज सर्वांनाच शाकाहारी जेवण तयार केलें. जेवतांना पंडितजी म्हणाले " पुन्हां याल ते सहकुटुंब सहपरिवारें या. ५।६ रुपयांत येथें रहाण्यास जागा पाहून देईन. १ महिना राहून परत जा." " परमेश्वराची इच्छा असल्यास जरूर येईन. येथील हवा तर चांगली आहेच परंतु त्याहिपेक्षां आपल्यासारखी चांगली स्नेही मंडळी असल्यामुळें हें ठिकाण मी जास्त पसंत करितों " असें मीहि म्हणालों. भोजनोत्तर गांधरबल सोडलें. निरोप घेतांना उभयतां पंडितजीस व मलाहि फार वाईट वाटलें. संध्याकाळीं क्षीर-भवानीस पुन्हां भेटण्याचें आश्वासन पंडितजींनीं दिलें व ते शाळेंत गेले व मी क्षीर-भवानीस निघालों. आरंभींच २।३ शेतकरी भेटले. त्यांनीं तुमच्याजवळ कांहीं औषधें आहेत काय म्हणून चवकशी केली. औषधांची चवकशी बरीच मंडळी करीत म्हणून मी एका काश्मिरी पंडितास इकडे औषधपाण्याची सोय तुमच्या संस्थानिकानें चांगली केली नाहीं काय? म्हणून प्रश्न केला. तो म्हणाला, शेतकरी वर्ग बहुतेक मुसलमान आहे. मुसलमानांत काडीमोडीची चाल आहे म्हणून बायका वाटेल तेव्हां नवऱ्यास सोडतात. त्यामुळें बरीच अनीति माजली आहे व नानाप्रकारच्या रोगांनीं लोक पिडले आहेत. संस्थानिकांनीं शक्य ती व्यवस्था केलीच आहे ती अर्थात् असलेल्या परि-स्थितीच्या मानानें अपुरी आहे. खेड्यांतील दवाखान्यांत सामान्य औषधें असतात तीं ह्यांच्या मोठमोठ्या रोगावर उपयोगी पडत नाहींत म्हणून हे लोक नेहमीं औष-धांच्या शोधांत असतात. मीहि त्यास म्हणालों कीं आमच्याकडे सुद्धां आरोग्य-खात्यांत काटकसर चालूंच आहे. ससून हॉस्पिटलमध्यें १९१८ सालीं जितकें अन्न गरीब रोग्यास मिळत असे तितकें हें खातें दिवाणांच्या हातांत गेल्यावर १९२७ सालीं मिळत नाहींसें झालें कारण मी ससून हॉस्पिटलमध्यें तेथीलच अन्न घेऊन तीन वेळां जाऊन अनुभव घेऊन आलों आहे. असो.

**गांधारबल**पासून क्षीरभवानी सुमारें दोन मैल लांब आहे. रस्ता चांगला नाहीं. इकडील बहुतेक गांवांचीं नांवें मुसलमानांनीं बदललीं आहेत. क्षीरभवानीचें नांव ( Tulamulla ) **तुलामुल्ला** असें आहे. गांवांत एक लहानसें पोष्ट ऑफि-साहि आहे. देवळाच्या बाहेर जोडे आंत नेऊं नये अशी पाटी होती. परंतु जोडे संभाळण्याकरितां मनुष्याची योजना नव्हती. म्हणून मी देवळाचे मालक पं. **महे-सरनाथ** ह्यांच्या चवकशीस लागलों तों पंडित **धामूधरनाथ** नांवाचे गृहस्थ भेटले व त्यांनीं बूट देवळाच्या शिपायाजवळ दिले. मला तेथें त्या दिवशीं वस्ती करा-वयाची होती. बूट चोरीस गेले असते तर दुसरे त्या गांवांत विकतहि मिळालें नसतें. अशी पाटी लावणारानें संभाळण्याची योजनाहि केली पाहिजे. बुटांची व्यवस्था लावून



शादीपूर.

आंत शिरलों. आंत एक नदी देवळाच्या सभोंवार वहात आहे. मध्यें देऊळ असून त्यांच्या भोंवतीं सारख्या धर्मशाळा बांधल्या आहेत. नदीच्या पाण्याचे रंग वारंवार बदलतात. कधीं गुलाबी तर कधीं हिरवा तर कधीं पांढरा असें पाणी दिसत असल्या-मुळें ती मजा पहाण्यासहि पुष्कळ प्रवासी येतात. एकंदर आवार फार मोठें आहे. नदीवर बायकांच्या स्नाकरितां पत्र्याचा आडोसा तयार केला आहे, त्यांत त्यांचीं स्नानें चाललीं होतीं. पुरुष लंगोट्या लावून उघड्यावरच स्नानें करीत होते. काश्मिरी लोकांस आपल्याकडच्यासारखी धोतरांची आवश्यकता भासत नाहीं. आंत एक लंगोटी व वरती गळ्यापासून पायापर्यंत जरूरीप्रमाणें व ऐपतीप्रमाणें घातलेले २।३ पायघोळ आंगरखे असले म्हणजे काम भागतें. झग्याच्या दोन बाजूंस दोन बाह्या बऱ्याच लांब असतात. परंतु त्यांत हात घालीत नाहींत. त्या तशाच सोडलेल्या असतात. हात झग्याच्या आंतच असतात. स्त्रियाहि असेच झगे वापरतात. डोक्यास मात्र रुमाल लागतो. त्याचा उपयोग थंडी फार वाढल्यास कान बांधण्याकडे होतो. देऊळ पाहून थोडीशी तुळशीबागेची आठवण होते. मात्र तुळशीबागवाल्यांनीं जास्तीत जास्त जागा दुकानाकरितां देऊन जसें आपल्या पैशांच्या हांवेचें प्रदर्शन मांडलें आहे, तशी परिस्थिति येथें नाहीं. येथें ७।८ दुकानांनाच जागा दिली आहे, बाकी ३।४ शें माणसें उतरतील इतकी जागा मोकळी ठेवली आहे. त्यामुळें कांहीं दुकानें देवळाच्या बाहेर आहेत. आंत असलेलीं बहुतेक दुकानें फराळाचीं आहेत. त्यांत पोळ्या वगैरे भाजण्याचें काम चाललें होतें. एका दुकानदारानें बोजा संभाळण्याचें पत्करल्यामुळें मी मोकळा झालों. जेवण झालें असल्यामुळें फिरण्याशिवाय दुसरा उद्योग नव्हता. देवळाच्या सभोंवार नदीचें वेष्टण आहे. तींत ठिकठिकाणाहून आलेल्या अनेक नावा होत्या. कांहीं मंडळी नावेंतून किनाऱ्यावर येऊन तेथें स्वयंपाक करीत होती. कांहींचा स्वयंपाक नावेंत चालला होता. कांहीं घरून आणलेला भात खात बसलीं होतीं तर कांहीं दुकानांत मिळणाऱ्या पोळ्यावर ताव देत होतीं. जिकडे तिकडे काश्मिरी पंडितांची व पंडितां-नींची गर्दी दिसत होती. काश्मिरी स्त्रियांहि फार भाविक असल्यामुळें पुष्कळ बाय-कांनीं मला भोजन झालें काय म्हणून विचारिलें परंतु मी पोटभर जेवून आलों असल्यामुळें नको म्हणून सांगितलें. देवळात एके ठिकाणीं मोठा होम पेटला होता. त्याच्या सभोंवतीं बरींच पंडित मंडळी लाह्या, तांदूळ वगैरे घेऊन बसली होती व मंत्र म्हणून होमांत आहुती देत होती. काश्मिरी स्त्रिया कुंकू लावितात परंतु प्रत्येक सुवासिनीनें कुंकू लाविलेंच पाहिजे असा इकडे निर्बंध दिसला नाहीं. ह्यावरून आपल्या-कडे विधवांनीं सुद्धां कुंकू लावावें. अशा मताच्या परमहंस प्रज्ञानेश्वर यतींना ( हे यति **पुण्यास** आनंदाश्रमांत रहातात. ) एक आधार आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ उपयोगी पडेल, कारण उत्तर ध्रुवाकडून आलेल्या आर्य लोकांच्या चालीरीती अद्याप इकडील लोकांत जीव धरून आहेत. आवाराच्या आंत एक मोठें पाण्याचें कुंड बांधलें आहे व त्या कुंडाच्या मध्यावर एक लहानसें देवीचें देऊळ आहे. देवळांत

कोणीच जात नाहीं. सर्व लोकांची पूजा कुंडाच्या कांठावरुन चालते. ठिकठिकाणीं चटया पसरून त्यावर मंडळी बसली होती. पूजा करतांना एकट्या यजमानानेंच करावयाची नाहीं. सर्व मंडळींना पूजेचें श्रेय मिळावें म्हणून आईबाप, वहिणभाऊ, मुलगासून, पणतू, सर्वांनीं ओळीनें बसावयाचें. एकानें पूजा करावयाची व बाकीच्यांनीं एक-



**मजूर बर्फाचा पूल ओलांडून जात आहेत.**

मेकांच्या आंगास हात लावून पूजेचें श्रेय मिळवावयाचें कुंडांत खरि व साखर सारखी चोहोंबाजूंनीं पडत होती. निरांजनें, कापूर, जिकडे तिकडे पेटलेला हाता व उद-बत्त्यांच्या सुवासानें वातावरण भरून गेलें होतें. काश्मिरी पंडित जोरंजोरानें मंत्र म्हणून पूजा सांगत होते. त्यांचा मला कांहींच उमज पडला नाहीं. कांहीं वेळानें सर्व मंडळी कुंडांत गुलाबाचीं फुलें टाकण्याकारितां उभी राहिली त्या वेळीं मात्र सर्व स्त्री-पुरुषांनीं आपल्या हातांत एक एक मोठें गुलाबाचें फूल घेतलें होतें व भटजी मंत्र म्हणत होते व पूजा करणारी मंडळी फूल देवाविरुन ओंवाळीत होती. फुलें ओंवाळ-ण्याचा विधी सुमारें दहा मिनिटें चालला होता. सुंदर पुरुष व स्त्रिया हातांत गुला-बांचीं फुलें घेऊन ओंवाळीत असतांना तो देखावा आपल्याकडील नाटकांतील विजेच्या प्रकाशांत दाखवीत असलेल्या नाचासारखा दिसत होता. आपल्याकडील देखावा कृत्रिम असतो व हा नैसर्गिक होता म्हणून हा देखावा पाहून फार आनंद झाला. खिरीमुळें कुंडांतील पाणी पांढरें झालें होतें व तेंच पाणी नदींत जाऊन नदीच्याहि पाण्याचा रंग